रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १९३ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. १९ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

विकणे आहे
पोयनाड (ता. अलिबाग)
एस.टी. बस थांब्यापासून
५ मिनीटाच्या अंतरावर
1 BHK Flat 635 Sqft.
Cont. 8425054720



जन्म : १९ फेब्रुवारी १९२५ | मृत्यू : १७ डिसेंबर २०२५

राम सुतार काळाच्या पडद्याआड

# शिल्पकलेचे भीष्माचार्य हरपले!

| मुंबई | प्रतिनिधी | आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय शिल्पकलेचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांचे बुधवारी रात्री निधन झाले. नोएडा येथील त्यांच्या निवासस्थानी रात्री सुमारे १.३० वाजता त्यांनी वयाच्या १०१व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. काळाच्या कसोटीवर टिकून राहात दगडातून शेकडो शिल्पांना आकार देत इतिहास घडवणारे हात आज राम सुतार यांच्या जाण्याने शांत झाले आहेत. नुकतीच त्यांनी (१९ फेब्रुवारी) वयाची शंभर वर्षे पूर्ण केली होती. दीर्घायुष्य लाभलेले राम सुतार हे अखेरपर्यंत सृजनशीलतेशी नाते जपणारे व्यक्तिमत्त्व होते. शिल्पकार राम सुतार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार गुरुवारी (दि. १८) रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या जाण्याने शिल्पकलेतील एका युगाचा अंत झाला आहे. पान २ वर

### ६० वर्षांत घडवली भव्य शिल्पं

देशभरात राम सुतार यांनी अनेक मोठी शिल्प तयार केली आहेत. जगातील सर्वात उंच, १८२ मीटरच उंचीचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा राम सुतार यांच्या आयुष्यातील सर्वात भव्य आणि ऐतिहासिक प्रकल्प मानला जातो. गेल्या ६० वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी २००हून अधिक भव्य शिल्पं तयार केली. त्यांनी तयार केलेल्या प्रतिकृती इंग्लंड, फ्रान्स, रशियात पोहोचल्या आहेत.

### सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित

कला क्षेत्रातील योगदानाबद्दल राम सुतार यांना २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी आपल्या हातानं विदेशातील महात्मा गांधींचे असंख्य पुतळे घडविले आहेत. संसदेसमोरील महात्मा गांधींचा कांस्य आणि पाषाणातील पुतळाही त्यांनी घडवला आहे. त्यांना राज्य सरकारचा २०२४ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कारही प्रदान करण्यात आला आहे.

## वे|ध|क

### अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**पनवेल :** खारघर परिसरातून १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास खारघर पोलिसांनी अटक केली आहे. अजयकुमार जनझोरड (२९) असे त्याचे नाव असून, पोलिसांनी त्याच्या ताब्यातून पीडित मुलीची सुटका करून तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. अजयकुमार हा खारघरमधील पेठ गावात राहण्यास होता. पान २ वर

### महिलेवर अत्याचार

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील एका महिलेचा विनयभंग केल्याची घटना चरी येथे बुधवारी सकाळी घडली आहे. याप्रकरणी आरोपीविरोधात पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सचिन पाटील असे या आरोपीचे नाव आहे. मागील दोन वर्षांपासून पीडित ४० वर्षीय महिलेशी संपर्क वाढविण्याचा प्रयत्न तो करीत होता. बुधवारी (दि.१७) सकाळी घरकामासाठी जात असताना आरोपीने दुचाकीवर येऊन पान २ वर

### वाहनाखाली चिरडून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक दिल्याने खाली पडलेल्या दुचाकीस्वाराच्या अंगावरून वाहन गेल्याने त्याचा चिरडून मृत्यू झाल्याची घटना घडली. मोहम्मद हरून इमाम अली असे त्याचे नाव आहे. बरकत अली चौधरी याने त्याचा मित्र सत्यप्रकाश याला पळस्पे फाटा येथे सोडल्यानंतर मोहम्मद हरून याला फोन केला असता, फोन उचलणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीने मोहम्मद हा दुचाकीने जात मुंबई-पुणे महामार्गावरून असताना अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

# कोकाटेंचा राजीनामा

- शासकीय सदनिका लाटणं भोवलं
- कोणत्याही क्षणी होणार अटक

| मुंबई | प्रतिनिधी |

**शासकीय सदनिकेसाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याबद्दल कोर्टाने दोन वर्षांची शिक्षा ठोठावलेले मंत्री माणिकराव कोकाटे यांनी अखेर राजीनामा दिला आहे. न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर माणिकराव कोकाटे यांच्याकडून क्रीडा आणि अल्पसंख्याक विकास ही दोन्ही खाती बुधवारी रात्री काढून घेण्यात आली होती. त्यानंतर कोकाटे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राजीनामा दिला आहे. अजित पवार यांनी याबाबत माहिती देत कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठवला असल्याचे सांगितले. माणिकराव सध्या लीलावती रुग्णायात उपचार घेत आहे. त्यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. त्यांना अटक करण्यासाठी नाशिक पोलीस मुंबईकडे रवाना झाले असून, कोणत्याही क्षणी कोकाटेंना अटक होऊ शकते.**

बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिका लाटल्याच्या प्रकरणात ॲड. माणिकराव कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्याने त्यांचे मंत्रीपद धोक्यात आले होते. त्यानंतर बुधवारी रात्री माणिकराव कोकाटे यांच्याकडील क्रीडा व अल्पसंख्याक विकास ही दोन्ही खाती उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे सोपविण्यात आल्याचा आदेश राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी जारी केला. विरोधकांकडूनही कोकाटे यांच्या राजीनाम्याची सातत्याने मागणी केली जात होती. पान २ वर



### मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला राजीनामा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारला असून, पुढील कार्यवाहीसाठी राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे पाठवला असल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाने दिली आहे.

### काय आहे प्रकरण?

सुमारे ३० वर्षांपूर्वी माणिकराव कोकाटे यांनी नाशिक शहरात अल्प उत्पन्न गटातून सदनिका मिळवली होती. त्यांनी स्वतःसह भाऊ विजय कोकाटे, पोपट सोनवणे आणि प्रशांत गोवर्धने या चार जणांनी कॅनडा कॉर्नर भागात निर्माण व्ह्यू अपार्टमेंटमध्ये मुख्यमंत्री कोट्यातून अल्प उत्पन्न गटासाठीच्या सदनिका प्राप्त केल्या. तत्कालीन दिवंगत राज्यमंत्री तुकाराम दिघोळे यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली. जिल्हा प्रशासनाने चौकशी केली. या प्रकरणी प्रथम वर्ग न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांच्यासह त्यांच्या भावाला प्रत्येकी दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात त्यांनी जिल्हा न्यायालयात धाव घेतली. मंगळवारी (दि. १७) जिल्हा न्यायालयाने माणिकराव कोकाटेंची दोन वर्षांची शिक्षा व दहा हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा कायम ठेवली आहे. तसेच न्यायालयाने त्यांच्या अटकेचे निर्देशही दिले आहेत.

### अटकेत कायदेशीर अडथळा नाही

मिळालेल्या विश्वसनीय माहितीनुसार, माणिकराव कोकाटे यांच्या अटकेत कोणताही कायदेशीर अडथळा नाही. नियमांनुसार, त्यांच्या अटकेसाठी विधिमंडळाच्या कोणत्याही परवानगीची आवश्यकता नाही. मात्र, कोकाटे यांना अटक केल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून विधिमंडळाला रीतसर कळवण्यात येणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# 'जी राम जी'वर संसदेत रणकंदन

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

लोकसभेत गुरुवारी (दि. १८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याऐवजी येणारे 'जी राम जी' बिल मंजूर करण्यात आले. या विधेयकावरून सभागृहात मोठा गदारोळ झाला. विधेयक स्थायी समितीकडे पाठवावे, अशी मागणी करत विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहाच्या मध्यभागी उतरून जोरदार आंदोलन केले. सभापतींनी विधेयकावर सविस्तर चर्चा झाली असल्याचे सांगत मतदान घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर काही विरोधी खासदारांनी कागद फाडत निषेध केला. हे विधेयक आता राज्यसभेत मांडले जाणार आहे.

याआधी काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वढेरा, डीएमकेचे टी.आर. बालू आणि समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांच्यासह अनेक विरोधी खासदारांनी विधेयकाला विरोध केला. महात्मा गांधींचे नाव कायद्यातून काढणे म्हणजे राष्ट्रपित्याचा अपमान असल्याचा आरोप विरोधकांनी केला. तसेच या विधेयकामुळे राज्य सरकारांवर आर्थिक बोजा वाढणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विरोधकांचा गदारोळ कायम राहिल्याने काही खासदार पुन्हा सभागृहाच्या मध्यभागी उतरले आणि कागद फाडले. यावेळी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला पान २ वर

# दाखले रखडले, डॉक्टर अनुपस्थित

## अपंग बांधवांच्या अडचणी वाढल्या



| अलिबाग | प्रतिनिधी |

बुधवार, १७ डिसेंबर रोजी अपंगत्व दाखला काढण्यासाठी अलिबाग येथे जिल्हा सामान्य रुग्णालयात अपंग बांधवांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. मात्र, या अत्यंत संवेदनशील प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली बसण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालये आदी मूलभूत सोयी अत्यंत अपुऱ्या असल्याचे विदारक चित्र प्रत्यक्ष पाहायला मिळाले. परिणामी, अनेक अपंग नागरिकांना तासनतास उभे राहावे लागले.

अपंग बांधवांच्या म्हणण्यानुसार, काही अधिकारी व कर्मचारी संवेदनशीलतेने वागतात हे मान्य असले तरी अनेक अधिकारी व कर्मचारी उद्धट, असंवेदनशील व दुर्लक्ष करणारे वर्तन करीत असल्याची तीव्र भावना उपस्थितांमध्ये आहे. सकाळी लवकर दाखल्यासाठी आलेल्या नागरिकांना सायंकाळपर्यंत थांबावे लागले. दूरवरून आलेल्या अपंग नागरिकांचे यामुळे शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगण्यात आले.

तपासणीसाठी आवश्यक असलेले एक-दोन डॉक्टर अनुपस्थित असल्याने, अपंग नागरिकांची कोणतीही चूक नसताना त्यांना पुनः पुन्हा हेलपाटे मारावे लागणार असल्याचा आरोप आहे. तपासणी पूर्ण झालेल्या एकाही अपंग नागरिकाला त्या दिवशी दाखला देण्यात आलेला नाही. सर्वांना पुढील २७ डिसेंबर ही तारीख देऊन परत पाठवण्यात आले. ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

याहून अधिक गंभीर बाब म्हणजे, 'मुंडे प्रकरणा'चा हवाला देत अनेक अपंग नागरिकांना जे.जे. हॉस्पिटल, मुंबई येथे तपासणीसाठी रेफर करण्यात येत असल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, ज्यांच्याकडे आधीपासूनच पान २ वर

# पीएनपी संकुलात रंगणार प्रभाविष्कार

## १९ ते २२ डिसेंबरदरम्यान विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम




| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी शैक्षणिक संकुलाद्वारे 'प्रभाविष्कार' या सांस्कृतिक सोहळ्याचे दि. १९ ते २२ डिसेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांचा ठाव घेऊन त्यांच्या अंतर्मनाचा वेध घेणारा व त्याचबरोबर सर्वांगीण विकासाला वाव देणाऱ्या कार्यक्रमाचे सादरीकरण या सोहळ्यात होणार आहे.

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या वेश्वी येथील भव्य दिव्य संकुलात शुक्रवार (दि. १९) ते सोमवार (दि. २२) या चार दिवसांच्या कालावधीत प्रभाविष्कार सोहळा सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत रंगणार आहे. दि. १९ डिसेंबरला पहिल्या दिवशी सीबीएससी होली चाईल्ड शाळा, दि. २० डिसेंबरला होली चाईल्ड इंग्रजी माध्यम शाळा, दि. २१ डिसेंबर प्राथमिक, माध्यमिक मराठी शाळा व बीएड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम होणार आहे. दि. २२ डिसेंबरला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी कलागुणांचे सादरीकरण करतील आणि महागरबा खेळला जाणार आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा पार पडणार आहे. भव्यदिव्य स्वरुपात होणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन पीएनपी संकुलाच्यावतीने करण्यात आले आहे. दरम्यान, हा सोहळा यशस्वी करण्यासाठी जोरदार तयारी सुरू असून, तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विद्यार्थीसुद्धा प्रभाविष्कार सोहळा उत्साहात पार पाडण्यासाठी मेहनत घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# सहलीची बस कलंडली




| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर ते महाबळेश्वर रस्त्याच्या रूंदीकरणाच्या कामामुळे रस्त्याची दुर्दशा झाली असून, प्रतापगड दर्शनानंतर महाबळेश्वरकडे जाणारी सहलीची बस आंबेनळी घाटात रस्त्यालगतच्या चरामध्ये कलंडल्याची घटना झाली. या अपघातात दरीच्या बाजूऐवजी रस्त्यालगत डोंगराच्या पान २ वर




कित्येक वर्षे पूर्णवेळ अधिकारीच नाही | मागासवर्गीय घटकापर्यंत योजना पोहोचण्यास अडथळा

# प्रभारींच्या भरोवशावर 'समाज कल्याण'

प्रमोद जाधव
| रायगड |

रायगड जिल्हा परिषदेवर गेल्या अनेक वर्षांपासून पूर्णवेळ समाजकल्याण अधिकारी नसल्याचा प्रकार समोर आला आहे. समाजकल्याण विभागामार्फत मागासवर्गीय घटकांसाठी असलेल्या योजना पूर्णवेळ अधिकाऱ्यांविना फेल ठरत आहे. प्रभारी अधिकाऱ्यांच्या भरोवशावर समाजकल्याण विभागाचा कारभार चालत असल्याचे चित्र दिसून आले आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार इतकी असून, एक हजार ८०० हून अधिक गावे आहेत. जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी जिल्हा परिषद ही एक स्वतंत्र यंत्रणा आहे. शासनाच्या सर्व योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात. अनुसूचित जातीमधील घटकांचा विकास साधण्यासाठी जिल्हा परिषदेमध्ये समाजकल्याण विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत अनुसूचित जातीमधील नागरिकांना सार्वजनिक व वैयक्तिक योजना राबविल्या जातात. समाजमंदिरासह अंतर्गत रस्ते, शैक्षणिक व सामाजिक सुविधा देण्याचा प्रयत्न या विभागामार्फत केला जातो. परंतु, या विभागाला गेल्या काही वर्षांपासून पूर्णवेळ अधिकारीच नसल्याची माहिती समोर आली आहे.

> समाजकल्याण विभागाचा अतिरिक्त कारभार आहे. पूर्णवेळ अधिकारी असावा, यासाठी मागणी केली आहे. मागासवर्गीय घटकाला योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.
> – शुभांगी नाखले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप

### यंत्रणा अपयशी

मागील चार वर्षांपासून जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट आहे. या राजवटीत शेवटच्या घटकांपर्यंत योजना पोहोचण्याची अपेक्षा होती. मात्र, या घटकांपर्यंत पोहोचण्यास ही यंत्रणा अपयशी ठरल्याचे समोर आले आहे.



समाजकल्याण अधिकारी नसल्याने शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविताना अडचणी येत आहेत. समाजकल्याण विभागाचा कारभार मागील काही वर्षांपूर्वी सध्याचे गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यानंतर महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली. महिला बालकल्याण विभागासह समाजकल्याण विभागाचे कामही त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. मंडलिक यांची पान २ वर

# चेंढऱ्यात अनधिकृत बांधकाम

## महसूल प्रशासनाचे कारवाईकडे दुर्लक्ष; प्रल्हाद म्हात्रे यांचा अजब निषेध

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

चेंढरे येथील विद्यानगर येथे धनदांडग्यांकडून बेकायदेशीररित्या बांधकाम करण्यात आला आहे. या बांधकामाविरोधात कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी देऊनही तहसील कार्यालयाकडून कारवाई करण्यात आली नाही. महसूल प्रशासानाकडून कारवाईकडे दुर्लक्ष झाल्याने सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद म्हात्रे यांनी तहसील कार्यालयाच्या आवारात महसूल प्रशासनाविरोधात अजब निषेध व्यक्त केला. तहसील कार्यालयात येणाऱ्यांसह अनेकांचे लक्ष गुरुवारी सायंकाळी परिधान केलेल्या निषेध पेहरावाने वेधले.




मिळालेल्या माहितीनुसार, चेढरे ग्रामपंचायत हद्दीतील विद्यानगर येथे वरुण अजमेरा व हार्दिक अजमेरा यांनी नियमानुसार कोणतीही परवानगी न घेता रस्त्यावरील गटावर बांधकाम केले. वाहतूकीच्या रस्त्यावर अतिक्रमण झाले आहे. रस्त्यालगत कोणतेही अंतर न सोडता, अनधिकृतपणे घराचे बांधकाम केले आहे. याविरोधात सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद म्हात्रे यांनी आवाज उठवून ग्रामपंचायतीला पत्र दिले होते. ग्रामपंचायतीचे प्रशासक व ग्रामविकास अधिकारी यांनी दखल घेत अनधिकृत बांधकाम असल्याचा तसेच त्यामुळे वाहतुकीचा रस्ता अरुंद झाला आहे, वाहनांना अडथळा निर्माण होत आहे, अजमेरा यांना रस्त्यावरील अतिक्रमणाबाबत नोटीस दिली असतानादेखील त्यांनी टीएलआरकडील नकाशा दाखवून संरक्षक भिंत बांधल्याचे दिशाभूल करणारा खुलासा सादर केला आहे. प्रत्यक्ष जागेवर सहा मीटर रुंदीचा रस्ता आवश्यक असताना, प्रत्यक्ष साडेचार मीटर रुंदीचा रस्ता अस्तित्वात आहे. बांधकाम करताना रस्त्याच्या कडेला कोणतीही मोकळी जागा सोडली नाही. बांधकामाचे नियम पायदळी तुडवून तसेच एफएसआय विचारात न घेता बांधकाम केल्याचे ग्रामसेवक यांच्या निदर्शनास आले असून, त्यांनी तो अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठविला.

अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत योग्य ते आदेश होण्याची विनंतीदेखील पत्राद्वारे त्यांनी केली. याची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले. परंतु, आजतागायत तहसील कार्यालयाकडून कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या प्रल्हाद म्हात्रे यांनी गुरुवारी सायंकाळी तहसील कार्यालयात जाऊन एक आगळावेगळा निषेध व्यक्त केला. निषेधाचे कपडे परिधान करून त्यांनी तहसील कार्यालयाच्या आवारातील अनेकांचे लक्ष वेधले. यावेळी त्यांनी तहसीलदार विक्रम पाटील यांची भेट घेऊन कधी कारवाई करणार, अशी विचारणा केली.

यावेळी तहसीलदार विक्रम पाटील यांनी मंडळ अधिकारी यांना तोंडी सूचना देत कार्यवाही करण्यास सांगितले. त्यामुळे आता मंडळ अधिकारी व तहसील काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागून राहिले आहे.

# बाटलीबंद पाण्याबाबतची याचिका फेटाळली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशाच्या एका मोठ्या भागात लोकांना साधे पिण्याचे पाणीही नशिबात नाही. अशा परिस्थितीत पाण्याची गुणवत्ता हा मुद्दा नंतर येतो. ग्रामीण भागात लोक अजूनही जमिनीतील पाणी पितात. तुम्ही बाटलीबंद पाण्यात कोणता घटक टाकावा किंवा कोणता काढावा, यासाठी न्यायालयाकडून निर्देश मागत आहात, हा एक चैनीचा विषय आहे. जेव्हा महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेहून परतले, तेव्हा त्यांनी संपूर्ण देशाची यात्रा केली होती.

याचिकाकर्त्यांनीही भारताची खरी परिस्थिती समजून घेण्यासाठी देशाच्या विविध भागांत जाऊन लोक कोणत्या प्रकारचे पाणी पीत आहेत, याची पाहणी करावी, अशा कडक शब्दांमध्ये ताशेरे ओढत सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी देशातील बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेच्या विद्यमान मानकांना आव्हान देणारी याचिका गुरुवारी (दि. १८) फेटाळली.

देशभरात बाटलीबंद पाण्यासाठी वैधानिक मानके असून, अन्न सुरक्षा मानकांची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. भारतात बाटलीबंद पाण्याचे निकष जुने झाले असून, ते आंतरराष्ट्रीय मानकांनुसार असावेत, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत अध्यक्ष असणाऱ्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

आजच्या सुनावणीवेळी सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याला विचारणा केली की, भारतातील पाण्याची तुलना ही ब्रिटन, सौदी अरेबिया किंवा ऑस्ट्रेलिया यासारख्या देशांमधील पाण्याशी होऊ शकते का? आपण त्यांची मानके येथे लागू करू शकतो का? ही याचिका अर्बन फोबिया दर्शवणारी असून, यात देशातील मूळ परिस्थितीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# महसूल कर्मचारी आंदोलनाच्या पवित्र्यात

## आजपासून बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

महसूलमंत्री यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता, विनाचौकशी चार तहसीलदार, चार मंडळ अधिकारी व दोन ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्याविरोधात निलंबनाची कारवाई केली. भंडारा येथील तत्कालीन उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्याविरोधात फौजदारी कारवाई करणे, पालघरमधील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचेदेखील अन्यायकारक निलंबन करणे, अशा अनेक कारणांमुळे महसूल अधिकारी व कर्मचारी वर्गात नाराजीचे सूर उमटले आहेत. त्यांच्याविरोधात रायगड जिल्ह्यातील महसूल अधिकारी व कर्मचारी एकवटले आहेत. महाराष्ट्र राज्य महसूल अधिकारी व कर्मचारी समन्वय महासंघ रायगड जिल्ह्याच्या वतीने बुधवारी सायंकाळी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात



आले आहे. शुक्रवारी (दि. १९) पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे.

विधी मंडळातील व विधीमंडळाबाहेरील विनाचौकशी निलंबन सत्र आणि नैसर्गिक न्यायाची पायमल्ली करण्यात आल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.महसूलमंत्री यांनी एकतर्फी निलंबनाची कारवाई केली आहे. गौणखनिज कारवाई आणि प्रशासकीय कोंडी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अवैध गौण खनिज करणाऱ्या गुन्हेगाराचा पाठलाग करणे,हे महसूलविभागाला शक्य नाही. फक्त दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार आहेत.तरीदेखील महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून कार्यवाही करणे अन्यायकारक आहे.

महसूलमंत्री यांनी एका वर्षात २८ नायब तहसीलदार, तहसीलदार, चार उपजिल्हाधिकारी, आठ मंडळ अधिकारी, १४ ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक महसूल अधिकारी, व महसूल सहाय्यक यांच्याविरोधात निलंबनाची केलीली कारवाई अन्यायकारक आहे.

### मागण्या काय?

१२ व १३ डिसेंबरला सभागृहात जाहीर केलेले निलंबनाचे आदेश मागे घेण्यात यावे. चुकीच्या पध्दतीने निलंबित करण्यात आलेल्या महसूल अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वपदावर घेण्यात यावे. निलंबनाच्या कार्यवाही आदर्श कार्यप्रणाली निश्‍चित करण्यात यावी. महसूल विभागातील नायब तहसीलदार यांचे श्रेणी वेतन, महसूल सहाय्यक, ग्राम महसूल अधिकारी मंडळ अधिकारी, सहाय्यक महसूल अधिकारी यांचे वेतन श्रेणीबाबत प्रलंबित प्रस्ताव मान्य करण्यात यावेत. महसूल विभागाचे सर्व संवर्ग कार्यालयाचे सुधारित आकृतीबंध तात्काळ मंजूर करणे.

त्यामुळे महसूल मंत्र्यांचा निषेध व्यक्त करीत याविरोधात महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

# रेवदंडा कचराभूमी आगीच्या छायेत

## सरपंच व ग्रामसेवकांची उपस्थिती नसल्याने जबाबदारीचा प्रश्न ऐरणीवर

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रेवदंडा येथील कचरा भूमीला भीषण आग लागली. या आगीने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या आगीने काही वेळातच उग्र रुप धारण केले होते. परिसरात दाट धूर, जळत्या कचऱ्याचा वास वातावरणात निर्माण झाला होता. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली असली, तरी परिस्थिती अत्यंत गंभीर होती. जेएसडब्लूच्या अग्नीशमन दलाच्या मदतीने ही आग आटोक्यात आणण्यात यश आले. मात्र सरपंच व ग्रामसेवक या ठिकाणी उपस्थित नसल्याने जबाबदारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



डम्पिंग ग्राऊंड परिसरात मोठ्या प्रमाणावर ज्वलनशील कचरा साठलेला असून, आजूबाजूला वस्ती असल्याने आग अधिक पसरली असती, तर जीवितहानी व मोठे नुकसान झाले असते, हे नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतीच्या जबाबदार पदाधिकाऱ्यांची तात्काळ उपस्थिती अपेक्षित असते. मात्र, या गंभीर घटनेच्या वेळी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रफुल्ल मोरे तसेच ग्रामसेवक सुदेश राऊत हे प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित नसल्याची बाब समोर येत आहे. ग्रामसेवक हे अलिबाग येथे वास्तव्यास असल्याने तात्काळ घटनास्थळी पोहोचणे शक्य झाले नाही, अशी माहिती आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत ग्रामपंचायतीची प्रतिसाद व्यवस्था किती सक्षम आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

डम्पिंग ग्राऊंडसारख्या संवेदनशील ठिकाणी आग लागणे ही वारंवार घडणारी आणि गंभीर बाब आहे. या ठिकाणी नियमित देखरेख, प्रतिबंधक उपाययोजना आणि तातडीचा प्रतिसाद देणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. मात्र, प्रत्यक्ष संकटाच्यावेळी सरपंच व ग्राम सेवकांची उपस्थिती नसणे ही बाब ग्रामस्थांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण करणारी ठरत असल्याची चर्चा आहे. जेएसडब्लूच्या अग्नीशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठी हानी टळली. परंतु, ही आग अधिक पसरली असती आणि जीवितहानी झाली असती, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणावर आली असती, असा थेट प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत.

ग्रामसभांमध्ये दिल्या जाणाऱ्या आश्वासनांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृती आणि जबाबदारीची जाणीव दाखवली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर आगीचे नेमके कारण, डम्पिंग ग्राऊंडच्या सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी आणि आपत्कालीन व्यवस्थापनाची सखोल चौकशी करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पान १ वरून

## शिल्पकलेचे भीष्माचार्य हरपले!

भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये उभारलेल्या त्यांच्या भव्य शिल्पाकृतींनी भारतीय शिल्पपरंपरेला जागतिक ओळख मिळवून दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक राष्ट्रीय नेत्यांची स्मारके, तसेच एकता आणि प्रेरणेचे प्रतीक ठरलेले पुतळे ही त्यांची अमूल्य देणगी मानली जाते. त्यांच्या निधनामुळे भारतीय कला, संस्कृती आणि शिल्पकलेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जगभरात २००हून अधिक शिल्पांची निर्मिती करणारे राम सुतार हे नाव केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आदराने घेतले जात होते. दिल्लीतील संसद भवन परिसरात उभारलेली त्यांची शिल्पे आजही भारतीय लोकशाहीची साक्ष देतात. राम सुतार यांना त्यांच्या योगदानाबद्दल पद्मश्री, पद्मभूषण तसेच महाराराष्ट्र भूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारकडून त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला होतो. मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतः रुग्णालयात जाऊन हा पुरस्कार त्यांच्या हाती सोपवला होता.

यावर्षी फेब्रुवारीत राम सुतार यांनी वयाची १०० वर्ष पूर्ण केली. १९ फेब्रुवारी १९१५ साली महाराष्ट्रातील गोंडूर गावात एका गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला होता. नोएडा येथे त्यांनी त्यांचा स्टुडिओ साकारला. १९९० सालापासून ते तेथेच रहात होते. पद्मश्री आणि पद्मभूषण पुरस्कार विजेते राम सुतार यांनी असंख्य ऐतिहासिक शिल्पे आणि स्मारके निर्माण केली. महात्मा गांधींचे साडेतीनशेहून अधिक पुतळे त्यांच्या हाताने तयार झाले. एवढंच नव्हे तर, अजिंठा-वेरूळ लेण्यांमधील अनेक प्राचीन शिल्पांच्या जीर्णोद्धारातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. छत्रपती संभाजीनगरमधील जगप्रसिद्ध असलेल्या अजिंठा लेण्यांचे पुनर्जतन करण्यासाठी पुरातत्व विभागाकडून १९५० मध्ये महत्त्वाचं काम करण्यात आलं. त्यावेळी त्यांनी मॉडेलर म्हणून अनेक शिल्पांना गतवैभव मिळवून देण्यासाठी काम केलं. त्यांचा १९५२ मध्ये प्रमिला यांच्याशी विवाह झाला. १९५९ मध्ये माहिती आणि प्रसारण मंत्रालयात दृकश्राव्य प्रसिद्धी संचालनालय, प्रदर्शन विभागात तांत्रिक सहाय्यक म्हणून कार्यरत होते. मात्र, शिल्पकलेची जास्त आवड असल्यानं त्यांनी नोकरी सोडून स्वतंत्र करिअर निवडणं पसंत केलं.

**दगड आणि संगमरवरी शिल्पकलेवर प्रभुत्व**

राम सुतार यांचा जन्म १९२५ मध्ये धुळे जिल्ह्यातील गोंदूर येथे गरीब सुतार कुटुंबात झाला होता. बालपण अत्यंत कठीण संघर्षातून जात असताना त्यांच्यामधील प्रतिभा त्यांचे गुरुजी श्रीराम जोशी यांनी हेरली. त्यांच्यामधील उदयोन्मुख कलाकार घडविण्यासाठी श्रीराम जोशी यांनी राम यांना मुंबईतील सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित केलं. जेजेमधून शिक्षण घेत असताना त्यांच्या उपजत असलेल्या प्रतिभेचा अधिक विकास झाला. राम सुतार जेजे स्कूलमध्ये सातत्यानं प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत राहिले आणि अभ्यासक्रमाच्या शेवटी त्यांना मॉडेलिंगसाठी प्रतिष्ठित असं मेयो सुवर्णपदक मिळवलं. आयुष्यभर त्यांनी चित्रकला आणि मातीकाम कौशल्य शिकविणाऱ्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता बाळगली. कारण, त्यांच्यामुळे त्यांना दगड आणि संगमरवरी शिल्पकलेवर प्रभुत्व मिळवता आलं. असं असलं तरी शिल्पकार राम यांना कांस्य धातुच्या ओतकामाची अधिक आवड होती.

## कोकाटेंचा राजीनामा

अशातच अजित पवार यांनी एक्स पोस्ट करुन माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याचे जाहीर केले. तसेच कायदेशीर प्रक्रियेवर आमचा ठाम विश्वास असल्याचेही अजित पवार म्हणाले. माननीय न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा माझ्याकडे सुपूर्द केला आहे. कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून, ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला आहे. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवण्यात आला आहे, असं अजित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं.

**माणिकरावांना कोणत्याही क्षणी अटक होणार?**

दरम्यान, माणिकराव कोकाटे यांना आता कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. कारण, कोकाटे यांच्याविरोधात बुधवारीच अटक वॉरंट जारी झालं आहे. नाशिक पोलिसांचं एक पथक कोकाटे यांच्या अटकेसाठी मुंबईच्या दिशेला रवाना झालं आहे. माणिकराव कोकाटे सध्या आजारी आहेत. त्यांच्यावर मुंबईतील लीलावती रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्यामुळे नाशिक पोलीस मुंबईत येऊन आधी कोकाटे यांची भेट घेऊ शकतात. कोकाटेंची प्रकृती बघून पोलीस त्यांना अटकेचा निर्णय घेतात का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

**गुन्हे शाखेचे पथक ॲक्शन मोडमध्ये**

कोकाटे यांच्या नावाचे अटक वॉरंट घेऊन नाशिक गुन्हे शाखेचे एक विशेष पथक मुंबईत दाखल झाले आहे. हे पथक सध्या सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या दालनात पोहोचले आहे. कोकाटे यांना ताब्यात घेताना त्यांच्या प्रकृतीचे कारण असेल तर रुग्णालयातील रूमबाहेरच पोलीस गार्ड तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## सहलीची बस कलंडली

बाजूच्या चरामध्ये सहलीची बस कलंडल्याने मोठा जीवघेणा अपघात टळला आहे. समर्थ ट्रॅव्हल्सची खासगी रामेश्वर आरामबस (एमएच ४७ वाय ७९९२) ही सहलीच्या विद्यार्थ्यांना घेऊन प्रतापगड दर्शनानंतर महाबळेश्वरकडे निघाली असताना आंबेनळी घाटात या आरामबसचा टायर रस्त्यालगत खोदण्यात आलेल्या चरात अडकल्याने बसचा पुढील टायर अधांतरी राहिला. या प्रकारामुळे आरामबसमधील विद्यार्थी व शिक्षक तसेच बसचे कर्मचारी यांच्या किंचाळ्यांनी परिसरामध्ये भीतीदायक वातावरण निर्माण झाले. सुदैवाने या अपघातात विद्यार्थी, शिक्षक व चालक यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र, या अपघातामुळे आंबेनळी घाटामध्ये काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला आणि ही अपघातग्रस्त आरामबस काही वेळानंतर क्रेनच्या सहाय्याने बस चरातून बाहेर काढेपर्यंत अनेक वाहनचालकांना या ट्रॅफिक जॅममध्ये अडकून मनस्ताप झाला.

अपघाताच्या ठिकाणी आंबेनळी घाटातील तीव्र वळणाचा योग्य अंदाज न आल्याने बस रस्त्याच्या कडेला घसरत ठेकेदारांनी रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी खणलेल्या चरांमध्ये अडकली. आरामबसचा टायर चरामध्ये अडकल्याचे समजताच स्थानिक नागरिक, अडकलेले वाहनचालक आणि दुचाकीस्वारांनी तात्काळ मदतकार्य करत विद्यार्थ्यांना बसमधून बाहेर काढले.आंबेनळी घाटातील रस्ता अरुंद असून, तीव्र वळणांमुळे अपघातानंतर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. आंबेनळी घाटाच्या रूंदीकरणामुळे रस्त्याची परिस्थिती संबंधित ठेकेदारांकडून अधिकच बिकट करून ठेवण्यात आल्याने भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता दिसून येत आहे.

## प्रभारींच्या भरोवशावर ‘समाज कल्याण’

बदली झाल्यानंतर जिल्हा परिषदेमधील पशुसंवर्धन विभागातील जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. श्याम कदम यांच्याकडे समाजकल्याणचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आला होता. काही महिन्यांपूर्वी त्यांची कर्जतमध्ये बदली झाल्यानंतर कृषी विभागाचे कृषी विकास अधिकारी निजम यांच्याकडेदेखील समाजकल्याणचा अतिरिक्त कारभार सोपविण्यात आला. निजम यांना अतिरिक्त काम करताना अडचणी येत असल्याने त्यांच्याऐवजी स्वच्छता व पाणी स्वच्छता मिशनच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांखी नाखले यांच्याकडे समाजकल्याण विभागाचा अतिरिक्त कारभार देण्यात आला आहे.

मागील चार वर्षांपासून जिल्हा परिषदेवर प्रशासकीय राजवट आहे. या प्रशासकीय राजवटीत शेवटच्या घटकांपर्यंत योजना पोहोचण्याची अपेक्षा होती. मात्र, या घटकांपर्यंत पोहोचण्यास ही यंत्रणा अपयशी ठरल्याचे समोर आले आहे. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, सफाई कामगारांच्या पाल्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेला अतिशय अल्प प्रतिसाद मिळाला असल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे. काही शिष्यवृत्ती योजनांमध्ये लाभार्थीच प्राप्त झाले नसल्याची माहिती समोर आली आहे.

मागासवर्गीय विद्यार्थिनींची शाळेतील गळती कमी करण्यासाठी तसेच मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणात प्रगती साधण्यासाठी या योजना सुरु केल्या आहेत. परंतु, जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाला पूर्णवेळ अधिकारी नसल्याने या योजनांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे समोर आले आहे. यातील शिष्यवृत्ती योजनांमध्ये एकच अर्ज दाखल झाला आहे. काही योजनांमध्ये एकही अर्ज प्राप्त झाला नसल्याची माहिती समोर आले आहे. तसेच या विभागात निरीक्षकपद रिक्त असल्याने या योजनांची कार्यवाही योग्य होत नसल्याचेही बोलले जात आहे.

## महिलेवर अत्याचार

तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. विनयभंग केल्याप्रकरणी त्याच्याविरोधात पीडित महिलेने पोयनाड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. या गुन्ह्याचा तपास महिला पोलीस नाईक एन.एस. वाघमारे करीत आहेत. सचिन पाटील यांच्याविरोधात यापूर्वी पोयनाड व पेण पोलीस ठाण्यात फसवणूक व अन्य प्रकारचे गुन्हे दाखल असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

गेल्या काही महिन्यांपूर्वी आरोपी अजयकुमार याने पीडित मुलीसोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते. त्यानंतर त्याने संधी साधून पीडित मुलीला पळवून नेत तिला कळंबोली लेबर कॅम्पमधील रूमवर नेऊन ठेवले होते. पीडित मुलीने तिची आई काम करत असलेल्या मॅडमच्या घरी जाते असे लहान बहिणीला सांगून घरातून निघून गेली होती. मात्र, सायंकाळपर्यंत घरी परतली नव्हती. त्यामुळे तिच्या घरच्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली होती.

या तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, पीडित मुलगी एका तरुणासोबत दुचाकीवरून गेल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर खारघर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमध्ये दुचाकीचा नंबर मिळवून त्याच्या मालकाचा शोध घेतला असता, ही दुचाकी अजयकुमार याची असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन खारघरमधील पेठ गावातून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याची अधिक चौकशी केल्यानंतर त्याने आपला गुन्हा कबूल करत पीडित मुलीला कळंबोली येथील लेबर कॅम्पमधील घरामध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी पीडित मुलीला कळंबोली येथून ताब्यात घेऊन तिला तिच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले. दरम्यान, पोलिसांनी पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी केली असता, अजयकुमार याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर खारघर पोलिसांनी त्याच्याविरोधात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

## दाखले रखडले, डॉक्टर अनुपस्थित

अलिबाग सिव्हिल हॉस्पिटलने दिलेले जुने अपंगत्व दाखले आहेत, त्यांनाही पुन्हा बाहेरील रुग्णालयात तपासणीसाठी पाठवले जात आहे.

अपंग बांधवांच्या आपापसातील चर्चेतून आणखी धक्कादायक वास्तव समोर आल्याचे सांगण्यात येते. पूर्वी ४० किंवा ५० टक्के अपंगत्वाचा दाखला असलेल्या नागरिकांना आता २५ टक्के अपंगत्वाचे दाखले दिले जात असल्याचे उदाहरणे पुढे येत आहेत. १०-१५ वर्षांनंतर वय वाढल्यानंतर अपंगत्व कमी कसे होते, हा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. वैद्यकीयदृष्ट्या वय वाढल्याने अपंगत्वाचे परिणाम अधिक तीव्र होतात, असे तज्ज्ञांचे मत असल्याचेही सांगण्यात येते.

या सर्व घटनांमुळे अलिबाग सिव्हिल हॉस्पिटलमधील अपंगत्व दाखला प्रक्रियेत अपारदर्शकता, असंवेदनशीलता व मनमानी सुरू असल्याचा गंभीर संशय निर्माण झाला आहे. काल दिसलेले दृश्य म्हणजे अपंग नागरिकांचा अक्षरशः छळ असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. अपंग बांधवांसाठी उभारलेली यंत्रणाच जर त्यांच्या त्रासाचे कारण ठरत असेल, तर ती यंत्रणा अपयशी ठरते, असे मत मांडण्यात आले. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत तातडीने मूलभूत सुधारणा, पुरेसे डॉक्टर, योग्य बसण्याची व्यवस्था, वेळेत दाखले देण्यासाठी स्पष्ट कार्यपद्धती आणि अपंग नागरिकांशी मानवीय वागणुकीबाबत ठोस आदेश देण्याची मागणी होत आहे.

या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी केवळ कार्यकर्त्यांना नियमबाह्य मदत करण्यापुरते मर्यादित न राहता, समाजातील सर्वांत दुर्बल घटक असलेल्या अपंग बांधवांच्या मूलभूत हक्कांसाठी ठामपणे उभे राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अपंगत्व ही कोणाची चूक नसून ते एक सामाजिक वास्तव आहे. त्यामुळे त्यावर आधारित यंत्रणा माणुसकी, समवेदना आणि सद्भावनेने चालली पाहिजे, असे मत व्यक्त करण्यात आले.

एकीकडे शासन व लोकप्रतिनिधी अपंग नागरिकांना ‘दिव्यांग’ असे संबोधत विविध योजना जाहीर करतात; मात्र दुसरीकडे सरसकट संशयाच्या नजरेने पाहून कोणतीही वैयक्तिक, वस्तुनिष्ठ वैद्यकीय तपासणी न करता अपंगत्वाची टक्केवारी कमी केली जात असल्याचा आरोप आहे. यामुळे अपंग नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळू नये, असा प्रकार घडत असल्याचेही सांगण्यात येते.‘अपंगत्व कमी दाखवणे म्हणजे त्या व्यक्तीच्या वेदना, अडचणी आणि वास्तव नाकारणे होय. दिव्यांगत्व ही दयेची नव्हे, तर हक्काची बाब आहे,’ अशी ठाम भूमिका अपंग बांधवांनी मांडली आहे. अपंगत्वाचा अनुभव कोणालाही कधीही येऊ शकतो. त्यामुळे नियमांसोबतच समवेदना, न्याय आणि मानवी दृष्टिकोन हेच निकष असावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## ‘जी राम जी’वर संसदेत रणकंदन

यांनी नाराजी व्यक्त करत, तुम्हाला कागद फाडण्यासाठी जनता इथे पाठवत नाही, देश पाहतो आहे, असे सांगितले. सभागृह तहकूब झाल्यानंतर प्रियांका गांधी वढेरा यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हे विधेयक ग्रामीण रोजगार हमी योजनेचा अंत करण्याच्या दिशेने आहे. या विधेयकामुळे निधीचा भार राज्यांवर टाकला जात असून, राज्यांकडे आधीच पैसे नाहीत.

नरेगा ही अतिगरीबांसाठी आधाराची योजना आहे आणि हे विधेयक गरीबविरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, केंद्रीय मंत्री एस.पी. सिंग बघेल यांनी सभागृहात कागद फाडण्याच्या प्रकाराचा निषेध केला. विधेयकावर रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली होती आणि अशा प्रकारचे वर्तन लोकशाहीला शोभणारे नाही, असे त्यांनी सांगितले. हे विधेयक जनहिताचे असल्याचा दावा त्यांनी केला.

**जाहीर नोटीस**

**मा. अप्पर आयुक्त सो., कोंकण विभाग, मुंबई यांचे न्यायालयात :**

पुनर्विलोकन (रिव्हिजन) अर्ज क्र. ५४१/२०२५
ने. ता. १३/०१/२०२६.

श्री. तानाजी महादेव धिडे व इतर- १ — अर्जदार

विरुद्ध

श्री. हेमंत अरविंद लेले व इतर ३ — सामनेवाले

प्रति,
२) श्री. नथुराम केशव धिडे
रा. मु. येलवडे, पो. शिरवली, ता. माणगांव, जि. रायगड
३) श्रीमती. सुनिता महादेव साखळे
रा. ७२/अ, ९ आनंद पार्क सोसायटी, वेड रोड, सुरत - १९५००४.
४) श्री. राकेश शिवाजी धिडे
रा. सानेगांव, आदिवासी वाडी, ता. रोहा, जि. रायगड.

आमचे पक्षकार श्री. तानाजी महादेव धिडे व इतर-१ यांनी मौजे-येलवडे, ता. माणगांव, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १२१/११, या प्रश्नाधिन मिळकतीसंबंधी मा.अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी दुसरे हक्कनोंद अपील क्र.१९१/२०२३ मध्ये दि. २१/०३/२०२५ रोजी पारित केलेल्या अंतिम आदेशाविरुद्ध व फेरफार क्र. ८६१, १०२०, ११२० व ११६३ रद्द होवून मिळण्याकरिता, मा.अप्पर आयुक्त सो., कोंकण विभाग, मुंबई यांचे न्यायालयात पुनर्विलोकन (रिव्हिजन) अर्ज क्र. ५४१/२०२५ दाखल केलेला आहे. सदरहू अर्ज प्रलंबित आहे. सदरहू प्रकरणाची पुढील सुनावणीची तारीख दि.१३/०१/२०२६ रोजी मुकरर केली आहे.

सदरहू प्रकरणातील उपरोक्त नमूद सामनेवाले यांस प्रस्तुत नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, त्यांनी स्वतः अथवा त्यांचे वकीलांमार्फत मा. न्यायालयाच्या वर नमूद तारखेस हजर होवून, लेखी म्हणणे मांडण्याचे आहे. तसे न केल्यास, मा. न्यायालय तुमचे विरुद्ध एकतर्फा आदेश पारित करेल. कृपया याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- १९/१२/२०२५

सही
**Aaditya M.Vaishampayan**
B.Com. LL.B
Advocate-High Court
Panvel-410206, Raigad
Regn. No MAH/7072/2021

## निवडक



### ‘जातीयता, अंधश्रद्धा निर्मुलन अखंड भारतासाठी गरजेचे’

**रेवदंडा :** अखंड भारताची निर्मिती ही अनिवार्य बाब असून स्वातंत्र्य वीर सावरकर यांना अभिप्रेत असलेली जातीयता, अंधश्रद्धा निर्मूलन झाल्यास अखंड भारताचे स्वप्न साकार होईल, असे विचार सावरकर चरित्र गायक सतिश भिडे यांनी केले. अलिबाग तालुक्यातील चौल नाका येथील सुंदर नारायण मंदिराच्या सभागृहात चौल ज्येष्ठ नागरिक संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. सतिश भिडे यांनी देश-विदेशात विनामूल्य कार्यक्रम केले असून त्यांचा चौलमधील हा कार्यक्रम ३,२३२वा होता. यावेळी उपस्थितांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष सतिश मनोहर यांनी केले. आभार प्रदर्शन सचिव देवानंद पोवळे यांनी केले. किशोर दांडेकर व रविंद्र शेंडे यांनी संगीत साथ दिली. तर, सुत्रसंचालन रोहिदास म्हात्रे यांनी केले.




### लायन्स क्लबच्यावतीने आरोग्य शिबीर

**रसायनी :** लायन्स क्लब खालापूर व श्री बापूजी वारकरी संप्रदाय ग्रामस्थ मंडळ तुकसई यांच्या संयुक्त विद्यमाने व मेडिकव्हर हॉस्पिटल खारघर यांच्या सहकार्यातून तुकसई-खालापूर रायगड येथे अखंड हरीनाम साप्ताहमध्ये महाआरोग्य शिबीर राबविण्यात आले. या शिबिरात मधुमेहाच्या १०० रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी ब्लड प्रेशरचे १०० रुग्ण, ईसीजी तपासणी, डोळे तपासणी रुग्ण व त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. यावेळी लायन्स क्लब खालापूर अध्यक्ष किशोर पाटील, अध्यक्षा शिवानी जंगम, लायन लहू भोईर, रामदास पाटील, ज्ञानेश्वर पाटील, रामदास उतेकर, अजित पांगारे व ग्रामस्थ उपस्थित होते.



### बेकायदा पार्किंग अंमली पदार्थाचे अड्डे

**उरण :** जेएनपीए परिसरातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी आणि दळण वळण सुरळीत होण्यासाठी जेएनपीए, सिडको आणि संबंधित प्रशासनाने नॅशनल हायवेच्या माध्यमातून सहा लेनचे रस्ते बनविले आहेत. त्याच बरोबर वाहतूक कोंडी, अपघात कमी होण्याच्या दुष्टीकोनातून छोट्या वाहणांसाठी सर्व्हिस रस्ते बनविले आहेत. मात्र, जेएनपीए बंदर, सिडकोच्या ताब्यात असलेल्या भूखंडावर व खाडी किनाऱ्यावरील जमिनीवर दगड मातीचा भराव टाकून परप्रांतीय नागरिकांनी संबंधित प्रशासनाला हाताशी धरून बेकायदेशीर, अनाधिकृत पार्किंगचा गोरख धंदा सुरू केला आहे. त्यात धुतूम, पागोटे, करळ ग्रामपंचायत हद्दीतील अनधिकृत पार्किंगवर गुटखा, चरस, गांजा सारख्या अंमली पदार्थांची विक्री ही मोठ्या प्रमाणात केली जात आहे. त्यामुळे येथे येणारे वाहन चालक हे राजरोसपणे अंमली पदार्थांचे सेवन करत असल्याने या ठिकाणी बाचाबाचीचे प्रकार, वाहतूक कोंडी व अपघाताची संख्या वाढली आहे. तरी अशा बेकायदेशीर पार्किंगवर आणि अनधिकृत बांधकामांवर संबंधित प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



### नढाळ पंचायतन येथे विज्ञान प्रदर्शन

**पाताळगंगा :** खालापूर तालुका ५३वा विज्ञान प्रदर्शन सोहळा शिक्षण विभाग खालापूर पंचयत समिती व हिमांशू दिलीप पाटील इंग्रजी माध्यम नढाळ शाळा यांच्या सयुक्तविद्यमाने पंचयतन मंदिर येथे पार पडला. हे विज्ञान प्रदर्शन दि.१८ व १९ डिसेंबर असे दोन दिवस सुरू असणार आहे. या विज्ञान प्रदर्शन सोहळ्याचे उद्‌घाटन प्रसाद थोरवे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रदर्शनाची पाहणी करून कौतुक केले. तर, अभ्यासापूरताच मोबाईलचा वापर करा, असा सल्ला प्रसाद थोरवे यांनी दिला आहे. या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी अधिकारी दीपा परब-गवस यांनी प्रास्ताविक सादर करताना विकसित आणि आत्मनिर्भर भारत स्टेम हा उद्देश असल्याचे सांगत विज्ञान आपल्याला तर्क शुद्ध विचार करायला लावणार आहे. त्यामुळे विज्ञानाकडे विद्यार्थीनी सकारात्मक भूमिकेतून पाहावे, असे आवाहन केले.

### उरणच्या यु.ई.एस.चे घवघवीत यश

**उरण :** उरण पंचायत समितीने दि.१५ ते १७ डिसेंबर या कालावधीत पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात तालुका विज्ञान प्रदर्शनाचे आयोजनक करण्यात आले होते. त्याचबरोर विविध स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये एकूण २५ शाळा व कॉलेजने सहभाग घेतला होता. त्यात उरणच्या यु.ई.एस. स्कूल व ज्यु. कॉलेजने एकूण ६ बक्षिसे मिळवून घवघवीत यश प्राप्त केले आहे. यावेळी विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी एसटीइएम या विषयावर ज्यु. कॉलेज मधील भार्गवी जाधवसह एकूण १५ विद्यार्थीनींनी, तर उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि हरित उर्जा या विषयांवर माध्यमिक विभागातील साईराज हरीमकरसह एकूण ९ विद्यार्थ्यांनी प्रकल्प तयार करून प्रदर्शनात सहभाग घेतला होता. यावेळी विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या प्रकल्पानेही क्रमांक मिळविला.

# तोतया पत्रकाराचा हैदोस

- वेगवेगळ्या कारणांसाठी धमकविण्याचे प्रकार
- पोलिसांशी घनिष्ठ संबंध असल्याची जोरदार चर्चा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गालगत रात्री उशीरा नागोठणे येथील एका हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी थांबलेल्या एका तरुणाला तोतया पत्रकाराकडून मारहाण व शिवीगाळ करण्याची घटना घडली आहे. तसेच, त्या तरूणाला जीवे मारण्याची धमकी देखील देण्यात आली. ही घटना बुधवारी (दि.१७) मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाब पीडित तरूणाने तोतया पत्रकाराविरोधात नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. याआधी देखील तोतया पत्रकारांकडून वेगवेगळ्या कारणाने धमकविण्याच्या घटना घडल्या आहेत. पुन्हा पुन्हा अशीच घटना घडत असल्याने या तोतया पत्रकाराचे पोलिसांशी घनिष्ठ संबंध असल्याची चर्चा पुन्हा एकदा नागोठण्यात रंगली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरूण मनोज मिरज हा बुधवारी (दि.१७) मध्यरात्री नागोठण्यातील मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या एका हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी गेला होता. त्यावेळी एक तोतया पत्रकार देखील त्या हॉटेलमध्ये आला होता. तो हॉटेल मालकाशी बोलत असताना मनोज मिरजकडे बोट दाखवून, हा मला हफ्ता देत नाही, मला दारू देखील देत नाही, असे बोलला. त्यावर मनोज मिरजने त्या तोतया पत्रकाराला बोलला की, मी तुम्हाला ओळखत नाही. मग मी तुम्हाला कोणत्या कारणासाठी हफ्ता देऊ? असे बोलताच त्या तोतया पत्रकाराने मनोज मिरज याला शिवीगाळ करून, हातबुक्क्याने मारहाण केली. तसेच, माझे पोलिसांशी चांगले सबंध आहेत. त्यामुळे मी तुला कधीपण अडकवेन, असे बोलून मनोज मिरजला शिवीगाळ करून हातबुक्क्याने मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मनोज मिरज याच्या तक्रारीनुसार नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आली आहे.




याआधी देखील या तोतया पत्रकारावर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याने नागोठण्यातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांना वेगवेगळ्या कारणाने धमकाविले आहे. आता पुन्हा या तोतया पत्रकाराने हैदोस घालण्यास सुरूवात केली आहे. असे असतानाही पोलीस त्याच्यावर कोणतीही कारवाई करताना दिसत नाहीत. त्यामुळे नक्कीच या तोतया पत्रकाराचे पोलिसांशी घनिष्ठ संबंध असावेत, अशी चर्चा नागोठण्यात रंगली आहे. या घटनेमुळे रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या हॉटेलचा आणि येथे येणाऱ्या ग्राहकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे नागोठणेकरांसह रात्रीचा प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

### हॉटेल रात्री उशिरापर्यंत सुरूच

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांनी महामार्गालगत असलेल्या हॉटेलला रात्री ११ वाजता बंद करण्याचे आदेश दिले आहेत. असे असतानाही महामार्गालगतचे हॉटेल आणि चायनिज सेंटर रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याने तेथे मद्यपी उशिरापर्यंत बसत आहेत. त्यामुळे हे हॉटेल व चायनिज सेंटर अनधिकृत परमिट बार बनले आहेत. त्यामुळेच रात्री अशा घटना घडत आहेत. त्यामुळे महामार्गालगत रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या हॉटेल व चायनिज सेंटरचा बंदोबस्त जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल व स्थानिक पोलिसांनी करावा, अशी मागणी नागोठणेकरांकडून होत आहे.



## कर्जत-पनवेल रेल्वे मार्गिकेसाठीचा मोठा टप्पा पार

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

कर्जत-पनवेल रेल्वे मार्गिका लवकरच सुरू होण्याच्या तयारीत आहे. या मार्गिकेसाठीचा ३०० मीटर लांबीच्या नव्या बोगद्याचे काम पूर्ण झाले असून, त्यामुळे मार्गिकेसाठीचा मोठा टप्पा पार पडला आहे.

मागील कित्येक वर्षांपासून कर्जत-पनवेल रेल्वे मार्गाची प्रतिक्षा आहे. अखेर आता कर्जत-पनवेल मार्गावरील उपनगरीय लोकल सेवा लवकरच पूर्ण होणार आहे. कर्जत-पनवेल या मार्गिकेसाठी डोंगर फोडून एक बोगदा उभारण्यात आला आहे. कित्येक दिवस या मार्गाचे काम सुरू होते. आता किरवली-वांजळे गावाजवळील ३०० मीटर लांबीचा हा नवा बोगदा आता पूर्ण झाला आहे. या बोगद्यात आता रूळ टाकण्याचे काम बाकी आहे. बोगद्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याने या मार्गावरील मोठा अडथळा आता दूर झाला आहे.

या नव्या मार्गावर कर्जत तालुक्यात किरवली आणि वांजळे गावांच्या हद्दीत एक मोठा बोगदा बांधण्यात आला आहे. हा बोगदा दुहेरी मार्गांसाठी पुरेशी जागा ठेवून बांधला आहे. या बोगद्याचे बांधकाम भविष्यातील वाढती गर्दी लक्षात घेऊन करण्यात आले आहे. सर बोगद्याची संरचनात्मक कामे पूर्ण झाली असून ही मार्गिका तयार असल्याने कर्जत-पनवेल रेल्वे मार्ग लोकल सेवेसाठी तयार झाला आहे.

## सरकारला प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाचा धसका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

विमान तळाला दिबांच्या नावाची घोषणा सरकारला करायची नसल्यानेच प्रकल्पग्रसतांच्या आंदोलनाचा धसका घेत राज्य शासनाकडून आचारसंहिता घोषित करण्यात आली आहे, असा आरोप पनवेल पालिकेचे माजी महापौर जगदीश गायकवाड यांनी केला आहे.खासदार बाळ्या मामा उर्फ सुरेश म्हात्रे यांनी विमानतळाला दिबांचे नाव लागावे म्हणून दिल्लीत देखील आंदोलन केले आहे. असे सांगत देशात आणि राज्यात भाजपाची सत्ता असताना देखील विमानतळाला दिबांचे नाव देण्याला विलंब का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याचे काम लोकनेते दि.बा. पाटील यांनी केले असल्याने आगरी, कोळी समाजासोबत इतर समाज देखील २२ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात आलेल्या मोर्चात सामील होणार आहे. यावेळी राजकीय नेत्यांना बाजूला सारून सर्व प्रकल्पग्रस्त आंदोलनात एकत्र सामील होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



मुरूड खोरबंदरात हिवाळी शाळेच्या सहली जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. खोरबंदरात या दिवसात दिवसाला २५ बस भेट देत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## दिघोडे वळणावरील फलक गायब

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

दिघोडे-गव्हाण फाटा हा रस्ता वाहतुकीला अपुरा पडत असल्याने या रस्त्यावर काँक्रीटीकरणाचे काम करण्यात आले आहे. तरी देखील हा रस्ता वाहतुकीला अपुरा पडत आहे. त्यासाठी रस्त्यालगत असलेले कंटेनरयार्ड कारणीभुत ठरत आहेत. कारण कंटेनर यार्ड वाल्यांची स्वतः ची पार्किंग नसल्यामुळे येथे येणारे मोठे कंटेनर रस्त्यावरच उभे केले जातात. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. तसेच, या रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष होत असून रस्त्याच्या कडेला डेब्रिज कचरा पडला आहे. त्याचबरोबर या रस्त्यावर भंगार वाल्यांसह पान टपरी व इतर दुकानाची अतिक्रमे वाढली आहेत. तसेच, दिघोडे नाक्यावरील अवजड कंटेनर वाहतुकीला बंदी असलेले आणि पुढे शाळा असलेले फलक येथील रस्त्याचे काम चालू असताना ठेकेदारांनी काढून ठेवले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात भरधाव अवजड वाहने या रस्त्यावरून धाव आहेत. दरम्यान, येत्या आठ दिवसांत दिघोडे येथील वळण रस्ता हा अवजड वाहनाना बंदी असलेला बोर्ड तसेच इतर काढलेले फलक लावण्यात येतील. या खेरीज दिघोडे गव्हाणफाटा येथील अतिक्रमे काढून टाकण्याची ग्वाही सार्वजनिक बांधकाम खाते पनवेल कार्यकारी अभियंता यांनी कृषीवलच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली.



## काच फोडून रोकड लंपास

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील ओरियन मॉलसमोरील सेवा रस्त्याला लागून उभ्या असलेल्या वाहनाची काच फोडून रोकड लंपास केली. या प्रकरणी सुकापूर येथील हॉटेल चालकाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पनवेलमध्ये हॉटेलबाहेर उभ्या केलेल्या मोटारींच्या काचा फोडून रोकड व इतर महागड्या वस्तू चोरांनी पळवल्या आहेत. कॅफेचालक तरुणाला रात्री तीन वाजता मोटारीच्या मागील दरवाजाची काच फोडून एक लाख रुपयांची रोकड आणि ओळखपत्र चोरले.



## दिल्ली दरबारात पोर्ट कामगारांचा एल्गार

**। उरण । प्रतिनिधी ।**

भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर संघाने दिल्लीतील सत्ताकेंद्रात पोर्ट कामगारांच्या न्याय हक्कांसाठी ठणकावून आवाज उठवला. केंद्रीय पोर्ट व शिपिंग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची दिल्लीतील ट्रान्सपोर्ट भवन भेट घेत कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांवर थेट जाब विचारण्यात आला. या भेटीत पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत, अध्यक्ष श्रीकांत राय यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. वेतन करारातील वर्षानुवर्षे रखडलेले मुद्दे, द्विपक्षीय वेतन करार समितीच्या सब-कमिटीचा अहवाल तात्काळ अंमलात आणण्याची ठाम मागणी यावेळी करण्यात आली.

## विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न

**बोर्लीपंचतन :** श्री मोहनलाल सोनी विद्यालय व श्री नानासाहेब कुळकर्णी कनिष्ठ महाविद्यालय बोर्ली पंचतनच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची सुरुवात बुधवार दि.१० डिसेंबरपासून करण्यात आली. त्यामध्ये १० ते १२ डिसेंबर दरम्यान विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर १३ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या व तयार केलेल्या रंगावली व हस्तकला प्रदर्शन, १५ डिसेंबर रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ त्याचप्रमाणे १६ डिसेंबर रोजी आनंद मेळावा व १७ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# पोलिसांच्या वाहनावर हल्ला करून पसार

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी (दि.१६) रात्री बारा वाजताच्या सुमारास तृतीय पंथीयांना हुसकावण्यासाठी येथील स्टील मार्केट आणि पुरुषार्थ ब्रिज येथे झोन थ्री स्ट्रायकिंग वाहनाने पोलिसांनी भेटी दिल्या. त्यावेळी त्या ठिकाणी तृतीयपंथी आढळले नाहीत. त्यानंतर स्ट्रायकिंग वाहन खारघर पोलीस ठाणे हद्दीत कारवाईसाठी गेले. त्यावेळी बेलपाडा येथील खारघर रेल्वे स्टेशनच्या स्कायवाक पुलाच्या पुढे काही तृतीयपंथी आढळून आले आणि त्यांना हुसकावण्यात आले. यावेळी त्या ठिकाणी काहीजण उभे होते, त्यांना देखील पोलिसांनी हुसकावले. यावेळी पोलीस तेथून निघण्याच्या तयारीत असताना रात्री एकच्या सुमारास दोन अनोळखी व्यक्ती दुचाकी वर आले आणि त्यांनी स्ट्राइकिंग वाहनाच्या चालकाच्या बाजूला दगड मारून ते पसार झाले. यात आरशाची काच फुटून नुकसान झाले. या प्रकरणी दोन व्यक्तींविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ | अजित पवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित

# अ.ता.शि.प्र. मंडळ ही दर्जेदार शिक्षण संस्था

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पारतंत्र्यकाळात महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार खेड्यापाड्यात शिक्षणप्रसाराचे कार्य करणारी आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन राष्ट्रप्रेमी पिढी घडविणारी अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आजपर्यंत या संस्थेचे शिक्षणदानाचे कार्य प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन रायगड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी केले.

अलिबाग येथील शिशुविहार प्राथमिक शाळेत आंतरशालेय लेखन स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. संस्थाध्यक्ष बळवंत वालेकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



सध्याच्या काळात शिक्षणक्षेत्रात तीव्र स्पर्धा असून इंग्रजी माध्यमाच्या शाळा शहरांसह ग्रामीण भागातही पोहोचल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विविध सुविधा उपलब्ध असूनही अनेक शाळा विद्यार्थीअभावी ओस पडताना दिसतात. मात्र, गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या अ.ता.शि.प्र. मंडळाच्या शाळांमध्ये सर्व वर्गांत दोन आकडी विद्यार्थीसंख्या कायम आहे. शिक्षकांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थी केवळ शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होत नाहीत, तर शिष्यवृत्तीधारकही बनतात. गतवर्षी भाल उच्च प्राथमिक शाळेतील रुद्र पवार हा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरला असून, केंद्र शासनाच्या निजामपूर-माणगाव येथील नवोदय विद्यालयात त्याचा प्रवेशही निश्चित झाला आहे. हे यश संस्थेच्या दर्जे दार शिक्षणाचे फलित असल्याचे अजित पवार यांनी नमूद केले.

या लेखन स्पर्धेसाठी इयत्ता दुसरी-तिसरी व इयत्ता चौथी-पाचवी असे दोन गट करण्यात आले होते. त्यात एकूण २८ स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेतील पहिल्या गटात प्रथम क्रमांक उसर प्राथमिक शाळेतील ओवी शिंदे हिने पटकावला असून द्वितीय क्रमांक वढाव शाळेतील ओसिया ठाकूर, तृतीय क्रमांक पवेळे येथील कविता थळे आणि उत्तेजनार्थ क्रमांक शिशुविहार प्राथमिक शाळेतील जान्हवी कारंडे यांनी पटकावला आहे. तसेच, दुसऱ्या गटात प्रथम क्रमांक शिशुविहार प्राथमिक शाळेतील सान्वी बंदरी हिने पटकावला असून द्वितीय क्रमांक भाल शाळेतील अंजली मुंदळकर, तृतीय क्रमांक पवेळे शोळेतील रुद्र पाटील आणि उत्तेजनार्थ शिशुविहार प्राथमिक शाळेतील कायस कुंडी यांनी पटकावला आहे.

यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, वंदे मातरम् पतसंस्था पेणचे अध्यक्ष नरेन जाधव आणि निवृत्त लेखाधिकारी दिलीप देवळेकर यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी आशिष वालेकर, मुख्याध्यापक शिवाजी दराडे, सीताराम जाधव, गुलाब काळे, साधना पाटील, प्रतिभा पाटील, स्नेहा पाटील, कल्याणी वेखंडे यांच्यासह सहशिक्षक विलास पनासे, आपणकर उपस्थित होते.

## तरुणीविरोधात गुन्हा दाखल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

३२ वर्षीय तरुणाच्या डोळ्यांत मिरची पावडर टाकणाऱ्या तरुणीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ३२ वर्षीय तरुण तक्का येथे राहत असून, २०२० मध्ये त्याची ओळख एका तरुणीसोबत झाली आणि त्याचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. मात्र, त्यांच्यात वाद होत असल्याने २०२३ मध्ये तरुणीने ३२ वर्षीय तरुणावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात तरुण जामिनावर आहे. पनवेल रेल्वे स्टेशन येथे तो आला असताना बस डेपोच्या मागे वडील व भावासोबत आलेल्या या तरुणीने त्याच्या डोळ्यांत आणि तोंडावर मिरची पावडर टाकली. या प्रकरणी पोलिसांनी या तरुणी विरोधात गुन्हा नोंद केला आहे.

# कोकाटे तर गेले, पण..

महायुती सरकारला सत्तेत येऊन पाच डिसेंबरला एक वर्ष झाले. या जेमतेम वर्षभरात दोन मंत्र्यांना काढून टाकण्याची वेळ आली आहे. आधी धनंजय मुंडे आणि आता माणिकराव कोकाटे यांची खाती काढून घेतली गेली आहेत. हे दोन्ही मंत्री अजितदादांच्या गटाचे आहेत हा म्हटले तर योगायोग आहे, पण म्हटले तर त्यात काही सूत्रही सापडू शकेल. एकनाथ शिंदे शिवसेना फोडून आल्याने भाजपला त्यांची काहीशी गरज आहे. आमचे हिंदुत्वाचे दुकान हेच मूळ व एकमेव आहे, आणि आमची कोठेही शाखा नाही असा भाजपचा दावा आहे. ठाकरे यांची शिवसेना हा त्यातला मोठा अडसर होता. जोवर ठाकरे सोबत होते तोवर हा अडसर जाचत नव्हता. पण ते विरोधात गेल्यावर पंचाईत झाली. हिंदुत्वाचीच विचारसरणी असूनही ते मोदींवर कडवी टीका करू लागल्याने भाजपची पाचावर धारण बसली. त्यामुळे मग काहीही करून सेनेला फोडणे गरजेचे झाले व शिंदे गटाचा जन्म झाला. शिंद्यांनीही अमित शाह व नरेंद्र मोदी यांची सतत स्तुती करून आपले आसन बळकट ठेवले. आता मुंबई पट्ट्यात ठाकरे गटाशी मुकाबला करण्यासाठी शिंदे यांची गरज भासणार आहे. त्यामुळे तूर्त तरी भाजपला शिंदे गट हा नैसर्गिक मित्र मानून घेणे भाग आहे. अजितदादांकडे यातले काहीच गुण नाहीत. नागपूरला गेले तर ते आणि त्यांचे आमदार संघाच्या मुख्यालयात जाणेदेखील कटाक्षाने टाळतात. त्यामुळे मूलभूत दुरावा कायम आहे. त्यातच दादांच्या गटातल्यांवर जुन्या काळापासून अनेक आरोप आहेत. खुद्द दादांची जलसंधारणाची तसेच सहकारातील सर्व प्रकरणे कुलुपबंद झालेली नाहीत. किंवा अमित शाह व देवेंद्रांनी ती होऊ दिलेली नाहीत. त्यामुळे दादा गट हा भाजपचा सोईचा साथीदार आहे. कोणत्याही क्षणी त्याला गचांडी देता येऊ शकते. यापूर्वी संतोष देशमुख खून प्रकरणात बरीच बदनामी झाल्यानंतर धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिला होता. आता माणिकराव कोकाटे यांचा नंबर लागला आहे.

## सापडलेले चोर

कोकाटे यांनी अल्प उत्पन्नाची खोटी कागदपत्रे करून नाशिकमध्ये दहा टक्के कोट्यातील फ्लॅट मिळवला असा त्यांच्यावर आरोप आहे. त्यांचे सिन्नरमधील विरोधक तुकाराम दिघोळे यांनी त्यांच्याविरुध्दचे हे प्रकरण नेटाने लढवले. वास्तविक मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीने मिळणाऱ्या या फ्लॅट्सचे राज्यभरातले रेकॉर्ड काढले तर त्यात ९५ टक्के प्रकरणात भानगडी व भ्रष्टाचार आढळेल. मंत्री, अधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार यांनी मुंबई, पुणे इत्यादी शहरांमध्ये एकाहून अधिक फ्लॅट्स मिळवलेले दिसतील. त्यासाठी सर्रास खोटी कागदपत्रे सादर केलेली दिसतील. यात कोकाटे हे सापडलेले चोर आहेत. अर्थात, म्हणून त्यांच्याविषयी सहानुभूती बाळगण्याचे कारण नाही. आधी कनिष्ठ न्यायालयाने त्यांना दोन वर्षांची कारावासाची शिक्षा व दंड सुनावला. सत्र न्यायालयाने ती कायम ठेवली. घडली ही गोष्ट उत्तमच झाली. न्यायालयांच्या प्रक्रियेतून दोषींना उशिरा का होईना शिक्षा होतेच अशी जरब बसण्यासाठी याचा उपयोग होईल. मात्र या निमित्ताने भाजपच्या नेत्यांनी केलेल्या अशाच भानगडी कधी तरी बाहेर येतील का असा प्रश्न जनतेने विचारायला हवा. दोन वर्षे कारावासाची शिक्षा झाली तर आमदार वा खासदारकी रद्द करावी अशी तरतूद आहे. यापूर्वी राहुल गांधी यांना बदनामीच्या खटल्यामध्ये सुरतमधील न्यायालयाने अशीच शिक्षा सुनावल्यावर विजेच्या वेगाने त्यांची खासदारकी काढून घेतली गेली होती. त्यांच्या अपिलाची संधी न देता त्यांना बंगलाही रिकामा करायला लावण्यात आला होता. हाच न्याय नंतर भाजपच्या मंत्र्यांना मात्र लावण्यात आला नव्हता. आतादेखील कोकाटे हे अजितदादा गटाचे असल्याने लगोलग त्यांची खाती काढून घेण्याची कारवाई देवेंद्रांनी केली. ते जर भाजपचे असते तर मुळात हा खटला इथपर्यंत आला असता का आणि समजा ते दोषी ठरले असते तर त्यांच्यावर मुख्यमंत्र्यांनी हाच बडगा उगारला असता का हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. अर्थात, खुद्द दादांनाही कोकाटे यांच्याविषयी फार प्रेम आहे असे नव्हे. धनंजय मुंडे हे त्यांच्या निकटचे होते. त्यांना वाचवण्यासाठी दादांनी आटोकाट प्रयत्न केले. पण शेवटी गळ्याशी पाणी आल्यावर त्यांनी त्यांचा बळी दिला. त्या मानाने कोकाटे हे तर अनेक पक्ष फिरून आलेले व फार राजकीय वजन नसलेले आहेत. मात्र दादा गटाच्या प्रतिमेला यामुळे सणसणीत हादरा बसला आहे यात शंका नाही.

## दादा गटाचे चारित्र्य

दादांच्या पक्षाचे चारित्र्य काय आहे हे या निमित्ताने पुन्हा जनतेसमोर आले आहे. तमाम सर्व प्रकारचे भ्रष्टाचार करणारे आणि प्रसंगी खून पाडणारे लोक यांच्या पक्षात आहेत असाच संदेश मुंडे व कोकाटे प्रकरणातून जनतेत जात आहे. खुद्द दादांचा मुलगा पार्थ याचे एक प्रकरण चालू आहेच. पुण्यातील महारवतनाची जमीन स्वस्तात लाटण्याचे प्रकरण आणखी गंभीर होत चालले आहे. ज्या अमेडिया कंपनीत पार्थची ९९ टक्के भागीदारी आहे तिनेच जमीन खरेदी करण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी फिर्यादीमध्ये पार्थविरुध्द तक्रार दाखल केलेली नाही. दादांनी आपले वजन वापरून हे होऊ दिलेले नाही हे उघड आहे. या प्रकरणात एका पैशाची देवाणघेवाण न होताही हा व्यवहार रजिस्टर केला गेला. ही संबंधित अधिकाऱ्याची चूक होती असे सांगून दादा सर्व दोष त्याच्यावर ढकलण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण हे फार दिवस चालणार नाही. आज ना उद्या पार्थची चौकशी करावीच लागेल. अन्यथा एक दिवस अजितदादांनाच बाहेर जावे लागेल. कदाचित पालिका व जिल्हा परिषदा निवडणुका संपल्यानंतर याला गती येईल. पण यातली एक गोष्ट गंमतीशीर आहे. मुंडे काय किंवा कोकाटे काय, हे आणि यांचा पक्ष देवेंद्रांच्या भाजपसोबत सत्तेत असतो. मात्र ते गेले की फक्त दादांचा पक्ष बदनाम होतो हे गमतीशीर आहे. भाजपच्या प्रतिमेला यात काहीही धक्का बसत नाही. आता दादांची पाळी आहे. उद्या मुंबई पालिकेच्या निवडणुका झाल्यानंतर शिंदे गटाची अशीच प्रकरणे बाहेर येणार आहेत. संजय शिरसाट, बांगर, प्रताप सरनाईक यांच्यावर आरोप झाले आहेत. काय झाडी, काय डोंगर म्हणणाऱ्या शहाजी पाटलांवर नुकत्याच धाडी पडल्या होत्या. भाजपचे मंत्री, आमदार यांच्याविरुध्दची प्रकरणे मात्र हसत हसत दडपली जातात. पुण्यात मुरलीधर मोहोळ यांचा जैन बोर्डिंग जमीन घोटाळा बाहेर आल्यावर घाईघाईने त्यावर पडदा टाकला गेला हा ताजा इतिहास आहे. धारावी पुनर्विकासामध्ये उघडपणे अदानीला फायदा होईल अशी कलमे टाकण्यात आली आहेत. त्याला मिठागरे, राष्ट्रीय उद्याने अशा ठिकाणच्या पर्यायी जमिनी पुनर्वसनासाठी दिल्या जात आहेत. समृध्दी, शक्तीपीठ यासारखे मार्ग किंवा मुंबई, पुणे इत्यादी ठिकाणचे असंख्य प्रकल्प यांच्या भानगडी असल्याचा अनेकांचा संशय आहे. पण ही प्रकरणे कधीच पुढे येत नाहीत.

**विचार**

# उद्योग, उत्पादनांची घोडदौड

*कच्च्या तेलाच्या आयातीसाठी भारताने अलिकडेच गयानाची वाट धरली. ही बातमी आंतरराष्ट्रीय व्यवहारांच्या दृष्टीने दखलपात्र ठरली. त्या पाठोपाठ पगाराच्या बाबतीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असल्याची एक नोंद समोर आली. साखरेच्या उत्पादनात यंदा झालेली ४३ टक्क्यांची वाढ ही अशीच एक लक्षवेधी बातमी तर अमेरिकेच्या निर्बंधानंतरही स्मार्टफोनच्या निर्यातीत वाढ होणे, ही जणू सुखवार्ता ठरली.*



**महेश देशपांडे**

अर्थनगरीत सरत्या काळात चर्चा राहिली ती कच्च्या तेलाच्या आयातीसाठी भारताने धरलेल्या गयाना या नव्या देशाच्या वाटेची. त्या पाठोपाठ पगाराच्या बाबतीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असल्याची एक नोंद समोर आली. साखरेच्या उत्पादनात यंदा झालेली ४३ टक्क्यांची वाढ ही अशीच एक लक्षवेधी बातमी तर अमेरिकेच्या निर्बंधानंतरही स्मार्टफोनच्या निर्यातीत वाढ होणे, ही जणू सुखवार्ता ठरली.

अमेरिकेने रशियावर निर्बंध लादल्यापासून, भारताला अडचणींचा सामना करावा लागत आहे. भारताला आता दूरच्या देशांकडून कच्चे तेल खरेदी करावे लागत आहे. ब्लूमबर्ग शिप-ट्रॅकिंग डेटानुसार, भारताने आता गयानामधून कच्चे तेल खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. यासाठी भारतीय टँकरना अंदाजे ११ हजार मैल (१७,७०० किलोमीटर) अंतर प्रवास करावा लागतो. अहवालांनुसार, कोबाल्ट नोव्हा आणि ऑलिंपिक लायन या दोन मोठ्या कच्च्या तेलवाहू जहाजांनी नोव्हेंबरच्या अखेरीस दक्षिण अमेरिकेतील गयाना या देशातून प्रवास सुरू केला. प्रत्येकी अंदाजे २० दशलक्ष पिंप तेल घेऊन निघालेले हे टँकर जानेवारीमध्ये भारतात पोहोचणार आहेत. ट्रॅकिंग डेटावरून दिसून येते, की २०२१ नंतर गयानाहून भारतात येणारी कच्च्या तेलाची ही पहिलीच शिपमेंट आहे. त्या काळात १० दशलक्ष कच्चे तेल वाहून नेणारे दोन कार्गो निघाले. भारत दररोज अंदाजे १.७ दशलक्ष पिंप रशियन तेल आयात करतो; परंतु गेल्या महिन्यांमध्ये 'रोझनेफ्ट पीजेएससी' आणि 'लुकोइल पीजेएससी' या रशियाच्या दोन सर्वात मोठ्या निर्यातदारांवर अमेरिकेने निर्बंध लादल्याने भारतीय रिफायनर कंपन्यांमध्ये चिंता वाढली.

यापूर्वी, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन कच्च्या तेलाच्या खरेदीमुळे भारतावरील आयात शुल्क ५० टक्के केले होते. रशियाकडून तेल सवलतीत उपलब्ध होते. भारत हा जगातील कच्च्या तेलाचा तिसरा सर्वात मोठा खरेदीदार आहे. भारताने गेल्या वर्षी रशियाकडून ५२.७ अब्ज डॉलर किमतीचे कच्चे तेल खरेदी केले होते. ते रशियाच्या एकूण निर्यातीच्या ३७ टक्के आहे. रशियाव्यतिरिक्त, भारत इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, नायजेरिया आणि युनायटेड स्टेट्समधूनदेखील कच्चे तेल आयात करतो. तथापि, भारताला रशियाकडून सवलतीच्या दराने कच्चे तेल मिळते. २०२२-२३ मध्ये भारताला रशियन तेलावर सरासरी १४.१ टक्के आणि २०२३-२४ मध्ये १०.४ टक्के सूट मिळाली. यामुळे भारताची अंदाजे पाच अब्ज डॉलरची बचत होते. गयानाच्या 'गोल्डन ॲरोहेड क्रूड'चे मालवाहू ऑलिंपिक लायन हे जहाज भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील पारादीप येथे येत आहे. तिथे सरकारी मालकीची 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन' तीन लाख पिंप कच्च्या तेलावर दररोज प्रक्रिया करते. या कंपनीने ऑक्टोबरमध्ये निविदा काढत 'एक्सॉनम ोबिल इंक.'कडून कच्चे तेल खरेदी केले. 'लिझा' आणि 'युनिटी गोल्ड ग्रेड'चा मिश्र माल वाहून नेणारी कोबाल्ट नोव्हा मुंबई किंवा विशाखापट्टणम येथे उतरवण्याची शक्यता आहे. तिथे हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशनचा प्लांट आहे. कंपनीने डिसेंबरच्या अखेरीस आणि जानेवारीच्या सुरुवातीच्या काळात डिलिव्हरीसाठी या प्रत्येक ग्रेडचे दहा लाख पिंप कच्चे तेल खरेदी केले. 'आरपीजी ग्रुप'चे अध्यक्ष हर्ष गोएंका यांनी केलेल्या एका पोस्टमुळे 'सोशल मीडिया'वर कोणत्या राज्यांमध्ये सर्वाधिक कमाई होते आणि कुठे उत्पन्न कमी राहते, याबद्दल जोरदार चर्चा सुरू झाली. राज्यनिहाय सरासरी मासिक पगार मांडताना ते म्हणाले की, प्रत्येक भारतीयाचे, विशेषतः तळागाळातील लोकांचे उत्पन्न वाढले, तरच भारत समृद्ध होईल. गोएंका यांनी शेअर केलेल्या 'फोर्ब्स ॲडव्हायझर इंडिया'च्या ताज्या आकडेवारीनुसार, २०२५ पर्यंत भारताचे सरासरी मासिक उत्पन्न २८ हजारांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. तथापि, राज्यांचा विचार केल्यास सरासरी मासिक पगार ३५ हजार रुपयांसह देशाची राजधानी दिल्ली, यादीमध्ये अव्वल आहे. कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर असून तिथे सरासरी मासिक पगार ३३ हजार रुपये प्रति महिना आहे. त्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक येतो. महाराष्ट्रात सरासरी ३२ हजार रुपये पगार आहे. तेलंगणाचा चौथा क्रमांक असून तिथे ३१ हजार रुपये पगार आहे. मुंबई आणि पुण्यातील व्यावसायिक क्रियाकलाप आणि हैदराबादमधील आयटी तेजी या राज्यांमध्ये सरासरी उत्पन्न वाढवत आहे. भारतातील सर्वात कमी सरासरी मासिक उत्पन्न बिहारमध्ये नोंदवले गेले आहे. ते उत्पन्न दरमहा फक्त १३ हजार पाचशे रुपये आहे. त्यानंतर अंदमान आणि निकोबार (१३ हजार) आहे. मर्यादित रोजगार, लघु उद्योग आणि या क्षेत्रातील कमी गुंतवणुकीमुळे लोकांचे सरासरी उत्पन्न इतर राज्यांपेक्षा कमी आहे. दक्षिण भारत रोजगार आणि उत्पन्न या दोन्हीमध्ये पुढे आहे. तामिळनाडूम ध्ये सरासरी मासिक वेतन २९ हजार रुपये, आंध्र प्रदेशमध्ये २६ हजार रुपये तर केरळमध्ये २४५०० रुपये आहे. आता आणखी एक दखलपात्र बातमी. ऑक्टोबरमध्ये सुरू झालेल्या साखर हंगामाच्या पहिल्या दोन महिन्यांमध्ये देशातील साखर उद्योगाने चांगली काम गिरी केली आहे. ताज्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी ऑक्टोबर आणि नोव्हेंबरम ध्ये भारतातील साखर उत्पादनात ४३ टक्के वाढ झाली आहे. 'इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' (इस्मा) नुसार, नोव्हेंबर अखेरपर्यंत देशातील साखर कारखान्यांनी एकूण ४१ लाख टन साखरेचे उत्पादन केले. गेल्या वर्षी याच काळात हा आकडा फक्त २८ लाख ऐंशी हजार टन टन होता. देशातील सर्वात मोठा साखर उत्पादक महाराष्ट्रातील उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत तिप्पट वाढून १७ लाख टनांवर पोहोचले आहे. उत्तर प्रदेशमधील कारखान्यांनीही चांगली कामगिरी केली आहे. तिथले उत्पादन नऊ टक्क्यांनी वाढून १४ लाख टन झाले आहे. 'नॅशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज' (एनएफसीएसएफ) ने अहवाल दिला, की या वर्षी उसाची गुणवत्ता चांगली आहे. साखर उतारा गेल्या वर्षीच्या ८.२९ टक्क्यांवरून ८.५१ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ही कारखान्यांसाठी तांत्रिकदृष्ट्या चांगली बातमी आहे. दरम्यान, 'इस्मा'ने सरकारला देशांतर्गत बाजारात साखरेची किमान विक्री किंमत (फ्लोअर प्राईस) वाढवण्याची विनंती केली आहे. त्यांचा युक्तिवाद आहे, की गेल्या सहा वर्षांपासून ही किंमत स्थिर आहे, तर उत्पादन खर्च सतत वाढत आहे.

इथे एका खस बातमीची दखल घ्यायला हवी. जागतिक आव्हाने असूनही, ऑक्टोबरमध्ये भारतातून अमेरिकेला स्मार्टफोन निर्यात वाढली. गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील निर्यातीच्या तुलनेत ती १.४७ अब्ज डॉलरवर पोहोचली. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये निर्यात ०.४६ अब्ज डॉलर होती. या आर्थिक वर्षात एप्रिल-ऑक्टोबर दरम्यान अमेरिकेला एकूण १०.७८ अब्ज डॉलरची स्मार्टफोन निर्यात झाली. ती गेल्या वर्षीच्या याच कालावधीमध्ये ३.६० अब्ज डॉलर होती. मासिक आधारावर शिपमेंट कमी होत होती; परंतु आता त्यात सुधारणा झाली आहे. एप्रिलमध्ये ती १.६५ अब्ज डॉलर तर मेमध्ये २.२९ अब्ज डॉलरची निर्यात होती; परंतु जूनमध्ये निर्यात १.९९ अब्ज डॉलर्स, जुलैमध्ये १.५२ अब्ज डॉलर्स, ऑगस्टमध्ये ०.९६ अब्ज डॉलर्स आणि सप्टेंबरमध्ये ०.८८ अब्ज डॉलर्सपर्यंत घसरली. एका अधिकाऱ्याने सांगितले, की टॅरिफशी संबंधित अनिश्चिततेमुळे मागणी आणि किंमतींवर दबाव असूनही, गती मजबूत राहिली आहे. अमेरिकेला होणारी ही निर्यात सकारात्मक वाढ नोंदवत आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये ती ०.६६ अब्ज डॉलर्स, मे २०२४ मध्ये ०.७६ अब्ज डॉलर्स, गेल्या वर्षी जूनमध्ये ०.५९ अब्ज डॉलर्स, जुलै २०२४ मध्ये ०.४९ अब्ज डॉलर्स, ऑगस्ट २०२४ मध्ये ०.३९ अब्ज डॉलर्स आणि सप्टेंबर २०२४ मध्ये ०.२६ अब्ज डॉलर्स होती. एप्रिल-ऑक्टोबर २०२५ मध्ये भारताची जागतिक स्मार्टफोन निर्यात १०.६८ अब्ज डॉलर्सवरून १५.९५ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. ही वाढ ४९.३५ टक्के आहे. जागतिक बाजारपेठेत सातत्याने दोन अंकी वाढ दिसून आली आहे.

# ज्ञानसूर्याच्या प्रकाशात भविष्याचा वेध

**सुयोग आंग्रे**

१८३५ मध्ये थॉमस बॅबिंग्टन मॅकॉले यांनी त्यांच्या प्रसिद्ध 'मिनिट ऑन एज्युकेशन' मध्ये लिहिले, तेव्हा कदाचित त्यांच्या काही ओळींचा भारतातील शैक्षणिक रचना, भाषा, विचार आणि मानसिकता यावर शतकानुशतके इतका खोलवर प्रभाव पडेल, असा अंदाजही त्यांना आला नव्हता, पण घडले तेच. एका छोट्याशा चिठ्ठीने भारताच्या विशाल आणि बहुभाषिक शिक्षण परंपरेला धक्का दिला. ब्रिटिश राजवटीपूर्वी भारतातील शिक्षण हे नैसर्गिक, स्थानिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या जोडलेले होते. गुरुकुल, शाळा, गुरु-शिष्य परंपरा, वैदिक गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, तर्कशास्त्र - हे सर्व भारतीय भाषांमध्ये विकसित झाले. हा शैक्षणिक विकास वृद्धिंगत होत आज भारताचा ज्ञानसूर्य जगावर राज्य करताना दिसत आहे. मूल स्वतःच्या भाषेत विचार करायचे, शिकायचे आणि जीवनाचे ज्ञान मिळवायचे. ज्ञान हे केवळ पुस्तके आणि हस्तलिखितांपुरते मर्यादित नव्हते तर ते जीवनाचा आणि संस्कृतीचा एक भाग होता. ईस्ट इंडिया कंपनीला सुरुवातीला शिक्षणात फारसा रस नव्हता, पण हळूहळू इंग्रजांना समजले की भारतासारखा प्रचंड देश केवळ बळावर चालवता येत नाही, तर केवळ शिक्षण आणि संस्कृती बदलून चालवता येत नाही. इथूनच भारतीय समाजाला इंग्रजी भाषा आणि पाश्चात्य विचारसरणीच्या कक्षेत ढकलण्याचे धोरण सुरू झाले. मॅकॉले यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की पाश्चात्य साहित्य आणि विज्ञान सर्वोच्च आहेत आणि भारतीय साहित्य परंपरा 'कनिष्ठ' आहेत. त्यात म्हटले आहे की, 'रक्त आणि रंगाने भारतीय, पण विचार आणि हितसंबंध इंग्रजी' असा वर्ग निर्माण करणे हे सरकारचे उद्दिष्ट असले पाहिजे. स्थानिक भाषांमध्ये दिलेले शिक्षण भारतीय समाजाला एकसंध ठेवते हे ब्रिटिशांना माहीत होते. त्यामुळे इंग्रजीला आधुनिक आणि श्रेष्ठ घोषित करण्यात आले आणि प्रशासन, न्यायव्यवस्था आणि उच्च शिक्षणातून भारतीय भाषा हळूहळू काढून टाकण्यात आल्या. इंग्रजी ही उच्च शिक्षणाची एकमेव शिडी बनली आणि भारतीय भाषा केवळ 'गृहभाषा' म्हणून पार्श्वभूमीवर ढकलल्या गेल्या. देश स्वतंत्र झाला पण वारसाहक्काने मिळालेली शिक्षण व्यवस्था पूर्णपणे ब्रिटिश मॉडेलवर आधारित होती. धोरणकर्ते स्वतः त्याच वसाहतवादी चौकटीत शिकलेले होते. अनेक इंग्लंड, युरोप किंवा भारतातील इंग्रजी मॉडेल विद्यापीठांची उत्पादने होती. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर शैक्षणिक सुधारणेची दिशा बदलली, पण रचना आणि विचार तेच राहिले. हा प्रभाव इतका खोल होता की आजही अनेक कुटुंबे इंग्रजी माध्यमाला 'चांगल्या जीवनाचे' प्रतीक मानतात. स्वातंत्र्यानंतर मोठमोठे कमिशन तयार झाले, पण युरोपीयन मॉडेलचा दृष्टिकोन राहिला. १९४८ ची राधाकृष्णन समिती, १९६४-६६ चा कोठारी आयोग, १९६८ आणि १९८६ ची राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे आणि २००५ मधील राष्ट्रीय ज्ञान आयोगापर्यंत ही प्रवृत्ती कायम राहिली. या सगळ्यातून शिक्षणात काही सुधारणा केल्या गेल्या, पण रचना तशीच राहिली. इंग्रजी शिक्षणावर केंद्रित पाश्चिमात्य शिक्षण आणि इमॅलीमिक स्ट्रक्चरल परीक्षा. जवाहरलाल नेहरू विद्यापीठासारख्या संस्थांसह स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेली अनेक विद्यापीठे ब्रिटीश आणि युरोपियन विद्यापीठांच्या मॉडेलने आकारली गेली. इथेही काही भारतीय भाषा 'अभ्यासाचा विषय' बनू शकतात, पण 'ज्ञानाची भाषा' बनू शकत नाहीत. इंग्रजीवर आधारित शिक्षणामुळे भारतीय भाषा, विशेषतः संस्कृत, हिंदी आणि इतर भारतीय भाषा हळूहळू उच्च शिक्षणात खालच्या स्तरावर गेल्या. १९९१ नंतर शिक्षणात खाजगी क्षेत्राच्या प्रवेशामुळे इंग्रजी शिक्षणाला अधिक चालना मिळाली. खासगी शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाला स्टेटस सिम्बॉल बनवण्यात आले. सरकारी शाळा भारतीय भाषांपुरत्या मर्यादित झाल्या. हीच मानसिकता मेकॉलेच्या धोरणात रुजलेली होती. नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे पहिले धोरण आहे ज्यामध्ये भारतीय भाषा ही शिक्षणाची मूलभूत भाषा असावी, मातृभाषेतील शिक्षणाला चालना मिळावी, भारतीय ज्ञान-तत्त्वज्ञान, कला, गणित, साहित्य मुख्य प्रवाहात यावे, शिक्षण हे कौशल्य आणि समज यावर आधारित असावे, रॉट लर्निंगवर आधारित नाही. यामध्ये ५+३+३+४ ची नवीन रचना उदयास आली, जी भारतीय बालपण, शिक्षणाचे स्वरूप आणि भाषा-मानसशास्त्र यांच्याशी जुळते. उच्च शिक्षणातील बहुविद्याशाखीय विद्यापीठांची कल्पना गुरुकुल आणि तक्षशिला यांच्या परंपरेसारखीच आहे. भारतीय शिक्षण आपल्या मुळांकडे परत येत आहे आणि भारतीय मन वसाहतीच्या छायेतून बाहेर येण्याच्या तयारीत आहे. हे राष्ट्रीय पुनर्जागरणाचे लक्षण आहे. जिथे शिक्षण भारतीय असेल, भाषा भारतीय असेल आणि भविष्य भारतीय ज्ञानाच्या प्रकाशात लिहिले जाईल. ५+३+३+४ फ्रेमवर्क पारंपारिक १०+२ प्रणालीची जागा शालेय शिक्षणाला चार टप्प्यात विभागून घेत. ५ वर्षांचा पाया टप्पा (३ वर्षे प्री-स्कूल वर्ग १-२), ३ वर्षांचा तयारीचा टप्पा (वर्ग ३-५), ३ वर्षांचा मध्यम टप्पा (इयत्ता ६-८) आणि ४-वर्षीय द्वितीय टप्पा (वर्ग १-२). तीन वर्षांच्या वयापासून संरचित शिक्षणासह मुलांच्या संज्ञानात्मक विकासावर लक्ष केंद्रित करून सर्वांगीण आणि व्यावहारिक शिक्षण देणे हे ध्येय आहे.

**लोकसंसद**

## नशेला प्रोत्साहन देणारा 'सनबर्न फेस्टिव्हल'

आशिया खंडातील सर्वात मोठा इलेक्ट्रॉनिक डिजिटल म्युझिक शो म्हणून ख्याती असलेला सनबर्न फेस्टिवल १९ तारखेपासून मुंबईतील शिवडी परिसरात सुरु होत आहे. यापूर्वी गोव्यात आणि त्यानंतर पुण्यात झालेल्या या फेस्टिवलच्या निमित्ताने अनेक वाद चव्हाट्यावर आले होते ज्यांचे निराकरण अद्यापही झाले नसताना महाराष्ट्र सरकारने या फेस्टिवलला दिलेली परवानगी मनात संशय निर्माण करणारी आहे. या फेस्टिवलविषयी अधिक माहिती जाणून घेण्याकरिता गूगल सर्फींग केले असता या फेस्टिवल दरम्यान घडलेल्या अनेक धक्कादायक बाबी लक्षात आल्या. मुंबईत होणाऱ्या या फेस्टिवलचे एका दिवसाचे तिकीटदर २ हजार रुपयांपासून आठ लाख २६ हजारापर्यंत आहेत. जेव्हढी महागडी तिकीट काढू तितक्या लक्झरी सेवा आयोजकांकडून पुरवण्यात येणार आहेत. लक्झरी सेवांचा दर जसा वाढतो तशी आयोजकांकडून देण्यात येणाऱ्या मद्याच्या बाटल्यांची संख्याही वाढत जाते. सनबर्नच्या संकेतस्थळावरील छायाचित्रे पाहिल्यावर अनेक छायाचित्रांत मद्यधुंद अवस्थेतील तरुणी तोकड्या कपड्यांत नाचताना दिसतात. मुंबईत या फेस्टिव्हलच्या प्रवेशाकरिता १६ वर्षांची किमान मर्यादा ठेवण्यात आली आहे. मद्य घेण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क विभागाने २१ वर्षे वयाची अट आखून दिली असताना मद्याचा मुक्त वापर होतअसलेल्या या फेस्टिवलला १६ वर्षापर्यंतची सूट दिलीच कशी हाही प्रश्न यानिमित्ताने निर्माण होतो. पौगंडावस्थेतील मुला मुलींनी तोकड्या कपड्यात या ठिकाणी यावे आणि मद्यधुंद व्हावे यासाठी या फेस्टिवलचीं जाहिरात प्रोत्साहन देत आहे. या फेस्टिवलचा इतिहास पाहता याठिकाणी मद्यासह अमली पदार्थही छुप्या मार्गाने पुरवले जातात. एकूणच राज्याच्या मुलामुलींना नशेखोरीकडे नेण्याचे षडयंत्रच या फेस्टिवलच्या माध्यमातून आखले आहे की काय असा प्रश्न पडल्यावाचून राहात नाही. युवापिढीला नासवणाऱ्या सनबर्न फेस्टिवलच्या विरोधात संस्कृतीप्रेमी युवकांचा समूह एकवटला आहे. सोशल मीडियावर या फेस्टिवलचे धोके समजावून सांगितले जात आहेत. या फेस्टिवलचीं परवानगी रहित करण्याची मागणी केली जाऊ लागली आहे. युवावर्गाचा एकूणच रोष पाहता सरकारने सनबर्नला मुंबईत दिलेलया परवानगीचा फटका महायुतीला मुंबई महानगरपालिका निवडणुकीला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- नरेश घरत, चेंबूर**

**दिनविशेष**

# भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभा पाटील

महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात नाडगांव या खेडे गावात श्रीमती प्रतिभा देविसिंह पाटील यांचा जन्म १९ डिसेंबर १९३४ साली झाला. त्या २५ जुलै २००७ रोजी भारतीय गणराज्याच्या १२ व्या राष्ट्रपती म्हणून विराजमान झाल्या. त्यांनी इ.स. २००७ ते इ.स. २०१२ मध्ये राष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळली होती. भारताच्या राष्ट्रपतीपदावर नेमल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला होत्या.



प्रतिभा पाटील यांनी आपल्या जीवनाची सुरुवात समाजकार्याने केली व नंतर गांधीवादी विचारामुळे सक्रीय राजकारणात सहभागी झाल्या. राष्ट्रपती होण्यापूर्वी त्या राजस्थानच्या १६व्या राज्यपाल व प्रथम महिला राजस्थान राज्यपाल होत्या. तत्पूर्वी त्या राज्यसभेच्या उपसभापती व इ.स. १९६२ ते इ.स. १९८५ दरम्यान महाराष्ट्राच्या विधानसभेत आमदार व विविध खाताच्या मंत्री होत्या.

श्रीमती पाटील यांनी अनेकदा विविध भूमिकांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले. त्या नैरोबी आणि पुर्तो रिको येथे समाजकल्याणाशी निगडीत आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी झाल्या. १९८५ मध्ये बल्गेरिया येथे गेलेल्या आखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या शिष्टमंडळात त्या सदस्य म्हणून सहभागी झाल्या, तसेच १९८८ ला लंडन येथे कॉमनवेल्थ प्रीसायडींग ऑफिसर्सच्या परिषदेत देखील त्यांचा सहभाग होता. १९८५ मध्ये बिजिंग, चीन येथे पार पडलेल्या 'जागतिक महिला परिषदेत' श्रीमती प्रतिभाताईंनी भारताचे प्रतिनिधित्व केले तसेच ऑस्ट्रिया येथील 'महिलांचा दर्जा' या विषयावरील परिषदेत त्यांनी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. श्रीमती पाटील यांनी जळगाव जिल्हा सत्र न्यायालयात सनदी वकील म्हणून आपल्या व्यावसायिक कारकीर्दीचा आरंभ केला. त्यासोबतच त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये विशेषतः शोषित महिलांच्या उद्धारासाठी स्वतःला झोकून दिले. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात गरीब आणि गरजू महिलांसाठी श्रीमती पाटील यांनी संगीत, संगणक व शिवणकला वर्ग सुरु केले.

आपल्या संपूर्ण सामाजिक जीवनात श्रीमती पाटील यांनी महिलाविकास, बालकल्याण व समाजातील वंचित घटकासाठी अतोनात प्रयत्न केले. त्यांच्या हितासाठी श्रीमती प्रतिभाताईंनी अनेक संस्था उभारल्यात. जसे की, मुंबई आणि दिल्ली येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे, ग्रामीण भागातील तरुणांसाठी जळगाव येथे अभियांत्रिकी महाविद्यालय, महिला विकासाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी त्यांनी धर्मादाय संस्था स्थापन केली, जळगाव येथे अंध औद्योगिक प्रशिक्षण केंद्र स्थापन केले, अमरावती जिल्ह्यात भटक्या व विमुक्त जातीतील व मागासवर्गातील मुलांसाठी शाळा आणि दुर्गापूर, अमरावती येथे शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी कृषी विज्ञान केंद्र उभारले.

पाटील यांनी एकूण १५ पुस्तके लिहिली आहेत. त्यांत मराठीतील मभारत जागवाफ, हिंदीमधील 'भारत जगाओ' या पुस्तकांचे प्रत्येकी ६ खंड, 'जब मैं राष्ट्रपति थीं' (२ खंड) आणि मस्त्री उत्कर्ष की ओरफ या पुस्तकांचा समावेश आहे. या पुस्तकांमध्ये प्रतिभाताईंनी देश-विदेशांत दिलेली हिंदी-मराठी-इंग्रजीतील भाषणे व अन् व्याख्याने समाविष्ट करण्यात आली आहेत.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१९ डिसेंबर**

१) श्रीम. अलका अशोक पाटील चेंढरे, अलिबाग, १९-१२-१९५३
२) श्रीम. विठाबाई लक्ष्मण बना अलिबाग, १९-१२-१९५२
३) श्रीम. शिला भालचंद्र रोकडे अलिबाग, १९-१२-१९४१
४) श्री. मिलिंद भालचंद्र सुळे अलिबाग, १९-१२-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**विमल सॉ मिल, उचेडे पेण**

## भगवान बडेकर यांचे निधन

**रसायनी :** वाशिवली येथील भगवान गोविंद बडेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ६६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने बडेकर कुटुंबासह वाशिवली गावावर शोककला पसरली आहे. त्यांचे दशक्रियाविधी रविवार दि. २२ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे करण्याचे योजिले आहे. मंगळवार दि.२३ डिसेंबर रोजी दिलीप राणे यांचे किर्तन होणार आहे. तर उत्तरकार्य बुधवार (दि.२४) डिसेंबर रोजी वाशिवली येथील राहत्या घरी होणार आहे. यावेळी सकाळी १० ते ११ या वेळात रामदास पाटील यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होईल. त्यांच्या पश्च्यात एक भाऊ, पत्नी, दोन मुले,तीन मुली असा परिवार आहे



# परप्रांतीय मच्छिमारांची घुसखोरी

**● जिल्ह्यातील मासेमारी मोजतेय अखेरची घटका ●खवय्यांना मासळी चढ्या दराने करावी लागते खरेदी**

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**परप्रांतीय अत्याधुनिक मच्छिमार नौकांची घुसखोरी, धोक्याच्या इशाऱ्यामुळे मासेमारी वरचेवर बंद राहू लागली आहे. मासेमारीसाठी समुद्रात जाणाऱ्या स्थानिक नौकांना मासळी मिळेनासी झाली आहे. त्यामुळे फिशींग, रापण मासेमारीपाठोपाठ मासेमारी उद्योगसुद्धा अखेरच्या घटका मोजू लागला आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून या मासेमारीवर उभा असलेला छोटा-मोठा व्यवसाय अडचणीत आला आहे. याचवेळी खवय्यांना सुद्धा मासळी चढ्या दराने खरेदी करावी लागत आहे.**



रत्नागिरी जिल्ह्याला १६७ कि.मी. चा सागरी किनारा लाभला असून जिल्ह्यात ३ हजार ३८७ मच्छिमार नौका आहेत. यामध्ये सुमारे ३९० पर्ससीन आणि मिनी पर्ससीननौका आहेत. दरवर्षी १ सप्टेंबर रोजी मासेमारीसाठी पर्ससीननौका समुद्रात जातात. यावर्षी पावसाळा लांबल्याने नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात पूर्ण क्षमतेने मासेमारी सुरु झाली. त्यानंतर चक्रीवादळांचा धोका, मतलई वारे आणि समुद्रात उसळणाऱ्या मोठ मोठ्या लाटांमुळे नौका मालकांनी स्वतःहून मासेमारी बंद ठेवली. त्यामुळे गेल्या साडेतीन महिन्यात दीड दोन महिनेच मासेमारी करता आली. गोवा, मलपी, गुजरात, कर्नाटकच्या अनेक अत्याधुनिक नौका जिल्ह्याच्या समुद्रात मासेमारीसाठी घुसखोरी करत आहेत. परप्रांतीय एका नौकेचे क्षमता स्थानिक १० नौकांच्या बरोबरीची असते.

शेकडो परप्रांतीय नौका समुद्रातील लहान - मोठा मासा खरडवून नेत आहेत. खोल समुद्रात या परप्रांतीय नौका एलईडी मासेमारीसुद्धा करतात. मतलई वाऱ्यामुळे सध्या पर्ससीन नौकांना मासळी मिळत नाही. या नौका समुद्रातून बंदरात परत येतात. परिणामी ५०० रु. किलो दराने मिळणारी सुरमई १००० ते १२०० रु. किलो दराने मिळू लागली आहे. ज्या बांगड्याचा एका टपाचा दर अडीच हजार रुपये होता तो ५ हजार रु. पर्यंत पोहचला आहे. पापलेटचे दर्शन दुर्मिळच झाले आहे. ४०० रु. किलो दराने मिळणारा सरंगा ६०० ते ७०० रु. पर्यंत पोहचला आहे. ३०० रु. दराच्या कोळंबीचा किलोचा भाव ५०० ते ६०० रु झाला आहे.

मासळी मिळत नसल्याने पारंपरिक फिशिंग आणि रापण नौका बंद होण्याच्या मार्गावर आहेत. नौकेला मालकांना मासेमारीसाठी ६० ते ७० हजार रुपये खर्च येतो. यामध्ये खलाशी, तांडेल, पागी यांचे जिन्नस, इंधन, पाणी, बर्फ आदी खर्चाचा समावेश आहे. परप्रांतीय नौका एकदा समुद्रात मासेमारीसाठी आल्या की महिनाभर मासेमारी करुन बंदरात जातात. त्यामुळे परप्रांतीय अद्यावत एक नौका स्थानिकांच्या १० नौकांचा मासा किंवा मासळी उद्योग हिरावून नेत आहेत.

### अनेक पूरक उद्योग धोक्यात

जिल्ह्यातील मासेमारीवर बर्फ, टेम्पो, बंदरावरील विविध दुकाने असे अनेक पुरक उद्योग अवलंबून आहेत. मासेमारीच अडचणीत आली असल्याने पुरक उद्योगही धोक्यात आले आहेत. या सर्व घडामोडींचा परिणाम स्थानिक पातळीवर मिळणाऱ्या मासळीच्या दरावरसुद्धा होत आहे. त्यामुळे समुद्र असतानाही येथील खवय्यांना चढ्यादराने मासळी विकत घेण्याची वेळ आली आहे.



## थंडीमुळे ऊबदार कपड्यांचा वापर

**। दापोली । प्रतिनिधी ।**

गेल्या काही दिवसांपासून हिवाळ्याचा प्रभाव अधिक तीव्र होत चालला आहे. सलग तीन दिवस किमान तापमानात घट होत असून सकाळी, संध्याकाळी जाणवणारा गारवा दापोलीकरांना अक्षरशः चांगलाच झोंबत आहे. मंगळवारी ८.७ अंश, बुधवारी ७.२ अंश आणि गुरुवारी तब्बल ६.२ अंश सेल्सियस इतकी किमान तापमानाची नोंद झाली आहे. पहाटे समुद्रकिनाऱ्यावर गारठा जाणवतो, धुक्याची हलकी चादर पसरते आणि वातावरणातील थंडी हिवाळा दापोलीत पोहोचला याची खूण देते. दरम्यान, रात्री थंडीचा कडाका वाढत असला तरी दिवसा कमाल तापमान ३० ते ३२ अंश सेल्सियस दरम्यान स्थिर असल्याने दुपारी वातावरण तुलनेने उबदार राहते. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी जास्तीत जास्त गारवा जाणवत असून स्थानिक नागरिकांमध्ये उबदार कपड्यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

## मलंगगड परिसरातील वनसंपदा जळून खाक

**। नेवाळी । प्रतिनिधी ।**



अंबरनाथ तालुक्यातील खरड गावाच्या हद्दीतील डोंगरावर मंगळवारी सकाळी लागलेल्या वणव्याने थैमान घातले. यामुळे श्री मलंगगड परिसरातील वनसंपदा जळून खाक झाली. सकाळच्या सुमारास लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण करत डोंगर उतारावर पसरलेल्या गवताळ भागासह झुडपे व लहान वृक्ष जळून खाक केली आहेत. आगीचे लोळ आणि दाट धुराचे लोट दूरवरून दिसत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. डोंगरावर वणवा लागल्याची माहिती बदलापूर वनविभागाच्या वनरक्षकांना मिळताच आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

श्री मलंगगड परिसर हा निसर्गसंपन्न आणि जैवविविधतेने समृद्ध मानला जातो. या भागात नेहमीच विविध वन्यप्राणी, पक्षी तसेच दुर्मिळ वनस्पती आढळतात. मात्र सातत्याने होणाऱ्या वणव्यांमुळे येथील वनसंपदेवर गंभीर संकट ओढावले आहे. या आगीत मोठ्या प्रमाणावर वनस्पती जळाल्याने नैसर्गिक अधिवासाचे नुकसान झाले असून, वन्यजीवांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांत या परिसरात तीन बिबट्यांचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, अशा प्रकारे वणवे सुरू राहिल्यास बिबट्यांसह अन्य वन्यप्राणी मानवी वस्तीत शिरण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

आगीची माहिती मिळताच बदलापूर वनविभागाच्या वनरक्षकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने आणि अथक प्रयत्नांनंतर दुपारच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवण्यात वनविभागाला यश आले आहे. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नसली, तरी वनसंपदेचे नुकसान झाले आहे. वणव्यांचे वाढते प्रकार पाहता येथे नियमित गस्त, जनजागृती आणि दोषींवर कठोर कारवाईची गरज असल्याची मागणी पर्यावरणप्रेमी, नागरिकांकडून होत आहे.

## अजिवली येथे हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुका तसेच नवी मुंबई, ठाणे आणि रायगड पंचक्रोशीमध्ये लौकिक प्राप्त केलेला अखंड हरिनाम सप्ताह यावर्षीही अत्यंत उत्साहात सुरू होत आहे. श्री संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ, अजिवली, पनवेल परिसरातर्फे आयोजित हा सप्ताह गुरुवार दि.१८ डिसेंबर रोजी सकाळी काकड आरतीने प्रारंभ होणार असून गुरुवार दि.२५ डिसेंबर रोजी सांगता होणार आहे.

२०११ साली स्थापन झालेल्या श्री संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळाचे हे १५ वे वर्ष असून, या पंधरा वर्षांत मंडळाने हरिनामाचा जागर घरोघरी पोहोचविण्याचा सातत्यपूर्ण व प्रशंसनीय उपक्रम राबविला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सप्ताह पंचक्रोशीतील भक्तजनांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे भव्यतेने पार पडणार आहे. हा सप्ताह रोज सकाळी काकड आरतीने (सकाळी ४ ते ५ वा.) सुरू होईल.त्यानंतर हरिपाठ सकाळी ८ ते ११ वा. ज्ञानेश्वरी पारायण, तर रात्री ९ ते ११ वा. हरिकीर्तन असे नियोजन आहे. याव्यतिरिक्त दुपारी दु. ४ ते ५ वा. नामवंत प्रवचनकारांचे प्रवचन आणि रात्री विविध कीर्तनकारांचे हरिकीर्तन होणार आहे. या आठ दिवसांत हरिनामाच्या अखंड गजरात संपूर्ण परिसर भक्तिरंगात न्हाऊन निघणार आहे.



## महिलांसाठी लाठीकाठी स्पर्धा

**। उरण । प्रतिनिधी ।**

शिव प्रतिष्ठान करंजाडे व शिव मावळे यांच्या संकल्पनेतून करंजाडेमधील महिलांसाठी लाठी काठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धा मोठ्या आनंदमय वातावरणात संपन्न झाल्या. कार्यक्रलाला मोठ्या प्रमाणात महिला आणि मुलींनी सहभाग घेतला होता. यावेळी शिव प्रतिष्ठान व शिव मावळे प्रतिष्ठान स्थापन करण्यामागील एकच हेतू आहे की समाजातील महिलांनी स्वतःच रक्षण स्वतः कसे करावे हे यातून साध्य करण्यात आले. कार्यक्रमाला शिव प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील,सुनील अंबावडे, संदीप पाटील, अविनाश ठोसर, राकेश कुसळे, सुरेश बार्वे, अमर कुसळे, पवार, रोहन शिर्के, शंतनू कदम, दिपक चौधरी, आनंद पुजारी, अथर्व घाडगे, ओंकार आदी मान्यवर उपस्थित होते. दिवसेंदिवस दररोज मुंबई, पुणे यासारख्या शहरातून दररोज ३ ते ४ मुली गायब होत आहेत. या पार्श्वभूमीवर लहान मुली व महिलांवर होणाऱ्या अन्यायाला, अत्याचारला विरोध करण्यासाठी मुलींना व महिलांना आत्मनिर्भर व सक्षम बनविण्याच्या दृष्टीकोणातून मुलींसाठी व महिलांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी सत्यजित पाटील यांनी सांगितले कि, करंजाडेमधील महिलांना लाठी काठी प्रक्षिक्षण देऊन स्वतःचे रक्षण कसे करता येईन तसेच जर कोणी महिलांसोबत असभ्य वर्तन करेल तर शिव मावळे त्याचा चौरंग करतील असे सांगत सत्यजित यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## उरण तालुक्यातील तलाठी संघटनेतर्फे कामकाजावर बहिष्कार

**। उरण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने दिनांक १५ डिसेंबर २०२५ पासून सर्व ग्राम महसूल व मंडळ अधिकारी आपली डिजिटल सिग्नेचर (डीएससी) तहसील कार्यालयात जमा करून संपूर्ण ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. उरण तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारीही हा निर्णय अंमलात आणणार आहेत.



उरण तालुका तलाठी संघाने तहसिलदार डॉ उद्धव कदम यांना निवेदन सादर करून ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्याकडे असलेली आयटी उपकरणे बदलून नवीन लॅपटॉप तसेच प्रिंटर-कम-स्कॅनर तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सध्या असलेली उपकरणे जीर्ण व निकामी झाली आहेत. त्यामुळे कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद केले आहे.

दरम्यान, या बहिष्कार आंदोलनामुळे ७/१२, ८-अ, दाखला प्रणाली, ई-पीक पाहणी नोंदणी, ई-फेरफार इत्यादी महत्त्वाच्या ऑनलाइन सेवांवर तात्पुरता परिणाम होणार आहे. तलाठी संघाची या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना सातत्याने होणारा त्रास पाहाता संघाने ऑनलाइन कामकाजावर बहिष्काराचा निर्णय घेतला आहे.

**प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी | आत्मनिर्भर भारत विषयावर सादर केले प्रयोग**

# विज्ञान प्रदर्शनात आपत्कालीन यंत्रणेवर प्रकल्प

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याचे ५३ वे विज्ञान प्रदर्शन नेरळ येथे सुरू आहे, या प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या प्रतिकृती पाहण्यासाठी शाळांचे विद्यार्थी गर्दी करून आहेत. दरम्यान प्रामुख्याने सध्या निर्माण होणारी आपत्कालीन परिस्थितीवर मात करणाऱ्या प्रतिकृती लक्ष वेधत असून त्या प्रतिकृती यांच्या माध्यमातून अनेक सूचना करण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.





विकसित आणि आत्मनिर्भर भारतासाठी या विषयावर आधारित प्रदर्शन नेरळ येथील शार्विल स्कूलमध्ये भरले आहे. कर्जत पंचायत समिती शिक्षण विभाग तालुका विज्ञान आणि गणित मंडळ आणि शार्विल स्कूल ऑफ एक्सलँस यांच्या संयुक्त विद्यमाने ही प्रदर्शन भरले आहे. या प्रदर्शनात प्राथमिक, माध्यमिक या दोन गटात तब्बल १८९ प्रतिकृती मांडण्यात आल्या आहेत. त्या प्रतिकृती पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात तालुक्यातील विविध शाळांचे विद्यार्थी यांनी गर्दी केली आहे. या प्रदर्शनाचा विषय लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिकृती मांडल्या आहेत, त्यात प्रामुख्याने आत्मनिर्भर भारत हा विषय घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प हे सरकारला सूचना करणारे ठरू शकतात.

**विमानातील बिघाड आणि अपघात**

देशात आणि जगात मागील वर्षभरात मोठ्या प्रमाणात विमान अपघात झाले आहेत. त्या धर्तीवर अभिनव शाळा कर्जत यांच्याकडून मांडण्यात आलेल्या प्रतिकृती नुसार विमान प्रवासातील आपत्कालीन यंत्रणा या विषयावर आरुषी घावट हिने विमानात काही तांत्रिक बिघाड झाल्यास कारमधील 'एअर बॅग' प्रमाणे विमानात माहिती मिळेल आणि त्यानुसार पायलटकडून आपत्कालीन स्थितीत प्रवासी पॅराशूट प्रमाणे खाली उतरताना एकत्र सर्व प्रवासी उतरू शकतात. बिघाड झाल्यानंतर प्रवासी ही पाण्यात, जमिनीवर डोंगरावर खाली येत असताना विमानाचा पॅराशूट सारखा खाली येणारा भाग सर्वांचे प्राण वाचवू शकतो अशी सूचना देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### रेल्वे मार्गावरील अपघाताची माहिती

नेरळमधील एलएइएस शाळेच्या विद्यार्थ्यांकडून ट्रॅकपल्स या नावाची प्रतिकृती प्रदर्शनात असून त्यात रेल्वे मार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी सेन्सर यंत्रणा कार्यान्वित होऊ शकेल असे मत प्रदर्शन करणारे मॉडेल ठेवले आहे. कोणत्याही रेल्वे मार्गावरील रुळामध्ये भेगा पडणे, क्रॅक होणे हे पाहण्याचे काम दर आठ दिवसांनी होते, मात्र रेल्वे कर्मचाऱ्याकडून पाहणी केल्यावर दुसऱ्या दिवशी रुळाला क्रॅक गेल्यावर काय करावे? याबाबत सतर्कता दर्शविणारे रेल्वे सेन्सर यंत्रणा नुसार त्या रुळावरील आणि मार्गावरील अपघाताची स्थिती आधीच लक्षात येईल असे हे सेन्सर आहे. हा प्रकल्प आर्या अरुण खडेकर हिने मांडला आहे.

# निवडक



## जिल्हाधिकाऱ्यांची स्ट्राँगरुमला भेट

**अलिबाग :** अलिबाग नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने मतपेट्या ठेवण्यात आलेल्या जनरल अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालय, अलिबाग येथील स्ट्राँगरुमला भेट देवून तेथील सीसीटीव्ही कॅमेरे, पोलीस बंदोबस्त, सुरक्षा उपकरणे इत्यादी कार्यान्वित असल्याबाबतचा आढावा घेतला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार अलिबाग विक्रम पाटील, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सागर सांळुखे, अजित टोळकर तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.

## सेफ्टी अवेअरनेस विकचे आयोजन

**नवीन पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील ओएनजीसी कंपनीत १३ ते १९ डिसेंबर दरम्यान सेफ्टी अवेअरनेस वीक आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने १५ डिसेंबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांनी उपस्थित ओएनजीसी कंपनीतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना कंपनी परिसरात तसेच कंपनीत काम करताना घ्यावयाच्या सुरक्षिततेबाबत व सायबर सुरक्षितता याबाबत मार्गदर्शन केले. तसेच नवी मुंबई पोलीस व्हाट्सअप चैनलची माहिती दिली. यावेळी कंपनीचे मुख्य अधिकारी उदय पासवान तसेच ६० ते ७० अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



## वाकडी आश्रमशाळेचा प्रथम क्रमांक

**नवीन पनवेल :** पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, पनवेल गणित विज्ञान अध्यापक मंडळ आणि लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेज कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन संचालित श्री अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा वाकडीने प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेने सोलर प्लॅनेट खालील रिकाम्या जागेत शाश्वत शेती हा प्रकल्प तयार करून सादर केला. माध्यमिक शिक्षक गावीत डी एच यांच्या मार्गदर्शनाखाली अलीशा गडखल आणि रोहिणी वाघमारे यांनी या प्रकल्पाची मांडणी केली. या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक- शिक्षकेत्तर वृंद आणि संस्थाप्रमुख यांचे योगदान लाभले आहे. या सर्वांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



## जांभुळपाड्यात विकासकामांना गती

**पाली/वाघोशी :** ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड-जांभुळपाडा येथे राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत मुख्य घटक आठकावर प्रभावीपणे काम सुरू आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामस्थांच्या दैनंदिन गरजा आणि मूलभूत सुविधांवर भर देत विविध विकासकामे राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत शुद्ध पाणीपुरवठा व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, ग्रामपंचायत वेबसाईटची उभारणी, स्मशानभूमीमध्ये सर्व आवश्यक सुविधा, तसेच धार्मिक स्थळांचे सुशोभिकरण करण्यात येत आहे. यासोबतच ग्रामस्थांसाठी आयुष्मान भारतकार्ड शिबिरांचे आयोजन, वनराई बंधाऱ्यांची उभारणी, स्वच्छता अभियान, तसेच ग्रामपंचायतीमार्फत सर्व सेवा ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देणे यावर विशेष लक्ष दिले जात आहे. याशिवाय ग्रामपंचायतीच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण उपक्रम देखील राबविण्यात येत असून, त्यामुळे ग्रामविकासाला चालना मिळत आहे. या सर्व विकासकामांसाठी सरपंच पांडुरंग लिंबाजी शेंडे, उपसरपंच, अरुणा गिरीश दळवी, सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामपंचायत अधिकारी सचिन बालाजी केंद्रे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

## ९ हजार ७९० प्रकरणे निकाली

**अलिबाग :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत (दि.१३) डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्हा परिषद रायगड अंतर्गत ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदविला. या लोक अदालतीच्या माध्यमातून घरपट्टी व पाणीपट्टी मिळून एकूण ३४ हजार ३० प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. त्यापैकी ९ हजार ७९० प्रकरणांमधून एकूण रुपये ७ कोटी ९४ लाख ५६ हजार ५१३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. या लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून घरपट्टीची एकूण २७ हजार ३४१ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ८ हजार ३१६ प्रकरणांमधून रुपये ६ कोटी ८० लाख १४ हजार ९६३ इतकी घरपट्टी वसुल करण्यात आली. तसेच पाणीपट्टीची ६ हजार ६८९ प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली असून त्यापैकी १ हजार ४७४ प्रकरणांमधून रुपये १ कोटी १४ लाख ४१ हजार ५५० इतकी पाणीपट्टी वसूल करण्यात आली आहे. अशा प्रकारे घरपट्टी व पाणीपट्टी मिळून एकूण ३४ हजार ३० प्रकरणे लोक अदालतीत ठेवण्यात आली होती. त्यापैकी ९ हजार ७९० प्रकरणांमधून एकूण रुपये ७ कोटी ९४ लाख ५६ हजार ५१३ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

## पांडवकडा संवर्धनासाठी सायकल रॅली

**पनवेल :** जैवविविधतेने नटलेल्या खारघरच्या टेकड्या आणि पांडवकडा धबधबा वाचवण्यासाठी पर्यावरणप्रेमींनी रविवारी खारघर डोंगरावर सायकल रॅली काढून सार्वजनिक स्वाक्षरी मोहीम राबवली. या उपक्रमात ऐंशी वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसह ५० हून अधिक सायकलप्रेमी सहभागी झाले होते. वेटलँड्स अँड हिल्स, नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि पनवेल वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्वतदिनानिमित्त उत्सव चौक ते खारघर डोंगर अशी सायकल रॅली आयोजित करण्यात आली. खारघर डोंगर येथे विकासाच्या नावाखाली गेल्या काही वर्षांत येथे मोठ्या प्रमाणावर सपाटीकरण झाल्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली.

# माणगावातील अनधिकृत दुकाने तोडणार

## मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णायक निकाल नगरपंचायतीच्या बाजूने

| माणगांव | प्रतिनिधी |

माणगाव शहराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला असून, मुंबई–गोवा महामार्गावरील अनधिकृत व बेकायदेशीर दुकाने तसेच अतिक्रमणे तात्काळ हटवून ती तोडण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले आहेत. या निकालामुळे अनेक वर्षांपासून अतिक्रमणांच्या विळख्यात अडकलेला महामार्ग अखेर मोकळा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



माणगाव शहरातून जाणारा मुंबई–गोवा महामार्ग हा कोकणातील महत्त्वाचा दळणवळण मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांत महामार्गाच्या दुतर्फा अनधिकृत दुकाने, टपऱ्या आणि तात्पुरती बांधकामे उभी राहिल्याने वाहतूक कोंडी, अपघातांची भीती आणि शहराच्या नियोजनावर विपरीत परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते जलाल यांनी या अतिक्रमणांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी सुनावणीदरम्यान न्यायालयाने यापूर्वीही संबंधित यंत्रणांना अतिक्रमण हटवून महामार्ग मोकळा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महामार्ग कार्यालयाच्या वतीने माणगाव नगरपंचायत, जुन्या पंचायत समिती कार्यालयासमोरील भाग तसेच मुंबई–गोवा महामार्गालगत असलेल्या सर्व अनधिकृत दुकानदारांना वारंवार नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र या नोटिसांकडे दुर्लक्ष करत दुकानदारांनी आपली दुकाने कायम ठेवली होती.

या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा असा होता की, संबंधित दुकाने नगरपंचायत,पंचायत समिती तसेच शासकीय जागेवर अनधिकृतरीत्या उभारण्यात आली होती. तथापि,काही दुकानदारांकडून नगरपंचायतमार्फत नाममात्र भाडे, पाणीपट्टी तसेच विविध कर वसूल करण्यात येत असल्याने आमची दुकाने अधिकृत असल्याचा दावा दुकानदारांनी न्यायालयात केला होता.

पंचायत समिती व रायगड जिल्हा परिषदेकडूनही दुकान कर आकारला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मात्र, फक्त कर किंवा भाडे वसूल केल्याने अतिक्रमण अधिकृत ठरत नाही, हा महत्त्वाचा मुद्दा ग्राह्य धरत उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून माणगाव नगरपंचायतीच्या बाजूने स्पष्ट आणि ठाम निकाल दिला आहे. न्यायालयाने या सर्व अतिक्रमणांना अनधिकृत ठरवत तात्काळ हटवून ती तोडण्याचे आदेश दिले असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.

यामुळे माणगाव शहरातील शहररचना, वाहतूक व्यवस्थापन आणि महामार्गावरील सुरक्षितता यामध्ये मोठा बदल होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेला हा प्रश्न अखेर न्यायालयीन निर्णयामुळे मार्गी लागला असून, आता प्रशासनाकडून प्रत्यक्ष कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या निर्णयामुळे अनेक दुकानदारांवर उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार असला तरी कायद्याच्या चौकटीत शहराचा विकास, नागरिकांची सुरक्षितता आणि सार्वजनिक रस्त्यांचे संरक्षण महत्त्वाचे आहे अशी प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## निवडक

### कर्जत तालुका अध्यक्षपदी शेखर तरे

**नेरळ :** महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या माध्यमातून कर्जत तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी कोदीवले गावाचे पोलीस पाटील शेखर तरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल नेरळ पोलीस ठाणे अंतर्गत झालेल्या गाव कामगार पोलीस पाटील संघटनेच्या बैठकीत सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य गाव कामगार कमिटीचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मधुकर डायरे आणि महिला जिल्हा अध्यक्ष सविता गायकर यांच्या नेतृत्वाखाली सभा घेण्यात आली होती. या सभेमध्ये नवनिर्वाचित कमिटीची उपस्थित सर्वांच्या मते नियुक्ती करण्यात आली.कर्जत तालुक्याची नवीन कमिटी स्थापन करताना तालुक्यातील सर्व गाव कामगार पोलीस पाटील यांची उपस्थित होती. त्यातून महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ कर्जत तालुका अध्यक्षपदी शेखर तरे पाटील (पोलीस पाटील कोदिवले) याची नियुक्ती करण्यात आली.तर उपाध्यक्ष म्हणून कोल्हारे बोपेले गावाचे पोलीस पाटील संतोष जाधव पाटील तर महिला उपाध्यक्ष सरिता शेळके पाटील (डिकसल),कार्याध्यक्ष म्हणून प्रदीप गायकर पाटील (पाली), सचिव म्हणून जनार्दन पारधी पाटील (झुगरेवाडी), खजिनदार म्हणून.चंद्रकांत जाधव पाटील (आंत्रठ नीड),सह खजिनदार म्हणून स्वाती म्हसे पाटील (वारे),आणि सल्लागार म्हणून.दत्तात्रय भोईर पाटील (पोही), त्रिंबक असवले पाटील (अंभेरपाडा), भरत पाटील (बोरगाव), सदस्य म्हणून गणेश भोईर पाटील कुंभे, अनिल बारणेकर पाटील (दहिवली), विजय राणे पाटील (देवपाडा) यांची निवड करण्यात आली. या सर्व सन्मान नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी केले.

### 'धान्याचा लाभ परिपूर्णपणे घ्यावा'

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन तालुक्यातील सर्व खेडोपाड्यातील, ग्रामीण भागातील आणि मुख्य शहरातील लाभार्थी धान्याचा लाभ घेत आहे. शासन लाभार्थ्यांना धान्य ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे धान्य पुरवठा करीत आहे. याचे प्रमाण माणशी गहू एक किलो, आणि तांदूळ चार किलो असे आहे. तसेच काही लाभार्थ्यांना धान्य कमी मिळत असल्याच्या तक्रारी मिळत असल्याने श्रीवर्धन तालुका पुरवठा निरिक्षण अधिकारी रुपाली सुने यांचे निदर्शनास आणून दिली असता त्यांनी श्रीवर्धन तालुक्यातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानदारांकडून अशा घटना घडू नये, अशा सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे धान्य लाभार्थ्यांनी शासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे धान्याची उचल करावी तसेच ई–केवायसी पूर्ण करून घ्यावी आणि जे कोणी धान्य वितरक धान्य कमी देत असल्यास तातडीने धान्य पुरवठा निरिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी, अशी विनंती रुपाली सुने यांनी केली आहे.

### १ लाख २९ हजारांहून अधिक नव मतदार

**पनवेल :** गेल्या आठ वर्षांत पनवेल महापालिकेच्या हद्दीत तब्बल १ लाख २९ हजारांहून अधिक नव्या मतदारांची भर पडली आहे. यंदाच्या निवडणुकीत मतदारसंख्या सव्वालाखांहून अधिक झाली आहे.वाढलेली ही मतदारसंख्या आणि विशेषत: शहरी भागातील कॉस्मोपॉलिटन मतदारांचा कल, येत्या १५ जानेवारीला कोणत्या राजकीय पक्षाच्या पारड्यात पडतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. पनवेल महापालिकेने नुकतीच जाहीर केलेल्या अंतिम मतदार यादीनुसार यावेळी एकूण ५ लाख ५४ हजार ५७८ मतदारांना मतदानाचा अधिकार मिळणार आहे. यामध्ये २ लाख ५९ हजार ६८५ महिला मतदार तर २ लाख ९४ हजार ८२१ पुरुष मतदारांचा समावेश आहे. तुलनेने २०१७ साली झालेल्या महापालिका निवडणुकीत एकूण मतदारसंख्या ४ लाख २५ हजार ४५३ इतकी होती. आठ वर्षांत १ लाख २९ हजार ११४ मतदारांची वाढ झाल्याने प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्येचे गणित बदलले आहे. विशेष म्हणजे ही वाढ प्रामुख्याने पनवेल म हापालिकेच्या शहरी भागात झाली आहे. विमानतळ प्रकल्प, नवी गृहनिर्माण संकुले, आयटी आणि सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या संधी आणि शैक्षणिक विद्यासंकुले यांमुळे विविध राज्यांतून नागरिकांनी पनवेलमध्ये स्थायिक होण्यास पसंती दिली आहे.

### थर्टी फर्स्टसाठी सुतारवाडी सजली

**सुतारवाडी :** ३१ डिसेंबरला बुधवार आहे. त्यामुळे विविध परिसरातील पर्यटक मोठ्या प्रमाणावर प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी सुतारवाडी परिसरात मोठी गर्दी करणार आहेत. थर्टी फर्स्टच्या दिवशी बुधवार असल्यामुळे दारू पिणाऱ्यांची मोठी चंगळ होणार आहे. हजारो कोंबड्या, बकरे यांची कत्तल होणार आहे. यावर्षी पाऊस जवळजवळ सहा महिने सातत्याने पडत होता. त्यामुळे वातावरणात मोठा बदल झाला असून वालाच्या शेंगांचा बहर उशिराने येत आहे. त्यामुळे थर्टी फर्स्टच्या दिवशी पोपटीची चव फार थोड्या प्रमाणावर चाखायला मिळणार आहे. गावठी कोंबडा कोंबडीला मोठ्या प्रमाणावर मागणी असून कोंबडीची किंमत ४०० ते ५०० तसेच कोंबड्याची किंमत ८०० रुपये आहे. सुतारवाडी, धगडवाडी, कुडली, केरळ, कामत या परिसरामध्ये अनेक सुसज्ज असे फार्म हाऊस आहेत. या ठिकाणी बुकिंग सुरू झाल्याचे समजते. सुतारवाडी येथे सुसज्ज धरण आहे. दरवर्षी अनेक दारू पिणारे या ठिकाणी एकत्र येतात, तेथील सुंदर परिसर अस्वच्छ करतात. बाटल्या खाद्यपदार्थ अस्ताव्यस्त फेकून देतात. मावळ्या वर्षाला निरोप देताना कोठेही अनुचित प्रकार घडू नये याची काळजी घेणे जरुरीचे आहे.

# द्रुतगती मार्गावर ट्रामा सेंटरची गरज

| रसायनी | प्रतिनिधी |

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर रसायनी–खालापूर हद्दीत मागील दहा वर्षांत अपघातांनी हजारांचा टप्पा ओलांडला आहे. येथील अपघाताचे वाढते प्रमाण हे चिंताजनक असून, खालापूर येथे ट्रामा सेंटर अत्यंत गरजेचे झाले आहे, त्यामुळे अपघातानंतर तातडीने मदत मिळण्यास मदत होईल, असे स्थानिकांचे मत आहे.

अवघड आणि कायम वाहतूककोंडी असलेला बोरघाटाचा प्रश्न सहापदरी द्रुतगती मार्गाने संपला; परंतु वेगमर्यादा ८० असतानाही अधिकचा वेग आणि लेनच्या शिस्तीचे पालन न केल्यामुळे अपघात होत आहेत. खालापूर हद्दीतील आकडेवारी चिंताजनक आहे. मुंबई–पुणे द्रुतगती म र्गावर रसायनी–खालापूर हद्दीत अपघाताचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या परिसरात जखमींवर तातडीने उपचार होण्यासाठी सुसज्ज रुग्णालय असावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अपघातग्रस्तांच्या मदतीला टिम,आयआरबीची डेल्टा फोर्स, देवदूत पथक, वाहतूक पोलीस तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था मदतीसाठी धावून जाते. गंभीर जखमींना पुणे तसेच नवी मुंबई येथे उपचारासाठी हलविण्यात येते. खालापूर परिसरात २० किलोमीटर अंतरात गंभीर जखमींवर उपचार होतील, असे रुग्णालय नसल्याने लांबचा पल्ला गाठावा लागतो. रसायनी–खालापूर ट्रामा केअर सेंटर आणि कंटेनर यार्डचा प्रश्न गेल्या पंधरा वर्षांपासून प्रलंबित आहे. द्रुतगती मार्गावर उर्सेनजीक ट्रामा केअर सेंटर सुरु करण्यात आले; परंतु खालापूर हद्दीतील अपघाताची संख्या पाहता खालापूर अथवा रसायनीत सुसज्ज ट्रामा केअर सेंटर उभे राहणे गरजेचे आहे. जेणेकरून अपघात घडल्यास त्वरीत उपचार सुरू होतील आणि अपघात झालेल्यांचा जीवही वाचवता येईल.याशिवाय मुंबई–पुणे महामार्गावरील खालापूर हद्दीतील अपघातग्रस्तांकडून ट्रामा केअर सेंटरची मागणी होत आहे.

# रस्ता रुंदीकरणाच्या कामाला वेग

| उरण | प्रतिनिधी |

बोकडवीरा पोलीस चौकी ते कोट नाका दरम्यानच्या १ हजार ६०० मीटर लांबीच्या उरण पनवेल मार्गाचे रुंदीकरणाचे काम वेगात सुरू झाले. या कामात सात मीटर रुंद असलेला हा मार्ग १४ मीटर रुंद करण्यात येत आहे.

या मार्गाला दुभाजक बसविण्यात येणार असून त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदाही काढली आहे. यामुळे लवकरच मोठा रस्ता वाहतुकीसाठी उपलब्ध होणार असून येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

# विद्यार्थ्यांना बिबट्याचे दर्शन

| म्हसळा | प्रतिनिधी |

तालुक्यात बिबट्याच्या सतत होत असलेल्या दर्शनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

म्हसळा तालुक्यातील पानवे येथे जिल्हापरिषद शाळेतील परिसरात बिबट्या दिसल्याचे शाळेतील विद्यार्थ्यांनी सांगितले. शाळेतील विद्यार्थ्यांना भर दिवसा बिबट्या दिसताच एकच खळबळ उडाली.

काहीवेळात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली असून नागरिकांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली आहे. शाळेत विद्यार्थ्यांना बिबट्या दिसल्याने विद्यार्थ्यांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या परिसरात बिबट्याचे वारंवार पाळीव जनावरांवर हल्ले होत आहेत. बिबट्याच्या हालचाली लक्षात घेता तातडीने वन विभागाने घटनास्थळी पथक पाठवून पाहणी करावी व पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. मानवी वस्ती आणि वन्यप्राणी यांच्यातील वाढता संघर्ष या घटनेनंतर पुन्हा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे.

या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नैसर्गिक परिसंस्थेचे संरक्षण करणे आणि वन्यप्राण्यांसाठी सुरक्षित वाहतूक मार्ग उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे.

# टाटा जलविद्युत प्रकल्प विरोधातील उपोषण सुटले



| नेरळ | प्रतिनिधी |

## उपोषणकर्त्यांचे सर्व विषय मान्य

कर्जत तालुक्यातील भिवपुरी येथे असलेल्या टाटा जलविद्युत प्रकल्पाच्या नवीन प्रकल्पाच्या कामात स्थानिकांवर अन्याय होत असल्याचे कारणाने राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाने उपोषण सुरू केले होते. त्या उपोषणाला स्थानिक आणि तालुक्यातील जनतेने मोठा पाठिंबा दिल्याने तणाव निर्माण झाला होता.शेवटी तब्बल ११ तासांनी टाटा कंपनी व्यवस्थापनाला उपोषणकर्त्यांच्या सर्व मागण्या मान्य कराव्या लागल्या.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सुरुंग स्फोटामुळे तपकिरवाडी आणि धनगर वाडा येथील घरांचे होत असलेले नुकसान आणि त्यामुळे निर्माण झालेली घबराट, सुरुंग स्फोटामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई, दगडखाणी यांना लोकवस्तीजवळ दिलेली परवानगी मोठ्या प्रमाणावर केलेली वृक्षतोड आणि स्थानिक भूमिपुत्र यांना नोकऱ्यांमध्ये सामावून घेण्याच्या मागण्यासाठी उपोषण सुरू करण्यात आले होते.

उपोषण सुरू झाल्यानंतर कर्जतचे प्रांताधिकारी प्रकाश संकपाळ, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, टाटा कंपनीचे अधिकारी अभिजीत पाटील, सीबी सिंग, मुंबई ऑफिस वसंत पिंगळे, विवेक माटे यांनी दुपारी एक वाजता, त्यानंतर संध्याकाळी पाच वाजता आणि रात्री नऊ वाजता मध्यस्थी करण्यासाठी उपोषणस्थळी येऊन चर्चा केली. मात्र उपोषणकर्त्यांच्या मागण्या सुटत नाहीत, तोवर उपोषण सुरूच ठेवले जाईल अशी भूमिका कायम ठेवली होती.

# कौशल विकास मार्गदर्शन कार्यशाळा

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या, वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे कौशल विकास मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. बारावी उत्तीर्ण विद्यार्थी व १८ ते ३० वयोगटातील सर्व तरुणांना नोकरीसाठी आवश्यक ते विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण वीर वाजेकर महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रथम एज्युकेशन फाउंडेशन मार्फत मोफत उपलब्ध करून दिले जाणार आहे, याबद्दल माहिती करून देण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

# निसर्ग संपदा नष्ट होण्याच्या मार्गावर

| उरण | प्रतिनिधी |

निसर्ग संपदेची राख करण्याचा डाव सध्या सर्वच ठिकाणी समाजकंटकांकडून सुरू असलेला दिसत आहे. रानसई मार्गाकडे जाणाऱ्या चांदायली वाडी परिसरात सरकारने लाखो रुपये खर्च करून वृक्षलागवड केली होती, परंतु येथे लावलेल्या आगीमुळे वृक्ष संपदा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

रानसई रोड मार्गावरील चांदायली आदिवासी परिसरात सरकार आणि निसर्ग मित्रांकडून मोठ्या प्रमाणात सागाची आणि इतर वृक्षांची लागवड केली होती. त्याचप्रमाणे जंगली झाडांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, मात्र या परिसरात सातत्याने वृक्षतोड आणि वणवे लावण्याच्या प्रकारात वाढ होताना दिसत आहे. यामुळे निसर्ग संपत्तीचा ऱ्हास होऊ लागला आहे. यासोबतच येथील प्राणी आणि पक्षी यांची अंडी नष्ट होऊ लागली आहेत. यामुळे वन्यप्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्चून वृक्षलागवड आणि संवर्धन केले जात आहे, मात्र काही समाजकंटक सरकारच्या या संकल्पनेला ब्रेक लावण्याचे काम करत आहेत, मात्र याकडे

### सातत्याने लागणाऱ्या आगीचा फटका

येथील वन विभागाचेही दुर्लक्ष होताना दिसत आहे. दरम्यान, वन विभागाने समाजकंटकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दुर्मिळ जाती नष्ट होण्याची भीती चिरनेर, रानसई परिसरात सातत्याने आगी लावल्या जात आहेत. त्यामुळे शासनाने आणि सामाजिक संस्थांनी निसर्ग वाढण्यासाठी केलेली मेहनत वाया जात आहे. आगीमुळे सरपटणारे प्राणी, पक्षी व त्यांची अंडी जळून राख होतात.

# अपघातानंतरही खासगी कंपनीची दगड वाहतूक सुरुच

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

## ३१ डिसेंबरपर्यंत वाहतूक बंद ठेवण्याची मागणी

अवजड वाहतुकीमुळे श्रीवर्धन शहरातील रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. अनेक ठिकाणी पिचिंग तुटून गेली आहेत. तर या डंपर्समुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी देखील झालेली पाहायला मिळते. तालुक्यात ओव्हरलोड वाहतूक करणारे बॉक्साइडचे डंपर व दगडाची वाहतूक करणारे डंपर यांच्यावर प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

पुणे येथून आलेल्या अल्पवयीन पर्यटकांमुळे श्रीवर्धन मधील एक व्यावसायिक परवेज हमदुले यांचा मृत्यू झाला होता. गेल्या वर्षी देखील हरिहरेश्वर येथे एका युवतीला स्कॉर्पिओ गाडी गाडीखाली चिरडून काही पर्यटक पळून गेले होते.

पुण्यातून येणाऱ्या पर्यटकांचा मद्यपीपणा व उन्मत्तपणा पुन्हा एकदा श्रीवर्धनच्या घटनेवरून दिसून आला आहे. सदरचे पर्यटक हे श्रीवर्धन येथे दोन दिवस वास्तव्यास होते व ज्या ठिकाणी त्यांचे वास्तव्य होते त्या ठिकाणी देखील त्यांनी दारू पिऊन खूप मोठ्या प्रमाणात धिंगाणा घातल्याचे बोलले जाते.

सध्या पार्किंगची व्यवस्था नसल्यामुळे श्रीवर्धन शहरातील प्रत्येक पाखाड्यांमध्ये येणारे पर्यटक आपल्या गाड्या वेड्यावाकड्या उभ्या करून ठेवतात. श्रीवर्धन शहरात प्रवेश करताना श्रीवर्धन नगरपरिषद पर्यटन कर घेते. मात्र या पर्यटन कराच्या मोबदल्यात पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून दिली जात नाही.

श्रीवर्धन नगरपरिषदेने तसेच श्रीवर्धनच्या आमदार व महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर हेलीपॅडच्या बाजूला असलेली वनखात्याच्या अखत्यारित असलेली जागा पार्किंगसाठी लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावी.

जेणेकरून श्रीवर्धन मधील पार्किंग समस्येचे निराकरण होईल. श्रीवर्धन शहरातील जीवना पार, विठ्ठल आळी, नारायण पाखाडी, चौकर पाखाडी, दांडा मार्गे फोरकोन कंपनीचे डंपर मोठमोठे दगड घेऊन वाहतूक करत असतात. या मद्यपान करून रस्त्याच्या उजव्या बाजूने जोरामध्ये गाडी हाकून एका तरुणाच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या युवकांना शिक्षा होणे गरजेचे आहे.

## क्लासिफाईड्स

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरित देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संपर्क : ८००७८९३२३२/८८०६९६३२३२
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४
- हातगाडी विकणे आहे. संपर्क : नम्रता - ७७४४०९८५५४
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाउसकिपिंग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉट्सअॅपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- विद्यानगर अलिबाग येथे कॉटेजमध्ये कामाकरीता कुक, महिला पाहिजे. संपर्क : ९२७२३८३४७६/८३९०४२४२२२
- अलिबागपासून २१ किमी अंतरावर रामराज राजेवाडी येथे योग्य दरात २० गुंठे/३० गुंठे शेती मिळकत विकणे आहे. मो.नं. ८८०५३३६६१०,९१५८४३८२९२
- अलिबाग मधील सुपरमार्केटमध्ये कामासाठी मुली/बाई पाहिजे. ९३२२८२३४०४
- नाश्ता किंवा गोटे पाहिजे ७०६६१३८३६८
- नाश्ता वनविभ्यासाठी स्त्री/पुरुष पाहिजे ७०६६१३८३६८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

रब्बी हंगामात १,४०३ हेक्टर क्षेत्रावर शेतकऱ्यांचा भर | आर्थिक नुकसान भरून निघण्याची शक्यता

# तालुक्यात कडधान्य लागवड जोमात

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यात भातकापणीनंतर जमिनीच्या अंगभूत ओलाव्याचा योग्य उपयोग करत रब्बी हंगामात कडधान्य लागवडीला चांगलाच वेग आला आहे. यंदा तालुक्यातील शेतकरीवर्गाने सुमारे १,४०३ हेक्टर क्षेत्रावर विविध कडधान्य पिकांची लागवड केली असून, यामुळे शेतकऱ्यांमध्ये आशादायक वातावरण निर्माण झाले आहे.



मध्यम ते गाळाच्या काळ्या जमिनीचे प्रमाण मोठे असून, या जमिनीत कडधान्य पिकांची वाढ जोमाने होते. पाणीधारण क्षमता असलेली तसेच योग्य निचऱ्याची जमीन कडधान्य पिकांसाठी पोषक ठरते. भातकापणीनंतर बहुतांश शेतकरी विशेष मशागत न करता जमिनीच्या ओलाव्यावरच कडधान्य पिके घेतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन नफा वाढण्यास मदत होते. रब्बी हंगामात थंड व गार हवामान कडधान्य पिकांसाठी उपयुक्त मानले जाते.

सध्या पहाटेच्या सुमारास पडणारे दव, गारवा आणि ढगाळ वातावरणामुळे पिकांची शाखीय वाढ चांगली होत आहे. यंदा पावसाचा कालावधी लांबल्याने कडधान्यांची लागवड डिसेंबरच्या सुरुवातीला करण्यात आली. पेरणीनंतर साधारणतः ६० ते ७५ दिवसांत शेंगा पक्व होतात आणि

### श्रीवर्धन तालुक्यातील कडधान्य लागवड

**एकूण क्षेत्र :** १,४०३ हेक्टर
**प्रमुख पिके :** मटकी, चवळी, कुळीथ, मूग, कडवा वाल, तूर, हरभरा
**पेरणी कालावधी :** डिसेंबर काढणी
**कालावधी :** ६०–७५ दिवसांत, २–३ टप्प्यांत **विक्री :** स्थानिक व तालुक्याबाहेरील बाजारपेठा

दोन ते तीन टप्प्यांत काढणी केली जाते.यावर्षी तालुक्यात मटकी, चवळी, कुळीथ, मूग, कडवा वाल, तूर आणि हरभरा या प्रमुख कडधान्य पिकांची लागवड करण्यात आली आहे.

यार होणाऱ्या ओल्या व सुक्या शेंगांची विक्री श्रीवर्धन तालुक्यासह तालुक्याबाहेरील बाजारपेठांमध्ये केली जाते. प्रथिने व पोषणमूल्यांचा उत्तम स्रोत असल्यामुळे डाळींना बाजारात कायमच चांगली मागणी आहे. दरम्यान, यंदा पावसाचा कालावधी वाढल्याने भातपिकाचे काही प्रमाणात नुकसान झाले होते, मात्र रब्बी हंगामातील कडधान्य पिकामुळे शेतकऱ्यांचे भातपिकातून झालेले आर्थिक नुकसान काही अंशी भरून निघेल, असा विश्वास कृषी विभाग आणि शेतकरी व्यक्त करत आहे.

> श्रीवर्धन तालुक्यात वाल व कडधान्यांची लागवड नियमितपणे होत असते. अन्न व पोषण सुरक्षा अभियानांतर्गत नवीन वाणांना प्रोत्साहन देण्यासाठी हरभरा मिनीकिट, मूग व हरभरा गट प्रात्यक्षिके राबवली जात आहेत.
>
> – श्रद्धा डुंबरे, तालुका कृषी अधिकारी, श्रीवर्धन

# ‘कुंडलिका’ प्रदूषणाच्या विळख्यात



। रोहा । प्रतिनिधी ।

रोह्याची जीवन वाहिनी म्हणून ओळख असलेल्या कुंडलिका नदी आता प्रदुषणाच्या विळख्यात सापडली आहे. भविष्याच्या दृष्टिकोनातून कुंडलिका नदी संवर्धन करण्याची गरज आहे. परंतु लोकप्रतिनिधींचा जाणीवपूर्वक कुंडलिका नदीकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

जिल्ह्यातील अनेक नद्यांपैकी बारमाही वाहणाऱ्या नद्यांमध्ये कुंडलिका नदीचा वरचा क्रमांक लागतो. बारमाही वाहणारी व स्वच्छ पाणी या नदीचे वैशिष्ट्य होते. रोहा तालुक्यातील सुतारवाडी ते न्हावे या परिसरातून पूर्वी ही नदी नागरिकांना जीवनदायी ठरत होती. गोफण पुढे कुंडलिका समुद्रात काही काही अंतरावर समाविष्ट होत असते. मानवी वस्त्यांसह पशु प्राण्यांना या नदीतील पाण्याचा उपयोग होत असत. त्यामुळे कुंडलिकेच्या तीरावर अनेक गावी वसलेले दिसत आहेत. या गावांना पूर्वी पिण्याचा पाण्याचा प्रश्न नदीमुळे भासत नव्हता. बारमाही वाहणारी व स्वच्छ पाणी देणारी कुंडलिका नदी आज तिचे रूप बदललेले दिसून येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातून येणाऱ्या सांडपाणी मुळे आधीच कुंडलिका नदी प्रदूषित झाली होती.

नदीवर अवलंबून असलेल्या मच्छिमारांचा उदरनिर्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहेच. तर नदीपात्राच्या किनारी असलेल्या अनेक शेतकऱ्यांची शेती नापीक झालेले दिसून येत आहे. या नदीच्या पात्रात अधून मधून सांडपाणी अनेक ग्रामपंचायतीसह नगर परिषदेच्या हद्दीतून सोडले जात आहे. स्वच्छ व निर्मळ म्हणून ओळख असलेल्या कुंडलिका नदीच्या पात्रात आज पाणी दूषित झाल्याचे दिसून येते. मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी कचरा व वाहनांची स्वच्छता नदीच्या पात्रात केली जाते. काही ठिकाणी मानवी मैला ही सोडण्याचा प्रकार अधून मधून घडल्याची दिसून आले



# शालेय सहलींनी बहरला समुद्र किनारा

## ● विद्यार्थ्यांनी लुटला समुद्र सफरीचा आनंद

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी सहलींचा हंगाम सुरू झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर शालेय विद्यार्थ्यांच्या सहली येत आहेत. त्यामुळे काशिद व मुरुडचे समुद्रकिनारे शालेय सहलीने बहरली आहेत. या विद्यार्थ्यांनी मुरुडच्या समुद्रकिनाऱ्यावर फिरण्याचा पाण्यात खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला आहे.

दिवाळीच्या सुट्टीनंतर थंडीच्या हंगामामध्ये शालेय सहलींना सुरुवात होत असते. शालेय विद्यार्थ्यांना ऐतिहासिक माहिती मिळावी याकरता सहलींचे आयोजन केले जाते. मुरुड जंजिरा हा या सहलींचा मोठा आकर्षण आणि कुतूहलाचा विषय ठरतो आहे. कारण या किल्ल्यांमध्ये समुद्राच्या मध्यभागी असून सुद्धा गोड्या पाण्याची दोन मोठे सरोवर आहेत. शिवाय हा किल्ला समुद्राच्या मोठमोठ्या लाटांचा मारा झेलत अजून ही दिमाखात उभा आहे.

मुरुड जंजिरा किल्ला पाहण्यासाठी आलेले विद्यार्थी समुद्र किनाऱ्यावर फिरण्याचा पाण्यात खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटत आहेत. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, सोलापूर, अकोला, बुलढाणा, कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली, सातारा, सोलापूर, अमरावती, पालघर, संभाजीनगर, परभणी, लातूर, चंद्रपूर सह संपूर्ण महाराष्ट्रातून शालेय सहली दाखल होत आहेत.

# प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्ष प्रथम



। उरण। प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील पिरकोन येथे आयोजित उरण तालुका विज्ञान प्रदर्शनांतर्गत इयत्ता ९ वी ते १२ वी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत जुनिअर कॉलेजचा विद्यार्थी हर्ष जगदीश ठाकूर ११ वी विज्ञान,याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे संबंधित विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. हर्षच्या या यशामागे प्रा. अरुण देवरे, प्रा आरती मोरे, प्रा.माने, प्रा. पाटोळे व सर्व विज्ञान शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, प्राचार्य बबन साळुंखे, संगीता थोरात, नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## जाहिर नोटीस

आमचे अशिल यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, १) श्रीमती अरुणा अरुण डुकरे, २) श्रीमती इंदुबाई किसन कोंडीलकर, ३) श्री. दिपक किसन कोंडीलकर, ४) श्रीमती पुष्पा चिंतामण गायकवाड, ५) श्रीमती साधना अनिल शेळके यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येत आहे की मौजे - कुडावे, ता. पनवेल, जि. रायगड. येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमिन मिळकती आहेत.

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे कुडावे, ता. पनवेल, जि. रायगड.

| गांव / तालुका | गट/ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| कुडावे / पनवेल | २८ | १ | ०-३४-५० | ७.३१ |

वर वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांना कायमस्वरुपी विक्री करण्यात येणार आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बधंनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : /१२/२०२५

अ‍ॅड. शैलेश प्रभाकर पाटील
पत्ता-दुय्यम निबंधक कार्यालय समोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड.
पिन : ४०२२०१.
मो.नं. ९९२२७१७०३१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहेत.

मौजे - बेकरे, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकती

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| किशोर रामचंद्र खरे | ७४ | १३ | ०-५०-०० | ०-४१ |
| सुप्रिया सुरेश सहस्त्रबुद्धे | ६८ | ७ | ०-२०-०० | ०-१९ |

सदरची जमीन मिळकत या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १९/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
अ‍ॅड. स्वप्निल बाबूराव देशमुख
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४, डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक १. अंजली सुरेश भागवत २. अतुल सुरेश भागवत ३. सुनिल सुरेश भागवत ४. नेहा निलेश दोशी ५. राजेश सुरेश भागवत यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०/२१ | ४२२-०६ | ४३-०० |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९/१२/२०२५

अ‍ॅड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या क्लायंटनी, नमूद जमीन मिळकतीचे मालक मे. जी.टी. एक्सहोस्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांचे तर्फे डायरेक्टर श्री. केतन के. शेट व श्री. शशिकांत एस. शेट व हेमंत आय. वाशी, यांच्याकडून खालील मिळकती खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.

सदर मालमत्तेचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

मौजे तोंडली, तालुका - खालापूर, जिल्हा रायगड

| अ.क्र. | वर्ग | गट क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ३४/२ | ०.०६.०० | ०.५३ |
| २. | १ | ३४/३ | ०.१८.२० | ०.७२ |
| ३. | १ | ३२/१ | १.१७.३० | १२.९८ |
| ४. | १ | ३४/५/C | ०.०६.०० | १२.०० |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या कार्यालयाबाबत विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्ट खालील लाभदायी हक्क, प्रिस्क्रिप्शन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून चौदा (१४) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी विक्री व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

दिनांक १८/१२/२०२५
श्री. संतोष भा, मोहिते,
(अ‍ॅडव्होकेट बॉम्बे हाय कोर्ट),
ऑफ-२२/००१, देवदया फेज-२, सी.एच.एस.लि.,
देवदया नगर, ठाणे (प.)- ४००६०६.
मो. ९८१९६१०५५३,
ई-मेल-santoshmohite9819@gmail.com

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वाना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकत आमचे अशिलांनी सदर शेती स्वरूपाच्या मिळकतीचे मालक जावेद अस्लम पटेल यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे आसरे, ता. खालापूर, जि. रायगड येथील मिळकत

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ४९ | १ | ००-०५-००<br>पो.ख. ००-००-००<br>एकुण ००-०५-०० | ०-०८ |

मालमत्ता क्र.६/३३८ क्षेत्रफळ १५६X१४४.९३ चौ.फुट/चौ.मी.क्षेत्राचे सदर मिळकतीवर आर.सी.सी बांधकाम असलेला एक मजली बंगलो.

वरील तदंगभुत हक्कहितसंबंध सुद्धा.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोड पत्र, बक्षिस, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

ता.१८/१२/२०२५

खरेदीदारातर्फे अ‍ॅडव्होकेट
अ‍ॅड. योजना अनिल शिंदे उर्फ अ‍ॅड.सौ.योजना मनिष सुर्वे
रा. श्रीनाथ अपार्टमेंट, फ्लॅट नं. ३०२, तिसरा मजला, भैरवनाथ मंदीरासमोर, मुद्रे(बु.), कर्जत, ता.कर्जत, जि. रायगड.
मो.नं.८६२४९३०९२५.

# रामनाथ पंडित यांचा सत्कार

। उरण । प्रतिनिधी ।

काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हा उपाध्यक्ष रामनाथ पंडित यांचा उरण तालुक्यातील धुतूम, चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विधणे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील आठ गाव कमीटी व महात्मा गांधी विद्यालय दिघोडेच्यावतीने बुधवारी (दि.१७)नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी चिर्ले गावचे सरपंच सुधाकर पाटील, आठ गाव कमेटी अध्यक्ष रमण कासकर, उपाध्यक्ष प्रदीप मुंबई कर, सेक्रेटरी रविंद्र कासूकर, खजिनदार अनंत पाटील, सदस्य पदाजी कासूकर, संदेश पाटील, सुनील पाटील, प्रल्हाद कासकर, विलास मढवी, नामदेव मढवी, गणेश ठाकूर, बाळाराम ठाकूर, महेश नाईक, किरण भगत, महेश पाटील, महेश भगत, शंकर कासूकर उपस्थित होते.

दिनांक : १८/१२/२०२५

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे तळवली, ता.मुरूड, जि. रायगड येथील मिळकतीबाबत आमचे अशिल विद्यमान मालक १) सेबास्टीयन फ्रा. परेरा, २) नितीन स्टॅनी परेरा, ३) फिलोमीना संदीप डिसोझा, ४) बाप्तीसा फ्रा. परेरा, ५) जॉयसी निकलस परेरा, ६) ऑस्टिन निकलस परेरा, ७) सेलिना निकलस परेरा, ८) सिडनी फ्रा. परेरा, ९) मारिया विलसन मिरांडा यांनी दिलेल्या माहितीवरून आमचे अशिल व सोनु कृष्णा पवार यांच्यामध्ये सदर मिळकतीबाबत अनोंदणीकृत साठेकरार दिनांक ०३/०९/२०१५ रोजी झालेला होता. त्या करारानुसार सोनु कृष्णा पवार यांनी कराराची पुर्तता न केल्याने आमचे अशिल यांनी सदरील करार रद्द केलेला आहे. सदरील मिळकत ही आमचे अशिल यांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीत आहे. त्यामुळे सोनु कृष्णा पवार यांचा व त्यांच्या वालीवारसांचा सदर मिळकतीशी आता कोणताही हक्क वा हितसंबंध राहीलेला नाही. त्यामुळे सदर मिळकतीबाबत सोनु कृष्णा पवार यांच्या सोबत कोणीही कोणताही व्यवहार करू नये तसा व्यवहार केल्यास तो आमच्यावर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे.

मौजे तळवली, ता. मुरुड, जि. रायगड

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| तळवली ता.मुरूड | ३६४ | क्षेत्र ०-२२-६०<br>०-२७-००<br>पो.ख. ०-०७-१०<br>एकुण क्षेत्र ०-५६-७० | ६.८२ |
| | ३६७ | क्षेत्र ०-१५-००<br>पो.ख. ०-०३-००<br>एकुण क्षेत्र ०-१८-०० | २.१० |

दिनांक : १८/१२ /२०२५
अशिलांची सही

अ‍ॅड. समीर सुरेश नाईक
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

मौजे विडसई, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.

मिळकतीचे वर्णन

| जमिन मालकाची नांवे | सं.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| वसुधा सामाजिक उन्नती वनीकरण व वृक्ष लागवड सहकारी संस्था मर्यादित वाफेघर तर्फे चेअरमन राहुल मगनलाल टिंबाडिया. | ४/१६ | ०-७६-०० | ०-२७ |

स.नं.४/१६ व इतर मधील प्लॉट नं. पी- ७४ क्षेत्र ४०६८
प्लॉट धारक शहनाज मोहम्मदनुरूज शेख व मोहम्मद नुरूज अब्दुलरहीम शेख.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हीतसंबध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १९/१२/२०२५

खरेदीदारांतर्फे,
राठोड एण्ड एसोसिएट्स
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे. वरंडे, तालुका- अलिबाग जि. रायगड येथील सामाईक मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. महेंद्र हरिश्चंद्र नाईक रा. वरंडे, ता. अलिबाग यांच्या मालकी हक्काची मिळकत कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

त्या मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| वरंडे, | १४२ | ०.५४.२० | ९.६४ |

वर नमूद मिळकतीपैकी १) श्री. महेंद्र हरिश्चंद्र नाईक यांच्या मालकी हक्कातील मिळकत क्षेत्र ०.१६.०० आकार ३.०१ हे. आर. मिळकतीचे

सदरची मिळकत ही सामाईक मिळकतीपैकी हया विद्यमान मालकांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांस दिलेला आहे. मात्र तरीदेखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, इजमेंट, बोजा, साठेकरार, ताबा कब्जा, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबध असल्यास त्यानी त्यांच्या हरकती, अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापांसून ७ (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरुपात समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील, व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख - १८/१२/२०२५

अ‍ॅड. मनोज परशुराम ओव्हाळ
रजिस्टर ऑफिस समोर अलिबाग गाळा नं.६
ता.अलिबाग जि. रायगड मो. ९८८१२७७४४९

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने, प्रादेशिक सिग्नल व दूरसंचार अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून "रत्नागिरी विभागातील चिपळूण स्टेशन येथे अस्तित्वात असलेले डॉमिनो टाइप कंट्रोल कम इंडिकेशन पॅनेल (CCIP) बदलण्याचे काम" करण्यासाठी अनुभवी कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. **निविदा सूचना क्र. केआर-आरएन-एसजी-टी-09-2025-26 दिनांक 19.12.2025. अनुमानित खर्च** : ₹ 5.328 लाख. **ईएमडी रक्कम** : ₹ 10,700/-. **बोली सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ** : 09.01.2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी www.ireps.gov.in संकेतस्थळावर भेट द्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.रूपल संजय अग्रवाल यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे कार्ले, ता.अलिबाग येथील

| गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ४२१ | ०-३४-८० | ७.७९ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांकः /११/२०२५

अ‍ॅड.अक्षय सुधीर म्हात्रे
''अन्नपूर्णा'' मु.पो.धोकवडे
ता.अलिबाग जि.रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.साहिल शरद बोडके, रा. पाली, ता. सुधागड, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे - माणगाव बु.॥ , ता. सुधागड, जि. रायगड

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २०२ | १-००-६० | १.८८ |

पैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ०-५०-१० हे. आर.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १९/१२/२०२५

सही /-
अ‍ॅड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

प्रो.जमा. रु.
नि.नं.
नेता: २१/०१/२०२६

## जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील
श्री पवार.एम.एम.
ने.ता.

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१५१/२०२५

**पेण येथील मे दिवाणी न्यायाधीश क स्तर यांचे कोर्टात, नि.८/ड**

श्रीम. छाया संजय चव्हाण - अर्जदार
वैगेरे २
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील आणि अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा संजय भिका चव्हाण हे मुंबई येथील कोहिनूर हॉस्पिटल, या दवाखान्यात वयाच्या ५५ व्या वर्षी प्रदिर्घ आजारपणात दि. ०४/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे नावे मृत्यूसमयी आर.टी.ओ. पेण, जि. रायगड यांचे नोंदी दफ्तरी बजाज पल्सर मोटारसायकल आहे. सदर मोटारसायकलचा रंग काळा, नोंदणी क्र. एम. एच. ०६ एव्ही ४५८५, मोटारसायकल चासिस नं. MD2DHDJZZSCE62584,, मोटारसायकल इंजिन नं. DJGBSE80851, मोटारसायकल मॉडेल-बजाज पल्सर 180 D.T.S. I दि. २९/०९/२००९ रोजीचा आणि आणि मारुती अल्टो कार आहे. सदर कारचा रंग सिल्की सिल्व्हर मेटॅलिक, नोंदणी क्र. एम.एच. ०६ एडब्लू १३७२, कारचा चासिस नं. MA3EYD81501478082,, कारचा इंजिन नं. F8DN3731259, कारचा मॉडेल- मारुति कार अल्टो LXI BS III दि. ०६/१०/२००९ रोजीचा या वर्णनाची ही दोन वाहने हा या अर्जाचा विषय असून, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील आणि अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा यांचे नावे आर.टी.ओ. पेण कडे नोंदणी केलेली आहे. सदर गाडीचे मालकीचे कागदपत्र अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील आणि अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा यांचे नावे आहेत. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील आणि अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्र. १, २ व ३ हेच सरळ कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणेकरिता आणि सदर वर नमूद केलेली मोटारसायकल व कार अर्जदार क्र. १ यांचे नावे करण्याकरिता तसेच इतर शासकीय व निमशासकीय कामांकरिता अर्जदार यांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी वारस दाखला मिळण्याच्या अर्जाकामी अन्य कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह आज दि. ९/१२/२०२५ रोजी जाहीर केले.

सही /-
**कनिष्ठ लिपीक,**
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**पेण-रायगड**

सही/-
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर**
**पेण-रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे आशिल श्री. संदीप शनिवार घरत हे खालील वर्णनाची मिळकत कायमस्वरूपी विकत घेण्याचा व्यवहार सदर मिळकतीचे मालक श्री. राकेश धनंजय बेंद्रे यांच्यासोबत चालू आहे. या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**
**गट क्र. ४८, क्षेत्र ०-८८-६० हे आर,**
**पैकी ०-६०-६० हे आर, मौजे नाडसुर**
**तालुका- सुधागड, जिल्हा - रायगड.**

सदर मिळकत हि जागामालक श्री. राकेश धनंजय बेंद्रे यांनी १) महेंद्र गोपाळ अहिरे २) राजेंद्र गोपाळ अहिरे ३) राधिका गोपाळ अहिरे यांच्याकडून दिनांक १२/०५/२०२२ रोजी नोंदणीकृत दस्तऐवज करून दस्त क्र. १०१५/२०२२ द्वारे खरेदीखतकरून खरेदी केलेली आहे. तरी सदरील मिळकत आमचे अशिल श्री. संदीप शनिवार घरत खरेदी करत असून सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकारार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अश्या व्यक्तीने सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबधीच्यालेखी कागदोपत्री पुराव्यासोबत आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दि. १६/१२/२०२५

सही/-
अ‍ॅड. उमेश पंडीत राठोड
मुंबई हायकोर्ट
ऑफिस:- करिश्मा
को.हौ.सो. शॉप नं ०८, सेक्टर- १ ई,
कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८
मो.नं. ९०२२१६५००८


# वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## निवडक



### गोगादे बु. शाळेचा अभिमान उपक्रम

**पाल-बेणसे :** पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद गागोदे बुद्रुक या शाळेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत 'माझी शाळा, माझा अभिमान' उपक्रमात माजी विद्यार्थी मेळावा रविवारी (दि.१४) आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली येलवे यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणामध्ये, या कार्यक्रमाचा उद्देश, लोकसहभागातून शाळेचा सर्वांगीण विकास व शाळेची प्रगती असल्याचे सांगितले. तर, शाळेच्या स्मिता पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून लोकसहभागातून शाळेला अपेक्षित असणाऱ्या बाबी सांगितल्या. याप्रसंगी संदीप पाटील, ॲड. नितीन जेधे, पल्लवी जगताप व अन्य माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सोनाली जगताप, सर्व माता-पालक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य केले. त्याबाबत त्यांचे शाळेतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.



### कनिष्ठ महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**बोर्लीपंचतन :** श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील जनता शिक्षण संस्थेच्या श्री मोहनलाल सोनी विद्यालय व श्री नानासाहेब कुळकर्णी कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आदिती तटकरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करताना शिक्षणासोबतच संस्कार, कला व क्रीडा यांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अनन्यसाधारण असल्याचे नमूद केले. दि. १० ते १७ डिसेंबर दरम्यान विद्यार्थ्यांसाठी क्रीडा, चित्रकला, हस्तकला, रंगावली स्पर्धेबरोबरच आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. होते स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांनी स्वागतगीत, समूह नृत्य, एकांकिका, नाट्यछटा, देशभक्तीपर गीत, लोकनृत्य अशा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादर केलेल्या रंगतदार मेजवानीने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे हे कार्यक्रम विशेष लक्षवेधी ठरले. याप्रसंगी शैक्षणिक, क्रीडा व सहशैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



### माजी विद्यार्थ्यांकडून सीसीटीव्ही कॅमेरे भेट

**तळा :** तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागाव माध्यमिक शाळेस इयत्ता १० वी सन १९९५-९६ घ्या बॅचने २५ हजार रुपये किंमतीचे सीसीटीव्ही कॅमेरे शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देणगी स्वरूपात भेट दिले. ही भेट माजी विद्यार्थी सुनिल बयकर, धर्मा राणे, गणेश मानकर, मंगेश महाडिक, नितीन तांबट, तुकाराम कदम, सचिन घाडगे, कुंदन पवार, संतोष कजबले, अरूण मोरे, संदेश कडव आदींनी शाळेच्या मुख्याध्यापकांकडे दिली. याचवेळी शाळेच्यावतीने माजी विद्यार्थ्यांचे पत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महागाव शाळेला सीसीटीव्ही कॅमेऱ्याची आवश्यकता होती. शाळेची ही गरज ओळखून माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला सीसीटीव्ही कॅमेरे भेट स्वरूपात देण्यात आले. हे सीसीटीव्ही कॅमेरे दिल्याने शाळेचा परिसर कॅमेऱ्यामधे आला असून शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला आधार मिळाला आहे.

उरण तालुक्यातील दिघोडे-चिर्ले

# रस्त्याच्या कामात गोंधळ

## स्थानिकांवर अन्याय, गोडाऊनवाल्यांना अभय?

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील दिघोडे-चिर्ले हा रस्त्या वाहतुकीला अपुरा पडत होता. ही बाब लक्षात घेत या रस्त्याच्या रुंदीकरणाचे व काँक्रीटीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम खात्याकडून केले जात आहे. मात्र, हा रस्ता करताना सरकारी मोजणी झाली नाही. तरी देखील सबंधित ठेकेदारांनी स्वतःच्या मर्जीनुसार लाईन टाकून स्थानिकांवर अन्याय असून गोडाऊनवाल्यांना वाचविण्याचा प्रयत्न चालू आहे, असा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे.

उरण तालुक्यातील दिघोडे नाका परिसर हा दिवस-रात्र गजबजलेला असतो. या ठिकाणी विविध प्रकाराची दुकाने आहेत. त्यामुळे येथील रस्त्याचे काम दिवाळी नंतर हाती घेऊ, तोपर्यंत इतर कामे करू असे ठरविण्यात आले होते. परंतु, संबंधित ठेकेदाराने भर पावसात नाक्यावरील स्थानिकांची दुकाने व कंपाउंड पोलीस संरक्षणात तोडून अन्याय केला. तर, दुसरीकडे गोडाऊनवाल्यांनी भर रस्त्यातून बेकायदा विजेचे पोल टाकून गोडाऊनमध्ये वीज पुरवठा केला आहे. तसेच, रस्त्याचे काम चालू असताना चिर्ले ते दिघोडे रस्ता व पाईप लाईनमधील जागा डेब्रिज मातीने भरली जात होती. ही बाब स्थानिकांनी अधिकाऱ्यांच्या लक्षात आणल्यानंतर त्यांच्याकडून थातूर मातूर कारवाई केली गेली. मात्र, त्यानंतर देखील ठेकेदारांनी परत डेब्रिज टाकून रस्त्याचे काम चालूच ठेवले. त्यानंतर ही बाब इंजिनिअर एम.के यांच्या निदर्शनात आणून दिल्यावर आम्ही कारवाई करू, अशी उत्तरे देऊन वेळ मारून नेली, असा आरोप स्थानिकांकडून होत आहे.



> रस्त्याचे काम करत असताना रस्त्यावरील विजेचे पोल हे रीतसर परवानगी घेऊन ते पोल अगोदर काढण्यात यावे. त्यानंतर रस्त्याची कामे करावित. ही बाब आम्ही सार्वजनिक बांधकाम खाते व ठेकेदार यांच्या निदर्शनात आणून दिली आहे.
>
> - गजानन चव्हाण, सहाय्यक अभियंता, महावितरण, जासई

> गोडाऊनवाल्यांनी आपल्या गोडाऊनपर्यंत वीज नेण्यासाठी रस्त्यावर जे बेकायदा विजेचे पोल टाकले आहेत, ते काढण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाही.
>
> - एम. के. इंजिनियर, सार्वजनिक बांधकाम विभाग, उरण

त्याचबरोबर रस्त्याचे कामे करताना पाण्याच्या मोऱ्या सुस्थितीत आहेत की नाहीत, या सर्व गोष्टींची खात्री करूनच रस्त्यावरील कामे करण्यात येतात. रस्त्यावर विद्युत पोल अडथळा ठरत असतील तर ते काढण्यासाठी रीतसर परवानगी घेऊन ते काढावे लागतात. रस्त्यावरील पाण्याचा निचरा करणाऱ्या मोऱ्या गोदामवाल्यांनी गिलंकृत केल्या आहेत. पाण्याची पाईप लाईन ही मोऱ्यांच्या खालून टाकायला हवी असताना तसे न केल्यामुळे ही पाईप लाईन पाण्याच्या प्रवाहाला अडथळा ठरत आहे. असे असून देखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ठेकेदारांना अभय दिले जात असल्याची चर्चा सुरू आहे. या रस्त्याच्या बांधकामांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी येथील स्थानिक नागरीकांनी केली आहे.

## कौशल्य दीक्षांत सोहळा



**| रसायनी | प्रतिनिधी |**

जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात कौशल्य विकासातील अनोखा उपक्रम कौशल्य दीक्षांत समारंभाचे आयोजन गुरूवारी (दि.१८) आयोजित करण्यात आले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण व अत्याधुनिक कौशल्य प्रशिक्षणाची प्रेरणा निर्माण करण्यात आली.

समाजातील तळागाळातील निरक्षर, अपूर्ण खंडित शिक्षण झालेल्या व जे.एस. एस. रायगडच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. दुर्लक्षित प्रशिक्षणनार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाची प्रेरणा जागृत व्हावी, शिक्षणाचे महत्त्व त्यांना कळावे, तसेच उच्च पदवी प्राप्ती वातावरण निर्मितीचे स्वरूप त्यांना कळावे, या उद्देशाने सदर समारंभाचे स्वरूप दीक्षांत समारंभा सारखे करण्यात आले होते. शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत जे.एस.एस. रायगडचा कौशल्य दीक्षांत सोहळा हा अनोखा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. जन शिक्षण संस्थान योजनेच्या माध्यमातून जनसामान्यांचा सन्मान होत असल्याचे मत कार्यक्रमाप्रसंगी डॉ. मेधा सोमैया यांनी व्यक्त केले. तर, जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे मत डॉ. नितीन गांधी यांनी व्यक्त केले. तसेच, कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांनी केले.

## जीवनगौर पुरस्कार देऊन सन्मान



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

माझ्या ८७ व्या वर्षी मी कार्यक्षेत्रात केलेल्या काव्य लेखनाची दखल घेऊन एक ज्येष्ठ कवयित्री या नात्याने मला जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले. त्यामुळे भविष्यात काव्यलेखन करण्याची ऊर्जा कोमसाप उरणने दिली आहे, असे विचार ज्येष्ठ कवयित्री वसुधा नवाळी यांनी मधुबन कट्ट्यावरील कविसंमेलनात काढले. यावेळी दुसरा जीवनगौरव पुरस्कार प्राप्त व्यक्तिमत्त्व गायक कवी रमेश थवई यांनी ही आपल्या भाषणात कोमसापच्या कार्याचा गौरव केल्याबाबत आभार मानले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेश मेस्त्री हे होते. यावेळी साहित्यरत्न प्रा. एल.बी.पाटील, तालुका गट शिक्षणाधिकारी निर्मला घरत, मच्छिंद्र घरत, सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, निळवर्ण दत्ताराम, साहेबराव ओहोळसर, मधुबन कट्टा अध्यक्ष राम म्हात्रे, आर.सी. गावंड, नरेश ठाकूर तसेच अन्य कवींची उपस्थिती लाभली होती. प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे तर सूत्रसंचालन संजय होळकर यांनी केले. हा कार्यक्रम विमलातलाव उरण येथे सपन्न झाला.

## रसायनीत घुमतोय गुबूगुबूचा नाद

**| रसायनी | प्रतिनिधी |**

नंदीबैल हे शंकराचे वाहन असून ते पूजनीय मानले जाते. भात कापणीचा हंगाम सरला की, घाटमाथ्यावरून कोकणात पोतराज, गोंधळी, तसेच नंदीबैलवाले येत असतात. ते नंदीबैल घेऊन दारोदारी खेळ दाखवत असतात. या नंदीला पायात घुंगरू, गळ्यात घंटा अन् टोकदार शिंगे अशा प्रकारे सजविले जाते. आकर्षक व धष्टपुष्ट असा बैल घेऊन नंदीबैलवाले गावोगांवी व दारोदारी फिरत असतात. यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. सध्या हे नंदीबैलवाले रसायनी परिसरात दाखल झाले आहेत.



थंडीचा हंगाम सुरू झाला की, घाटमाथ्यावरील भटका विमुक्त समाज आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी कोकणात दाखल होत असतो. हवेत गारवा निर्माण होऊन थंडी पडताच मोहोपाडा रसायनी पाताळगंगा परिसरात गुबूगुबुचा आवाज कानी ऐकू येऊ लागला आहे. ग्रामीण भागात विविध ठिकाणी पोतराज, गोंधळी, नंदीबैल येत आहे. नंदीबैल आणणारे याच व्यवसायावर उदरनिर्वाह करीत असतात. पिढ्यानपिढ्यापासून करीत असलेल्या व्यवसायात खंड पडू नये यासाठी हा वर्ग कोकणात येत असतो. या नंदीबैलांना पाहण्यासाठी लहानथोर, महिला गर्दी करून गाऱ्हाणे मांडतात. यातच प्रश्नाचे योग्य उत्तर मिळाल्याने महिला वर्गांसह नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण दिसून येते. या नंदीबैलाला विविध आभूषणांनी सजविलेले असते. शिंगे टोकदार असतात, त्यांना रंगविलेले असते, पायात घुंगरू, पाठीवर शाल असते. महिला वर्गामध्ये नंदीबैल पाहून उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवाय आपल्या जवळ असलेले धान्य, कपडे, पैसे देऊन त्यांचा आशीर्वाद घेताना महिला दिसत आहेत.

## भागूबाई शाळेचे नेत्रदीपक यश

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन दि. १६ व १७ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या प्रदर्शनात द्रोणागिरी येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीम. भागूबाई चांगू ठाकूर शाळेने नेत्रदीपक यश मिळवले. यावेळी विकसित भारत आणि आत्मनिर्भर भारतासाठी विषयांतर्गत विविध गटांमधील स्पर्धेत व प्रदर्शनात शाळेने यश मिळवले. यावेळी इ.६ वी मधील जिविका भोईर हिने वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, तिने प्रकल्प मांडणीमध्ये ६वी ते ८वी गटात प्रथम क्रमांक मिळवला. पुढील जिल्हास्तरावर तिची निवड करण्यात आली आहे. माध्यमिक शिक्षक गटामधून शाळेतील गणित विषयाच्या शिक्षिका शुभांगी म्हात्रे यांनी द्वितीय स्थान मिळवले.

## महावितरण पेण मंडळाचा उत्साहपूर्ण सोहळा



**| चणेरा | प्रतिनिधी |**

मनोरंजनात्मक उपक्रमांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तणाव कमी होऊन कामासाठी नवी ऊर्जा मिळते, असे प्रतिपादन भांडुप परिमंडळाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी केले. तसेच, महावितरणचे काम जबाबदारीचे व तणावपूर्ण असून, कार्यालयीन व क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. २४ तास अखंडित वीजपुरवठा देताना येणारा ताण कमी करण्यासाठी अशा एकत्रित मनोरंजन कार्यक्रमांचे आयोजन उपयुक्त ठरते, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित पेण मंडळामार्फत 'मनोरंजनाचा भव्य सोहळा' बुधवारी (दि.१८) रोह्यातील सी.डी. देशमुख नाट्यगृह येथे उत्साहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता प्रदीप डाळू यांनी केले. अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड यांनी महावितरणच्या प्रगतीचा आढावा घेताना, नव्या तंत्रज्ञानामुळे कंपनीने दर्जेदार व विश्वासार्ह सेवा देण्यात यश मिळवले असल्याचे नमूद केले. यावेळी डॉ. दत्ता कोहीनकर यांनी 'मनाची अमर्याद शक्ती व ताणतणाव व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन केले. तर, अमित गायकवाड यांनी मेडिक्लेमविषयी माहिती दिली. कार्यक्रमात रंगमित्र संस्कृतीक कला मंडळ, इंदापूर निर्मित 'बाप पण भारी देवा' हा विनोदी व भावनिक नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. रोहा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला. मनोरंजन, मार्गदर्शन व कुटुंबीयांचा सहभाग यामुळे हा सोहळा महावितरण कुटुंबासाठी संस्मरणीय ठरला.

या कार्यक्रमाला पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, सहाय्यक महाव्यवस्थापक नमिता गजदर, कार्यकारी अभियंते प्रदीप डाळू, रामकृष्ण पाटील, शैलेशकुमार सिंह, विद्यासागर शिंदे, उमेश चव्हाण, प्रवीण साळी, मंडळ व्यवस्थापक संगीता गंभीर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय व ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थी रमले निसर्गाच्या सान्निध्यात



**| तळा | प्रतिनिधी |**

तळा तालुक्यातील वावेहवेली धरण हे तालुक्यासाठी जलसंजीवनी ठरत असून पर्यटनासाठीही चालना मिळत आहे. सध्या अनेक शैक्षणिक सहलींना सुरुवात झाली असून या सहली आता वावेहवेली धरणाकडे वळत आहेत. दरवर्षीच्या तुलनेत यंदा धरण परिसर व धरण क्षेत्र पाहण्यासाठी पर्यटक व सहलींमध्ये मोठी वाढ झालेली आहे. नयनरम्य निसर्गाचा आनंद घेत पर्यटकांसह विद्यार्थी रमत आहेत. त्यामुळे काही प्रमाणात स्थानिकांच्या रोजगाराचा प्रश्न देखील सुटत आहे.

या धरणाचे पाणी हे वानस्ते, राणेचीवाडी, खैराट, वावेहवेली, बामणघर, गौळवाडी, पिटसई भागात जात असल्याने या पाण्याचा ओलावा या जमिनीत असल्याने काही ठराविक शेतकरीच भातशेती करून भाताचे पिक घेत आहेत. दरम्यान, वावेहवेली धरणावरती पर्यटनाच्या दृष्टीने ज्या सुविधा पाहिजे त्या मिळत नाहीत. तरी देखील सुट्टीच्या दिवशी हा धरण परिसर पर्यटकांसह शैक्षणिक सहलींनी गजबजून जात आहे. त्याचबरोबर पावसाळ्यात या धरणावरती मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात.

'विचार करा, शिका, तयार करा' वैयक्तिक, व्यावसायिक विकासाला चालना

# पिल्लई कॅम्पसमध्ये मेकरथॉनचे आयोजन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पिल्लई विद्यापीठाने अभियांत्रिकी, वास्तुकला, वाणिज्य, डिझाइन आणि व्यवस्थापन यांचा समावेश असलेल्या मेकरथॉन ७.० 'विचार करा, शिका आणि तयार करा' या प्रमुख नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे डॉ. के.एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पसमध्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी १८९ आंतरशालेय आणि १००० हून अधिक आंतरमहाविद्यालयीन संघांचे विद्यार्थी एकत्र आले होते.



मेकरथॉन ७.० ने तांत्रिक नवोपक्रम आणि अनुभवात्मक शिक्षणासाठी एक जीवंत, समोरासमोरचा व्यासपीठ प्रदान केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संकल्पनांना वास्तविक जगातील अनुप्रयोगांशी जोडता आले. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या वर्कस्टेशन्सवर सक्रियपणे विचारमंथन केले, कल्पनांना कार्यरत नमुनांमध्ये रूपांतरित केले आणि तज्ज्ञ ज्युरींसमोर त्यांचे उपाय सादर केले. सहभागींनी प्रचंड उत्साह व्यक्त केला.

यामध्ये शाळा विभागातील विज्ञान आणि तंत्रज्ञानमध्ये प्रथम पारितोषिक सरस्वती माध्यमिक विद्यालय ठाणे, द्वितीय पारितोषिक सेंट थॉमस अकादमी ऑफ एज्युकेशन विचुंबे आणि तृतीय पारितोषिक डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी नवीन पनवेल यांना तर, कनिष्ठ महाविद्यालय विभागात प्रथम पारितोषिक सी.के.टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल, द्वितीय पारितोषिक एम्पायरियन स्कूल खारघर आणि तृतीय पारितोषिक सेंट जोसेफ हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज कळंबोली यांना मिळाले. त्याचबरोबर शाळा विभागात डिझाइन, आर्किटेक्चर आणि इंजिनिअरिंगमध्ये प्रथम पारितोषिक जयपुरियार स्कूल सानपाडा, दुसरे पारितोषिक अपीजे स्कूल नेरुळ आणि तिसरे पारितोषिक सेंट लॉरेन्स हायस्कूल वाशी यांना तर, कनिष्ठ महाविद्यालय विभागात प्रथम पारितोषिक न्यू होरायझन पब्लिक स्कूल नवीन पनवेल, द्वितीय पारितोषिक सी.के.टी. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय पनवेल आणि तृतीय पारितोषिक सेंट मेरीज ज्युनियर कॉलेज वाशी यांना मिळाले. तसेच, कनिष्ठ महाविद्यालय विभागात बिझाथॉनमध्ये प्रथम पारितोषिक न्यू होरायझन पब्लिक स्कूल नवीन पनवेल, दुसरे पारितोषिक डॉ. पिल्लई ग्लोबल अकादमी नवीन पनवेल आणि तिसरे पारितोषिक बाल भारती पब्लिक स्कूल खारघर यांना मिळाले आहे. यावेळी अध्यक्ष डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई यांच्या हस्ते २ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, चषक आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

## 'महाराष्ट्राची सौंदर्यवती' कार्यक्रम संपन्न



**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

साहस फाऊंडेशन या संस्थेने एस.एस. सीनेव्हिजन आणि श्री प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट पनवेलच्या साहाय्याने 'ब्युटी पेजंट-महाराष्ट्राची सौंदर्यवती' कार्यक्रमाचे आयोजन पनवेल येथील सिंधी पंचायत हॉलमध्ये मंगळवारी (दि.१६) करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन साहस फाऊंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कुरूप, झुलेलाल ट्रस्टचे ॲड. मनोहर सचदेव, सिद्धी कामत, रेश्मा भोईर व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अध्यक्षा रेश्मा कुरूप यांनी, सौंदर्य स्पर्धांमध्ये व्यासपीठ उपलब्ध करून देऊन आम्ही एक संस्था म्हणून सामान्य मुलांना व्यासपीठ देऊन त्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमामुळे त्यांना स्पर्धा करण्याची, त्यांची प्रतिभा आणि टॅलेंट प्रदर्शित करण्याची संधी मिळाली, असे त्यांनी सांगीतले. या स्पर्धेत एकूण ६५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यावेळी महाराष्ट्राची सौंदर्यवती मिसेस विजेतेपद मानसी सुर्वे (५०+ वयोगट ), हर्षला कारंडे, पूजा भांडारकर व इतर स्पर्धकांना फॅशन आयकॉन, फोटोजेनिक फेस अशा वेगवेगळे टायटल्स, क्राऊन आणि चषक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच, विजेत्या स्पर्धकांना मलाबार ज्वेलर्सकडून चांदीचे कॉइन व व्हिएलसीसीकडून भेटवस्तू देण्यात आले. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून अभिनेते संजय खापरे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.जे. कोमल, कोरिओग्राफर स्वप्नाली केलजी व अभिनेते देवदत्त घरत यांनी केले.




## राशीभविष्य

- **मेष :** कामाचा अनुत्साह राहील. अपघात वा चोरीद्वारे नुकसान संभवतं. मुलांच्या संगतीबाबत काळजी घ्या.
- **वृषभ :** आर्थिक बाबतीत मध्यस्थी करू नये. व्यवसायात विचारानं रहावं. उपजत कलांना वाव मिळेल.
- **मिथुन :** कर्जफेडीबाबत समाधान लाभेल. नवे करार मार्गी लागतील. प्रक्रिया उद्योगात प्रगती करता येईल.
- **कर्क :** कौटुंबिक प्रश्नात समाधान लाभेल. स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. स्थावर प्रश्न रखडतील.
- **सिंह :** रखडलेल्या कामांना गती येईल. विवाहाच्या प्रयत्नांना चालना मिळेल. आर्थिक अडचणी राहतील.
- **कन्या :** प्रवासाचे बेत सफल ठरतील. धार्मिक कार्याकडे विशेष ओढा राहील. थोरांचं मार्गदर्शन लाभेल.
- **तूळ :** कौटुंबिक वाद वाढवू नका. कुलदेवतेची उपासना करावी. मुलांनी प्रकृतीच्या तक्रारींकडे लक्ष द्यावं.
- **वृश्चिक :** अधिक विचार करू नका. प्रयत्नातील सातत्य, चिकाटी कामी येईल. धनलाभाचे योग आहेत.
- **धनु :** व्यवसायात नव्या संधी चालून येतील. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढेल. कायदेशीर बाबतीत काळजी घ्या.
- **मकर :** महत्त्वाचा दिलासा मिळेल. अपेक्षित भेटीतून काही साध्य करता येईल. बाकी चिंता करू नये.
- **कुंभ :** नोकरीत समाधानकारक स्थिती राहील. स्थावर बाबतीत विचारानं रहावं. महत्त्वाची कामं होतील.
- **मीन :** ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. जुनी येणी वसूल होणार आहेत.

फॅशन-पॅशन

## काय करायचं बनारसी साडीचं?

लग्नकार्य अथवा अन्य सण-समारंभांच्या निमित्ताने घेतलेल्या महागड्या बनारसी तसंच वेगवेगळ्या प्रकारच्या सिल्क साड्या नंतर पडून राहतात. कपाटात पडून राहणाऱ्या या साड्यांमध्ये जीव गुंतलेला असल्यामुळे त्या देऊन टाकणंही शक्य होत नाही. अशा वेळी रिसायकलिंगद्वारे त्यांना ट्रेंडी लूक देण्याचा प्रयत्न करता येईल. या साड्यांपासून कोणते पेहराव तयार करता येतील? पाहू या.

✻ कुर्ती हा ऑल टाईम फेवरिट ऑप्शन आहे. अशा कुर्ती खूप छान दिसतात. लग्न किंवा समारंभाला त्या घालता येतात. वेगवेगळ्या फॅशनच्या, पद्धतींच्या कुर्ती तुमच्या वॉर्डरोबची शान ठरतील. तुम्ही त्या लेगिंग्ज, पलाझो वा चुडीदारवर घालू शकता. साड्यांचा छानसा सलवार-कमीझही शिवून घेता येईल.

✻ बनारसी साडीचा काठ जाड असतो. तो नको असेल तर बॉर्डर कापून उरलेला भाग दुपट्टा म्हणून कॅरी करता येईल. असा दुपट्टा सिल्कच्या प्लेन ड्रेसवर खुलून दिसतो. यामुळे एखादा साधासा ड्रेसही भरजरी होऊन जातो. बाजारात बनारसी दुपट्टे मिळतातच पण तुम्ही घरच्या घरीही दुपट्टा बनवू शकता. **(क्रमश:)**

## १९ डिसेंबर

दिनविशेष

- **१९६१** : भारताने दमण आणि दीवचा ताबा घेतला.
- **१९६३** : झांझिबारला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य मिळालं.
- **१९७४** : ऑस्ट्रेलियाचा क्रिकेटपटू रिकी पॉंटिंगचा जन्म.
- **२०१०** : ज्येष्ठ उद्योगपती गिरीधारीलाल केडिया यांचं निधन.
- **२०१३** : कांद्याच्या किमान निर्यातमूल्यात कपात. प्रतिटन ३५० डॉलरचा निर्णय.
- **२०१५** : नॅशनल हेराल्ड गैरव्यवहारप्रकरणी सोनिया गांधी आणि राहुल गांधी न्यायालयात हजर.

गेम टाईम

## धम्माल लगोरी भन्नाट धोपकेल

छोट्यांनो, चला काही भन्नाट खेळांची ओळख करून घेऊ या.

**लगोरी**

काही भागात पिठ्ठू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या खेळात सात सपाट दगड लागतात. ते एकमेकांवर रचायचे असल्याने खालचा मोठा, त्यावरील छोटा, त्यावरील आणखी छोटा असे निवडावे लागतात. असे एकावर एक रचलेले दगड म्हणजे लगोरी. हा खेळ खेळण्यासाठी दोन संघ लागतात. एकाने ही लगोरी मोडायची असते. दुसरा संघ तिचं रक्षण करतो. रक्षण करणाऱ्या संघाने मोडलेली लगोरी रचायची असते. दुसरा संघ त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडत असतो.

**धोपकेल**

धोपकेल हा आसाममध्ये लोकप्रिय असणारा कबड्डीसारखा खेळ आहे. तो रबरी बॉलने खेळतात. यात दोन संघ असतात. मैदानाच्या एका भागात उभा असणारा संघ बॉल दुसऱ्याच्या कोर्टमध्ये फेकतो. प्रत्येक संघ आपल्या एका खेळाडूला दुसऱ्याच्या कोर्टमध्ये पाठवतो. त्याने आपल्या संघाने फेकलेला बॉल झेलून पुन्हा कोर्टमध्ये परतायचं असतं. प्रतिस्पर्धी संघातल्या खेळाडूचा स्पर्श होऊ द्यायचा नसतो.

### पंचांग

**शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ. १५ (**दर्शवेळा अमावस्या**), चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : ज्येष्ठा, योग : शूल, सूर्योदय ७.०८, सूर्यास्त १८.०३

### फॉरवर्डस

**ये वक़्त हैं ज़नाब.. इन्सानों क़ी शक़्ल तक़ बदल देता हैं...**

**तो रिश्तों क़ा बदलना कौनसी बड़ी बात हैं...!**

आरोग्यमंत्र

## मिश्र धान्यांच्या सेवनाने...

मल्टी ग्रेन किंवा मिश्र धान्यं आरोग्यासाठी फायदेशीर असतात. गहू, हरभरे, तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका,बार्ली, सोयाबीन,तीळ, आदी.धान्यं एकत्र दळून पीठ तयार केलं जातं. वेगवेगळ्या प्रकारची धान्यं किंवा मिश्रधान्यांचं पीठ खाल्ल्याने एकाच वेळ बरेच लाभ मिळू शकतात. त्याविषयी...

१ मल्टीग्रेन पीठ किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ आपल्या शरीरात एकाच वेळी विविध पोषक तत्वांची पूर्तता करतात. या धान्यांमधले पोषक घटक अनेक शारीरिक समस्यांवर प्रभावी ठरू शकतात.



२ आहारात मिश्र धान्यांचा समावेश केल्याने शरीराला भरपूर फायबर मिळतं. त्यामुळे पचनसंस्था उत्तम कार्य करते. धान्यांमधल्या फायबरमुळे बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.

३ जेव्हा शरीराला जास्त फायबर मिळतं, तेव्हा ते वजन कमी करण्यासाठी आणि लठ्ठपणा कमी करण्यासाठी खूप उपयुक्त ठरतं. म्हणूनच वजन कमी करणाऱ्यांनी पूर्ण धान्यं खायला हवीत.

४ मल्टीग्रेन अनेक पोषक तत्वांचा पुरवठा करतात. या पोषक घटकांमुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते.

५ मधुमेह आणि रक्तदाबाच्या रुग्णांनी मिश्रधान्यांचं सेवन करायला हवं.

### फॅशन पॅशन

अनारकली पॅटर्नच्या कुर्त्यांची भलतीच चलती आहे. या कुर्त्यांना गोलाकार घेर असतो. लॉंग आणि शॉर्ट अनारकली कुर्त्यांनी मुलींचे वॉर्डरोब सजलेले असतात. या पॅटर्नचे ड्रेसही घातले जातात. पण हाच पॅटर्न युवकांसाठीही उपलब्ध असेल तर? हो, हे खरं आहे. युवकही अनारकली पॅटर्नचे कुर्ते कॅरी करू शकतात. फॅशनच्या क्षेत्रात सध्या हा ट्रेंड जोर धरू लागला आहे. पुरूषांच्या अनारकली कुर्त्यांना 'मनारकली' असं समर्पक नाव देण्यात आलं आहे. तसं पहायला गेलं तर पुरूषांसाठीचे अनारकली पॅटर्नचे कुर्ते हा प्रकार नवीन नाही. **(क्रमश:)**

## व्हा एअरॉनॉटिकल इंजिनिअर

करिअरवाटा

सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात व्यापारीदृष्ट्या देवाण-घेवाणीवर भर दिला जात आहे. साहजिक वाहतूक क्षेत्राला महत्त्व आलं आहे. हवाई वाहतूक क्षेत्रही याला अपवाद नाही. विविध शहरांमध्ये विमानसेवा उपलब्ध झाली असून त्या ठिकाणी वाहतुकीसाठी चांगला प्रतिसादही मिळत आहे. या साऱ्यांचा परिणाम म्हणून या क्षेत्रात कारकीर्दीला चांगला वाव मिळू लागला आहे.



या क्षेत्रात इंजिनिअर, सायंटिस्ट किंवा टेक्निशियनपासून बिझनेस मॅनेजमेंटपर्यंत अनेक पदांचा समावेश आहे. त्यात एअरोस्पेस इंजिनिअरिंग हे वेगानं विकसित होणारं क्षेत्र आहे. यात एअरक्राफ्ट फ्लीट प्लॅनिंग अँड मेंटेनन्स उद्योगाचाही मोठ्या प्रमाणावर विस्तार होत असून त्यादृष्टीने या क्षेत्रात विविध पदांवर अनेकांना संधी प्राप्त होऊ शकते. या संदर्भातील विविध अभ्यासक्रम पंजाब इंजिनिअरिंग कॉलेज, चंदीगड, आय.आय.टी (मद्रास, कानपूर, मुंबई आणि खरगपूर), इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एअरॉनॉटिकल इंजिनिअरिंग, डेहराडून, मद्रास इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, चेन्नई, आय.आय.ए. ई.आय.टी., पुणे आणि सरदार वल्लभभाई पटेल इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, गुजरात या संस्थांमध्ये उपलब्ध आहेत. यातील कोणत्याही संस्थेत प्रवेश घेऊन हवाई वाहतूक क्षेत्रातील कारकिर्दीचं स्वप्न पूर्ण करता येईल.

खेचाखेची

## खरं बोला

**बॉस:** आम्ही स्वच्छतेच्या बाबतीत खूपच आग्रही आहोत. आत येण्यापूर्वी आपण दाराजवळच्या मॅटला पाय पुसले?

**नवीन कर्मचारी:** येस सर!

.

.

.

**बॉस:** आम्ही खरं बोलण्याबाबतही खूप आग्रही आहोत. दाराजवळ मॅटच नाही आहे.

### वेगळं काही

एक रोबो अमेरिकेतल्या सॅन फॅन्सिस्कोमधल्या रेस्तराँमध्ये काम करतो. 'क्रिएटर' असं त्याचं नाव. हा 'क्रिएटर' बर्गर बनवतो. 'क्रिएटर' एकाच आकारात कांदा, टोमॅटोच्या चकत्या कापू शकतो. तसंच पनीर, चिकनचेही समान तुकडे करू शकतो. यासोबतच 'क्रिएटर' ग्राहकांच्या आवडीनुसार मसाले घालून बर्गरमधलं पॅटिस कडक किंवा मऊ भाजून देतो. शास्त्रज्ञांनी त्यादृष्टीने 'क्रिएटर'ची रचना केली आहे. हा रोबो एका तासात १२० बर्गर तयार करतो. त्याच्यात ३५० थर्मल सेंसरवर चालणारं यंत्र बसवण्यात आलं आहे. त्याने तयार केलेल्या बर्गरना भरपूर मागणी असून ६ डॉलर एवढी एका बर्गरची किंमत आहे.

## थंडीसाठी बेस्ट सूप

रूचिरा



आता गुलाबी थंडीला सुरूवात झाली आहे. थंडीत गरमागरम सूप प्यायल्यावर छान तरतरी येते. तुम्ही घरी निरनिराळी सूप्स बनवत असाल, तर मशरूम सूप थंडीसाठी बेस्ट आहे.

**साहित्य** : २०० ग्रॅम पांढरे बटण मशरूम्स, दोन कप पातीचे कांदे (गोलाकार), अर्धा टी स्पून लसूण, आलं पेस्ट, एक टी स्पून बारीक चिरलेली सेलरी, अर्धा टी स्पून मिरपूड, एक टी स्पून सोया सॉस, तीन कप पाणी, पाच टेबलस्पून चिरलेली कांद्याची पात, चवीनुसार मीठ, तिळाचं तेल इत्यादी.

**कृती** : बटण मशरूम्स स्वच्छ धुवून बारीक तुकडे करा. कढई किंवा पॅनमध्ये अर्धा टेबलस्पून तिळाचं तेल घेऊन त्यात वाटलेलं आलं, लसूण घाला. चांगलं परतून घ्या. त्यात चिरलेला पातीचा कांदा घालून परता. मशरूम, सेलरी घाला. मध्यम आचेवर दोन मिनिटं परतून घ्या. आता तीन कप पाणी घाला. सूप मंद आचेवर चार ते पाच मिनिटं शिजवून घ्या. सोया सॉस घाला. वर मिरपूड, चवीनुसार मीठ घाला. सूप साधारण १५ मिनिटे मंद आचेवर ठेवा. उकळल्यावर गॅस बंद करा. या सूपमध्ये चिरलेली कांद्याची पात घाला. गरमागरम प्यायला द्या.

## सुडोकू ४२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ७ | | | |
| | ३ | | | ४ | | २ | ९ | ५ |
| ४ | | | ६ | | ९ | १ | | |
| | ७ | ३ | | ६ | | | ५ | ४ |
| | ८ | | ७ | | ४ | | ३ | |
| ६ | १ | | | ८ | | ९ | २ | |
| | | १ | ९ | | ६ | | | २ |
| ८ | ५ | ९ | | ३ | | | १ | |
| | | | ८ | | | | | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ८ | ३ | ७ | ६ | २ | ५ | ४ | १ |
| ५ | १ | २ | ९ | ८ | ४ | ६ | ३ | ७ |
| ७ | ४ | ६ | १ | ३ | ५ | ८ | ९ | २ |
| १ | ७ | ८ | ३ | ४ | ६ | ९ | २ | ५ |
| ४ | २ | ९ | ८ | ५ | ७ | १ | ६ | ३ |
| ३ | ६ | ५ | २ | १ | ९ | ७ | ८ | ४ |
| २ | ३ | १ | ६ | ७ | ८ | ४ | ५ | ९ |
| ६ | ५ | ७ | ४ | ९ | ३ | २ | १ | ८ |
| ८ | ९ | ४ | ५ | २ | १ | ३ | ७ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक ४२

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ५ | | ६ | | ७ | ८ | | ९ |
| १० | | ■ | | ■ | ११ | | ■ | | ■ | १२ | | ■ | |
| १३ | | १४ | ■ | १५ | | ■ | १६ | | १७ | ■ | १८ | | ■ |
| ■ | ■ | १९ | २० | | ■ | २१ | | ■ | २२ | २३ | | ■ | २४ |
| २५ | | | | ■ | २६ | | | | ■ | | ■ | २७ | |
| | ■ | २८ | | | ■ | | ■ | ■ | २९ | | ३० | | ■ |
| ३१ | ३२ | ■ | | ■ | ३३ | | | ३४ | ■ | ३५ | | ■ | ३६ |
| ■ | ३७ | ३८ | ■ | ३९ | | | ■ | ४० | ४१ | ■ | | ■ | |
| ४२ | | | ४३ | ■ | ४४ | | ४५ | ■ | ४६ | ४७ | ■ | ४८ | |
| ४९ | | ■ | ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | | | ■ | ■ | |
| | ■ | ५४ | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | | ■ | ५८ | | ५९ | |
| ■ | ६० | | ६१ | | | ६२ | | ■ | ६३ | | ■ | | ■ |
| ■ | ६४ | | | ■ | ६५ | | ■ | ६६ | | ■ | ६७ | | ६८ |
| ६९ | | ■ | ७० | | ■ | | ■ | ७१ | | | | ■ | |

**आडवे शब्द :-**

१) एकाने कष्ट करावेत व त्याचा फायदा दुसऱ्याने घ्यावा अशी अव्यवस्था दाखविणारी एक म्हण
१०) गुलाम, सेवक
११) जाणीव
१२) मच्छर
१३) आयातकर
१५) भोळा मनुष्य
१६) रात्रीचा पाऊस
१८) शिक्का
१९) मुलगी
२१) आईची वा वडिलांची आई
२२) राजबिंडा
२५) चकाकी, नीटनेटकेपणा
२६) असहनीय बडबड
२७) च्या करिता
२८) वाढलेला व्याप
२९) श्रीरामाच्या वडिलांचे नाव
३१) टपाल
३३) प्रयत्न
३५) काळपुरुष
३७) गाण्याचे कडवे, गाणे, पाऊल
३९) जन्म
४०) अर्धी ओंजळ
४२) भरपूर, पुष्कळ
४४) गाव, शहर
४६) करपलेले पीक, भाग इ
४८) शरीर
४९) बनारस
५०) हजार शेर
५२) चंद्र
५५) फळातील द्रव पदार्थ
५७) पंख
५८) कष्ट, मेहनत, त्रास
६०) महाराष्ट्राचा राजा
६३) भेकड
६४) काळू, एक जलचर
६५) सीतापती
६६) संधी
६७) बळ
६९) मयूर
७०) नाकावरील मोत्याचा दागिना
७१) तपासनीस

**उभे शब्द :-**

१) तर्क, ठोकताळा
२) मनाने घेतलेली भीती
३) करुणा, कीव
४) आम्ल, ॲसीड
५) शपथ
६) शक्ती, सामर्थ्य (आर्थिक)
७) आजार, दु:ख, त्रास
८) ठणका, तीव्र वेदना
९) वितुष्ट, भांडण
१४) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
१५) तिखट मीठाचा शिरा
१६) कमळ
१७) पवन, मरुत
२०) तोटा, हानी
२१) कहाणीतील गाव
२३) तलाव, धरण, विहीर इ.
२४) सोटा
२५) भांडण
२७) च्या बरोबर (हिं.)
३०) वाळूवर रेघा ओढून भविष्य सांगण्याची विद्या
३२) चहा पिण्याचे जोड साधन
३३) खोदकाम
३४) गाडीचे छत
३६) जिवंत असे पर्यंत
३८) पान, पाकळी
४१) समोरासमोरची चकमक
४२) गुपचूप, आवाज न करता
४३) संगनमताने रचलेले कारस्थान
४५) मोजकेपणा, मीतता
४७) देवाच्या मूर्तीची रथातून काढलेली मिरवणूक
५१) मऊ
५३) पाणी
५४) ख्याल, कवाली गाणारा
५६) आश्रय
५९) यात्रा करणारा
६०) पारध
६१) आयुष्य, पाणी
६२) हिंग
६३) भिक्षा मागणारा
६६) पुष्कळ (ग्रा.)
६७) दही घुसळून पातळ केलेले पेय
६८) सावध

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | गो | प | न | ■ | को | ला | ह | ल | ■ | स | दा | शि | व |
| ■ | ड | रा | व | ड | रा | व | ■ | ह | द्द | पा | र | ■ | र |
| आ | ■ | ज | ल | ■ | क | णी | दा | र | ■ | ता | ■ | क | व |
| स | म | य | ■ | सा | र | ■ | स | ब | ब | ■ | वा | स | र |
| न | शा | ■ | क | ल | क | ल | ■ | ह | ट | वा | दी | ■ | चे |
| ■ | ल | गा | म | ■ | री | त | स | र | ■ | द | ■ | न | ■ |
| रा | जी | ■ | त | ब्ये | त | ■ | र्क | ■ | न | क | ला | का | र |
| य | ■ | गो | र | स | ■ | ख | स | ख | स | ■ | च | र | ण |
| आ | दि | मा | ता | ■ | पा | रा | ■ | स | न | ई | ■ | घं | ■ |
| व | ■ | ता | ■ | न | व | टा | क | ■ | ख | ■ | छ | टा | क |
| ळा | ■ | ■ | न | य | न | ■ | च | ■ | व | च | क | ■ | मा |
| ■ | आ | क्रं | द | न | ■ | व | र | सा | डा | ■ | डा | ल | न |
| रं | भा | ■ | ■ | सु | पा | री | ■ | ल | ■ | जूं | ■ | ग | दा |
| क | ळ | क | ■ | ख | प | ■ | बा | स | री | ■ | अं | त | र |

## निवडक

### ॲड. गजानन डुकरे यांना रौप्य पदक



**नेरळ :** कर्जत तालुक्यातील ज्येष्ठ वकील आणि क्रीडापटू ॲड. गजानन पालू डुकरे यांनी राज्य खेलो मास्टर्स चॅम्पियन स्पर्धेत रौप्य पदकाला गवसणी घातली.या स्पर्धेतील पदकाने खेलो मास्टर्स राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडापटू म्हणून स्वतःला विकसोट करणारे ॲड गजानन डुकरे यांनी कराटे पासून क्रीडापटू म्हणून सुरुवात केली. नंतरभारतीय बनावटीच्या सायकलला तिरंगा झेंडा लावून गजानन डुकरे यांनी ७२ किलोमीटरचे अंतर गजानन डुकरे यांनी केवळ दोन तास ४७ मिनिटात पूर्ण केले. स्पर्धेतील हा आंतरराष्ट्रीय विक्रम ठरला होता. २१ मार्च २०२१ रोजी सायकालिंग राजगुरू भगतसिंग सुखदेव इंडियन फ्लॅग साईड वर्ल्ड अट्टेम्प स्पर्धेत ९० किलोमीटर अंतर विक्रमी वेळेत पार केले.दरम्यान, सायकालिंग स्पर्धेत लागोपाठ दुसऱ्यांदा ॲड.गजानन डुकरे यांनी आंतरराष्ट्रीय विक्रम केला आहे. सायकलपटू यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा आयोजित केली होती. आता पुणे येथे झालेल्या स्पर्धेत ५००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्य पदक मिळावीत राष्ट्रीय स्पर्धेसाठी पुन्हा एकदा आपली नोंद केली आहे. पन्नाशी ओलांडणारे ॲड डुकरे यांनी आजही आपल्यातील क्रीडापटू म्हणून जिवंतपणा कायम ठेवला आहे.



### हिंगोली संघाचा विजय

**पेण :** महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकोणीस वर्षाखालील मुलांच्या दोनदिवसीय कसोटी फॉरमॅट क्रिकेट स्पर्धेतील पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर झालेल्या सामन्यात हिंगोलीने बीडचा ८ गडी राखून विजय मिळवला आहे. बीडने पहिल्या डावात सर्व गडी बाद १५५ धावा केल्या. त्यामध्ये श्रेयस खटाळ यांनी सर्वाधिक ८२ धावा काढल्या हिंगोलीकडून कर्णधार ओंकार मोगल यांनी ५ तर सम्यक बागुल यांनी ३ फलंदाज बाद केले. हिंगोलीने पहिल्या डावात १५९ धावा काढून ४ धावांची आघाडी घेतली होती. त्यामध्ये सम्यक बागुल यांनी सर्वाधिक ८२ धावा काढल्या, बीडकडून कृष्ण बिडवे यांनी ६ फलंदाज बाद केले. बीड संघाने दुसऱ्या डावात फलंदाजी करतांना ९ गडी बाद १३३ धावसंखेवर डाव घोषित केला. हिंगोलीकडून ओंकार मोगल यांनी ६ फलंदाजांना बाद केले. हिंगोलीला जिंकण्यासाठी दुसऱ्या दिवसाचा खेळ संपायला ४५ षटके शिल्लक असताना १२९ धावांचे लक्ष बीडच्या संघाने ठेवले होते.हिंगोली संघाने अवघ्या २ फलंदाजांच्या मोबदल्यात १२९ धावांचे लक्ष सहजगत्या पूर्ण केले.



### शिहूच्या खेळाडूंची देदीप्यमान कामगिरी

**पाली/बेणसे :** सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघटना आणि महाराष्ट्र राज्य जलतरण संघटना यांच्या मान्यतेने १५ राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धा २०२५ मालवण चिवला बीच येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत १ किमी,२ किमी, ३ किमी झालेल्या स्पर्धेत सहभाग घेऊन रायगडच्या खेळाडूंनी वैयक्तिकरित्या सहभाग नोंदवून पदके मिळवून शिहू बेणसे विभागाची शान वाढवली आहे. या स्पर्धेत भारत देशातील अनेक राज्यातील १५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता, त्यामुळे या स्पर्धेचे विशेष महत्व होते. या स्पर्धेत जलद गतीने अंतर पार करणाऱ्या खेळाडूंना विशेष गौरवण्यात आले. मनन जीवन घासे (मुंढाणी) २ किमी, त्रिशूल हितेश कुथे (बेणसे) १ किमी, क्रिश विजय कुथे (झोतीरपाडा) २ किमी द्वितीय क्रमांक, मयुष मनोज ठाकूर (तरशेत) ३ किमी, रियांश मनोज ठाकूर (तरशेत) १ किमी ७ वा क्रमांक, पलक महेश पाटील (शेतजुई) ३ किमी, जान्हवी रुपेश पाटील (शेतजुई ) ३ किमी, अशाप्रकारे या खेळाडूंनी सहभागी होऊन विजेते पदके मिळवली. या यशात प्रख्यात जलतरण प्रशिक्षक सुनील पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन व विशेष सहकार्य लाभले.

### दिव्यांग महिलांनी जिंकली उमंग राष्ट्रीय ट्रॉफी

**सावंतवाडी :** जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दिव्यांगत्वावर मात करत सिंधुदुर्गच्या कन्येने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. मध्य प्रदेशातील भोपाळ येथे पार पडलेल्या उमंग राष्ट्रीय दिव्यांग महिला क्रिकेट कपमध्ये महाराष्ट्र संघाने दणदणीत विजय मिळवत चॅम्पियन ट्रॉफीवर आपले नाव कोरले. या विजयी संघाचे नेतृत्व सिंधुदुर्गच्या स्मिता गावडे हिने केले असून, संघात जिल्ह्यातील तीन दिव्यांग महिला खेळाडूंचा समावेश होता. भोपाळ येथील ओल्ड चॅम्पियन मैदानावर उमंग गौरवदीप वेल्फेअर सोसायटीतर्फे या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, मध्य प्रदेश आणि झारखंड या चार राज्यांचे संघ सहभागी झाले होते. अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने झारखंडला पराभूत करत विजेतेपदाला गवसणी घातली. सिंधुदुर्गच्या त्रिकुटाचा डंका: महाराष्ट्र संघाच्या विजयात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तीन महिला खेळाडूंचा सिंहाचा वाटा राहिला. स्मिता सुनील गावडे (कर्णधार) वेंगुर्ला, शिल्पा गोविंद गावकर मालवण (आचरा), दीक्षा दिनेश तेली देवगड, कर्णधार स्मिता गावडे हिच्या उत्कृष्ट नेतृत्वाखाली या तिघींनीही आपण कशातही कमी नसल्याचे सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या खेळाडूंना घडवण्यात आणि त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देण्यात साहस प्रतिष्ठान सिंधुदुर्ग या संस्थेचा मोठा वाटा आहे.



# भारतीय क्रीडा क्षेत्राला डोपिंगचे ग्रहण

**तब्बल 260 खेळाडू आढळले दोषी**

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वर्ल्ड अँटी डोपिंग एजन्सी अर्थात डब्ल्यूएडीएचा २०२४ साठीचा वाडाचा वार्षिक अहवाल नुकताच प्रकाशित झाला असून त्यानुसार सलग तिसऱ्या वर्षी भारतात सर्वाधिक खेळाडू डोपिंग चाचणीत दोषी आढळले आहेत. २०२४ साली हे प्रमाण तब्बल २६० खेळाडू इतकं आहे. भारतीय खेळाडूंनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांपासून क्रिकेट विश्वचषकांपर्यंत अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करून भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पण त्याचवेळी दुसरीकडे काही क्रीडापटूंमुळे भारताची मान शरमेनं खाली गेल्याची चर्चा सध्या चालू आहे.

वाडानं २०२४ वर्षाचा अहवाल मंगळवारी रात्री उशीरा प्रकाशित केला. या अहवालातील माहितीनुसार, २०२४ मध्ये



२६० भारतीय क्रीडापटूंनी बंदी घातलेल्या औषधांचं सेवन केल्याचं चाचणीदरम्या आढळून आलं होतं. आपली कामगिरी उंचावण्यासाठी उत्तेजक औषधांचं सेवन करण्यावर बंदी घालण्यात आली असतानाही त्यांचं सेवन केल्याचं डोपिंग चाचणीमध्ये निष्पन्न झालं.

चीन, जर्मनी, फ्रान्स, रशिया, इटली असे इतर सर्वच देशांमध्ये चाचणीत दोषी आढळलेल्या खेळाडूंची संख्या भारतापेक्षा बरीच कमी आहे. २०२३ मध्येदेखील भारतात सर्वाधिक खेळाडू डोपिंग चाचणीत दोषी आढळले होते. त्या वर्षी अशा खेळाडूंची संख्या २१३

- **डब्ल्यूएडीएच्या अहवालात सत्य समोर**
- **खेळाडूंची वाढती संख्या चिंताजनक**

इतकी होती. वर्षागणिक डोपिंग चाचण्यांमध्ये दोषी आढळणाऱ्या खेळाडूंची वाढती संख्या चिंताजनक असल्याचं मत या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

कोणत्या देशात किती खेळाडू दोषी आढळले?

| देश | चाचण्या | दोषी खेळाडू |
|---|---|---|
| भारत | ७११३ | २६० |
| चीन | २४२१४ | ४३ |
| जर्मनी | १५०८१ | ५४ |
| फ्रान्स | ११७४४ | ९१ |
| रशिया | १०५१४ | ७६ |
| इटली | ९३०४ | ८५ |
| यूके | ८२७३ | ३० |

दरम्यान, याच महिन्यात पार पडलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये महिला ४०० मीटर शर्यत किंवा पुरुष ४०० मीटर अडथळ्यांची शर्यत प्रकरात रेषेच्या सुरुवातीला फक्त एकच धावपटू असल्याचं पाहायला मिळालं. इतर धावपटू हे अँटी डोपिंग पथकाचे अधिकारी चाचणीसाठी उपस्थित असल्याच्या भीतीपोटी शर्यतीत सहभागीच झाले नसल्याचा विचित्र प्रकार नंतर समोर आला.

कामगिरी सुधारण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या उत्तेजक द्रव्याबाबतच्या चाचणीत दोषी खेळाडूंचं सर्वाधिक प्रमाण ॲथलेटिक्समध्ये आढळून आलं आहे.

डब्ल्यूएडीएच्या अहवालानुसार भारतातील २६० पैकी ७६ खेळाडू हे ॲथलेटिक्स प्रकारातले असून ४३ खेळाडू वेटलिफ्टिंग खेळातले आहेत. याशिवाय, २९ कुस्तीपटूदेखील या चाचणीत दोषी आढळले.

भारत सरकारची मात्र वेगळी भूमिकादरम्यान, एनएडीए या भारतीय संघटनेनं यासंदर्भात वेगळी भूमिका मांडली आहे. गेल्या काही वर्षांत भारतात अँटि डोपिंग चाचणीबाबतच्या व्यवस्थेत मोठी सुधारणा झाली आहे. भारतात उत्तेजक द्रव्यसेवनाच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी एनएडीए इंडियाकडून फक्त चाचण्यांची संख्याच वाढवण्यात आली नसून यासंदर्भात खेळाडूंमध्ये जनजागृती करण्यावरही संघटनेनं भर दिला आहे, अशी भूमिका एनएडीएने जारी केलेल्या निवेदनात मांडली आहे. यासाठी २०१९ मध्ये ४००४ चाचण्यांची संख्या २०२४ मध्ये ७११३ पर्यंत गेल्याचा दाखलाही देण्यात आला आहे.

### लखनौच्या स्टेडियमला प्रदूषणाचा विळखा?

**| लखनौ | वृत्तसंस्था |**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील निर्णायक सामना लखनौच्या भारतरत्न अटल बिहारी वाजयेपी इकाना स्टेडियममध्ये होणार होता. हा सामना विहित वेळेत सुरू होऊ शकला नाही. त्यामुळे नाणेफेकीचा वेळ वारंवार पुढे ढकलण्यात आली. कारण मैदानाती दृश्यमानता खूपच कमी होती. त्यामुळे फलंदाजांना फलंदाजी करताना आणि क्षेत्ररक्षकांना क्षेत्ररक्षण करताना त्रासाला सामोरं जावं लागू शकते.

त्यामुळे नाणेफेकीचा कौल वारंवार लांबवला जात होता. अशीच स्थिती कायम राहिल्याने हा सामना रद्द करण्याची वेळ आली. असं असताना मैदानात हार्दिक पांड्या मास्क घालून उतरला होता. लखनौला असलेल्या प्रदूषणाच्या विळख्यामुळे मास्क घालून उतरल्याचा दावा केला जात आहे. सोशल मीडियावर लखनौचं प्रदूषण ४००च्या पार असल्याचा दावाही केला जात आहे. इतकं प्रदूषण असणं आरोग्यासाठी घातक आहे.

## श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक क्रीडा संमेलन संपन्न

**| माणगाव | प्रतिनिधी |**



श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलचे वार्षिक क्रीडा संमेलन खर्डी येथील मैदानावर मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी सैन्य अधिकारी कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, शहर समन्वयक अतुल जाधव, माणगाव नगरपंचायत तसेच समाजसेवक भूषण सिसोदे आदी मान्यवरांसह स्कूलच्या संस्थापक बिजाक्षी राय, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते.

या क्रीडा संमेलनात शाळेच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली क्रीडा कौशल्ये, शिस्त व संघभावना प्रभावीपणे सादर केली. कॅप्टन निर्मल सिंग रंधावा यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात सांगितले कि, खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक मजबुती, आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि शिस्त विकसित होते. जे केवळ शिक्षणासाठीच नव्हे तर भविष्यातील करिअरसाठी अत्यंत आवश्यक आहे. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य, नौदल, हवाई दल, रेल्वे, पोलीस व इतर शासकीय सेवांमध्ये प्रवेशासाठी क्रीडांचे विशेष महत्त्व असल्याने क्रीडाक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय नोकऱ्यांमध्ये अतिरिक्त गुण, सवलती व विशेष संधी मिळतात. आज खेळात घेतलेली मेहनत उद्या देशसेवा आणि उज्ज्वल भविष्यासाठी मजबूत पाया ठरते, असे क्रीडांचे आपल्या जीवनातील अनेक महत्त्व सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवर पाहुण्यांच्या प्रेरणादायी उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा, शिस्त व देशसेवेबद्दल नवचैतन्य निर्माण झाले. एकूणच हे वार्षिक क्रीडा संमेलन विद्यार्थ्यांच्या ऊर्जेचे, संघभावनेचे व उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देणारे ठरले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी श्रद्धा इंग्लिश मीडियम स्कूलच्या बिजाक्षी राय यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

### बेणसे गावची खेळाडू श्रुती गायकर हिची
## डेहराडून येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बँडी शिबिरासाठी निवड



**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

- **रायगड-महाराष्ट्राच्या मुलींची ऐतिहासिक कामगिरी**
- **सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव**

नुकत्याच डेहराडून येथे पार पडलेल्या ७ व्या राष्ट्रीय स्तरावरील बँडी स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक पटकावून रौप्यपदक मिळवले.

या उल्लेखनीय यशानंतर संघातील खेळाडू श्रुती दत्ताराम गायकर हिची जानेवारी महिन्यात डेहराडून येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय बँडी शिबिरासाठी निवड झाली असून, हा तिच्या क्रीडा कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. श्रुतीने आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक संजय गमरे यांना दिले. त्यांनी केवळ तांत्रिक प्रशिक्षणच नाही तर आर्थिक मदत देऊनही तिच्या राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागाला मोलाचा आधार दिला. आंतरराष्ट्रीय बँडी स्पर्धा म्हणजे बँडी या खेळाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा, ज्यात क्लब स्पर्धा आणि युवा स्पर्धांचा समावेश असतो, ज्याचे आयोजनद्वारे केले जाते; फिनलंड, स्वीडन, रशिया, कझाकस्तान, नॉर्वे आणि अमेरिका यांसारखे देश यात सक्रिय आहेत, आणि या स्पर्धांमध्ये बर्फावर हॉकीसारखे खेळ खेळले जातात, ज्यात आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने मान्यता दिली आहे.

तिच्या या यशामागे माजगाव यांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. व्यावसायिक फिटनेस प्रशिक्षणामुळे श्रुतीला जुन्या दुखापतींमधून सावरणे, शारीरिक ताकद वाढवणे तसेच स्टॅमिना व चपळता सुधारण्यास मोठी मदत झाली. उच्च दर्जाच्या फिटनेस व रिहॅबिलिटेशन प्रशिक्षणामुळेच ती राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्तम काम गिरी करू शकली.तिने आपल्या स्केटिंग प्रशिक्षिका अदिती माळी यांचेही विशेष आभार मानले. त्यांच्या सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनामुळे व नियमित सरावामुळे प्रचिती गायकर यांच्या सहकार्याने तिच्या खेळात सातत्य व आत्मविश्वास वाढला.

सध्या आर्थिक अडचणी असतानाही, कुटुंबिय, जवळचे मित्र, प्रशिक्षक व शुभेच्छुकांचा मिळणारा पाठिंबा तिला अधिक मजबूत बनवत असल्याचे श्रुतीने सांगितले.

## स्वरा बामगुडेची क्रिकेट संघात निवड

**| माणगाव | प्रतिनिधी |**



माणगाव शहराच्या क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्राला अभिमान वाटावा अशी आनंदाची बातमी समोर आली आहे. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेची माजी विद्यार्थिनी, कुमारी स्वरा नंदिनी नितीन बामगुडे हिची रायगड जिल्हा मुलींच्या क्रिकेट संघात निवड झाली असून, तिच्या या यशाने संपूर्ण माणगाव शहर भारावून गेले आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने कठोर परिश्रम, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर जिल्हास्तरावर आपले नाव कोरणे ही केवळ वैयक्तिक नव्हे, तर संपूर्ण शहरासाठी प्रेरणादायी यशकथा ठरली आहे.

स्वरा ही केवळ उत्कृष्ट क्रिकेटपटूच नाही, तर अभ्यासातही तितकीच चमकदार आहे. इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावणारी स्वरा सध्या नवी मुंबईच्या नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही आपली वाटचाल ती तितक्याच आत्मविश्वासाने करत असून, येथील भव्य स्टेडियममध्ये भारत रत्न ङमास्टर ब्लास्टरफ सचिन तेंडुलकर क्रिकेट अकॅडमीत ती नियमित सराव करत आहे.

माणगाव येथील शिपुरकर व वाघरे शाळेत शिक्षण घेत असतानाच स्वराने क्रिकेटची स्वप्ने पाहायला सुरुवात केली. पहाटे सकाळी सहा वाजता धनसे मैदानावर घाम गाळत घेतलेले क्रिकेटचे प्राथमिक धडे आज तिच्या यशाचा मजबूत पाया ठरले आहेत. या प्रवासात शाळेच्या व्यवस्थापनाने, शिक्षकांनी आणि क्रीडा प्रशिक्षकांनी तसेच आई नंदिनी व वडील नितीन बामगुडे यांनी तिला वेळोवेळी प्रोत्साहन देत तिच्या स्वप्नांच्या पंखांना बळ दिले. सध्या नवी मुंबई येथे दररोज तीन सत्रांत कठोर सराव करत असलेली स्वरा ही यष्टिरक्षक आणि आघाडीची फलंदाज असल्याने ती दुहेरी मेहनत घेत आहे.

तिच्या खेळातील सातत्य, तांत्रिक कौशल्य, आत्मविश्वास आणि जिद्द पाहून महाराष्ट्र राज्य क्रिकेट निवड समितीने तिला रायगड जिल्हा क्रिकेट संघात महत्त्वाचे स्थान देत माणगावच्या या उदयोन्मुख प्रतिभेचा गौरव केला आहे. लवकरच ती महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये होणाऱ्या स्पर्धांमध्ये रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. आज स्वरा बामगुडेचे यश हे माणगावमधील अनेक मुलींसाठी आशेचा किरण ठरत आहे.

### जसप्रीत बुमराहचा संयम सुटला!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात चौथा सामना लखनौमध्ये खेळला जाणार होता, परंतु, धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे सामना रद्द करावा लागला. दरम्यान, भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो रागावलेला दिसुन येत आहे. बुमराह इतका रागावला आहे की त्याने फोन हिसकावून घेतला आहे. बुमराहशी संबंधित घटनेचा हा व्हिडिओ विमानतळावरील असून तो रांगेत उभा असल्याचे दिसून येत आहे. आता प्रश्न असा निर्माण झाला आहे की, चाहत्याने बुमराहसोबत काय केले म्हणुन तो चिडला होता? खरं तर, चाहता विमानतळावर रांगेत उभा होता.

### संजू सॅमसनचं पुन्हा नशीब फुटकं!

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

शुबमन गिलकडे टी २० संघाचं उपकर्णधारपद आहे. त्याच्याकडे भविष्याचं कर्णधार म्हणून पाहिलं जात आहे. पण त्याला टी २० संघात वारंवार संधी दिली जात आहे. असं असूनही त्याला संधीचं सोनं करता आलेलं नाही. त्यामुळे त्याच्या पदरी वारंवार निराशा पडत आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही त्याने फ्लॉप शो केला. आता दक्षिण अफ्रिकेविरुद्धच्या सुरुवातीच्या तीन सामन्यातही काही खास करू शकला नाही. त्यामुळे त्याच्यावर सर्वच स्तरातून टीकेची झोड उठत आहे. त्याच्यामुळे फॉर्मात असलेल्या संजूला बेंचवर बसावं लागत असल्याने क्रीडाप्रेमींनी नाराजी व्यक्त केली होती.

**ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प | ज्ञानप्रबोधिनी व टाटा ट्रस्टचा पुढाकार**

# सोळाशे खेळाडू करताहेत नियमित सराव



संग्रहीत छायाचित्र

**| संगमेश्वर | प्रतिनिधी |**

ग्रामीण भागातील क्रीडाप्रतिभा ओळखून त्यांना संघटित प्रशिक्षण देण्यासाठी ज्ञानप्रबोधिनी क्रीडाकूल आणि टाटा ट्रस्ट यांच्यावतीने ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प राबवला जात आहे. महाराष्ट्रातील ४ केंद्रांवर हा उपक्रम सुरू असून, १६००हून अधिक खेळाडू नियमित सराव करत आहेत.

ग्रामीण स्तरावरून तंदुरूस्त आणि सक्षम खेळाडू घडवण्याचा प्रयत्न ट्रस्टद्वारे केला जात आहे. या प्रकल्पातील खेळाडूंसाठीची वार्षिक आंतरकेंद्रीय स्पर्धा ९ व १० डिसेंबर रोजी चिपळूण-डेरवण येथे बँक ऑफ महाराष्ट्र व मातृमंदिर विश्वस्त संस्था पुणे यांच्या सहकार्यामधून पार पडली. चार केंद्रांमधील निवडलेल्या ३००हून अधिक सर्वोत्तम खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल आणि ॲथलेटिक्समध्ये १०० मी., १५०० मी. आणि गोळाफेक या क्रीडाप्रकारांम ध्ये अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. सर्वांगीण कामगिरीच्या निकषावर चिपळूण केंद्र हे सर्वोत्कृष्ट केंद्र ठरले. या स्पर्धेदरम्यान खेळाडूंना झालेल्या दुखापतींवर तत्काळ उपचार करण्यासाठी वैद्यकीय पथक दोन्ही दिवस उपस्थित होते. या स्पर्धेच्या समारोपावेळी निवृत्त एअरमार्शल हेमंत भागवत, बी. के. एल. वालावलकर फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर एल., डॉ. नेताजी पाटील, टाटा ट्रस्ट्सच्या क्रीडा विभागप्रमुख नीलम बाबरदेसाई, डेरवण क्रीडा संकुल प्रमुख श्रीकांत पराडकर, क्रीडाकुलचे संस्थापक व प्रकल्प प्रमुख डॉ. मनोजराव देवळेकर, ज्ञानप्रबोधिनी चिपळूण केंद्रप्रमुख स्वानंद हिर्लेकर आदी उपस्थित होते.

> **ग्रामीण खेळाडू घडवण्याचा निर्धार क्रीडा हे केवळ मौजमजेचे नाही तर राष्ट्रनिर्मितीचे साधन आहे. शिस्त, संघभावना, तंदुरूस्ती आणि नेतृत्वगुण क्रीडेमधून घडतात. जगातील अनेक राष्ट्रे आपल्या क्रीडा कामगिरीमुळे आघाडीवर आहेत. भारताने ऑलिंपिकसारख्या मंचावर अजूनही अपेक्षेइतकी कामगिरी केलेली नसली, तरी ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य संधी मिळाल्यास भविष्य उज्ज्वल आहे, असे या प्रकल्पातून स्पष्ट दिसते. ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्पामुळे अनेक गुणवंत खेळाडू घडत आहेत आणि भविष्यात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करणारे खेळाडू याच प्रकल्पातून पुढे येतील, असा विश्वास टाटा ट्रस्टच्या क्रीडा विभागप्रमुख नीलम बाबर-देसाई यांनी व्यक्त केला.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)